मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

## मराठी अर्थशास्त्र परिषद
नियतकालिक
(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय अधिक माघ-फाल्गुन-चैत्र शके १९४५
जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२५/खंड ४८, अंक ४

## ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईल्स्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल अ‍ॅड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तितः।।

# अर्थसंवाद

(यु.जी.सी. केअर लिस्ट (ग्रुप१) समावेशीत तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२५ / खंड ४८ / अंक ४

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय, वारणानगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०२२-२५)**
संतोष दास्ताने
मुक्ता जहागिरदार
के. के. पाटील
एस. एम. भोसले

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
'सर' निवास, री.स.नं. ३३/क/२,
प्लॉट नं. १८, लेक व्ह्यू कॉलनी,
दीपा गॅस गोडावूनच्या पाठीमागे,
उजळाईवाडी, ता. करवीर,
जि. कोल्हापूर - ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. **अनिलकुमार कृष्णराव वावरे**
शाश्वत विकसित भारत : समकालीन संदर्भ आणि भावी दिशा...!! .. २८१

२. **राहुल शं. म्होपरे , गणेश आ. टेकळे**
आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५: एक चिकित्सा.......... २९१

३. **शालिनी उत्तमराव कदम**
भारतातील लिंग अंदाजपत्रकाचा विश्लेषणात्मक अभ्यास ..... ३०१

४. **अतुल कृष्णा घाडगे, अजय कमलाकर दिक्षित**
छत्रपती शिवाजी महाराजांची करप्रणाली :
न्याय, विकास आणि संरक्षणाची परंपरा ...................... ३१०

५. **अतुल जी. राजगुरू, दादा रा. ननवरे**
धाराशिव जिल्ह्यातील जमीन वापराच्या पद्धतींचा
भूत, वर्तमान, आणि भविष्यकालीन तुलनात्मक अभ्यास ....... ३१८

६. **सुनिता विजय रणाते**
आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापन .................. ३३२

७. **राजेश हरिचंद्र भोईटे**
नवीन आर्थिक सुधारणा आणि भारताच्या अभिनव अर्थव्यवस्थेचा
उदय : रोमरच्या अंतर्जात वाढ यंत्रणेचा अभ्यास ............... ३४२

८. **योगेश पतिंगे, अमोल पाटील**
वर्धा जिल्ह्यातील निम्न आणि मध्यम वर्गातील कुटुंबाची
बचत आणि गुंतवणुकीचा राहणीमानावर होणारा परिणाम ...... ३५०

● **मारोती वि. तेगमपुरे**
मराठी अर्थशास्त्र परिषद ४७ वे वार्षिक अधिवेशन :
२०२४-२५ कार्यवाहांचा अहवाल ............................ ३६१

● संदर्भ सूची
अ) लेख सूची ............................................ ३६८
ब) लेखक सूची ........................................... ३७०
क) नवीन आजीव सभासदांची यादी ........................... ३७२
ड) तज्ञ परीक्षक सूची ...................................... ३७६

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०२४-२५

- **अध्यक्ष**

  **अनिलकुमार कृ. वावरे (सातारा)**

- **कार्याध्यक्ष**

  **अविनाश रा. निकम (शहादा)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शं. म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **विकास सुकाळे (नांदेड)**
  **विठ्ठल घीणमीने (हिंगणघाट)**
  **धोंडीराम पवार (पुणे)**

- **सदस्य**

  **संजय धनवटे (कारंजा)**
  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **सुरेश घुमटकर (बीड)**
  **जयवंत इंगळे (मलकापूर)**
  **बाळासाहेब पाटील (पनवेल)**
  **सुभाष सावंत (नाशिक)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **जितेंद्र तलवारे (धुळे)**
  **विठ्ठल ठावरी (भिसी)**
  **राजू शिंदे (धुळे)**
  **हनुमंत भोसले (खामगाव)**

- **स्वीकृत सदस्य**

  **अजय दरेकर (बारामती)**
  **संजय धोंडे (मेढा)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **बालाजी घुटे (लातूर)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७



**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु. ३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु. २०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

| | |
|---|---|
| शैक्षणिक संस्था<br>व्यावसायिक संस्था<br>ग्रंथालये | रु.२०००/-(त्रैवार्षिक)<br>रु.३०००/-(पंचवार्षिक) |

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.

**'अर्थसंवाद'साठी अनुदानाबद्दल आभार:**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टीप : म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# शाश्वत विकसित भारत : समकालीन संदर्भ आणि भावी दिशा...!!

**अनिलकुमार कृष्णराव वावरे** †

भारत हा एक असा खंडप्राय देश आहे की, ज्यामध्ये भाषा, संस्कृती, चाली-रीती, प्रथा-परंपरा, तव भूगोल, हवामान अशा अनेक गोष्टींमध्ये विविधतेतून एकता प्रतिष्ठित झालेली आहे. परिणामी, या देशाच्या आर्थिक व सर्वांगीण विकासाचा मार्गदेखील तेवढाच सर्वसमावेशक व शाश्वत असणे गरजेचे आहे. आपण जेव्हा भारताला जगातील आर्थिक महासत्ता तसेच विश्वगुरू म्हणून पाहतो तेव्हा तो होणारा विकास हा तितकाच चिरंतन व शाश्वत असला पाहिजे. आज होणाऱ्या विकासाची किंमत येणाऱ्या पिढ्यांना चुकवावी न लागता त्यांच्याही विकासाची शाश्वतता अबाधित राहिली पाहिजे. विकास घडवत असताना तो मूठभरांची मक्तेदारी न राहता तो राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिप्रेत असणारा अंत्योदयीदेखील असला पाहिजे. त्यामध्ये जेवढा वाटा आणि सहभाग हा शहरी विभागाचा असेल तेवढाच तो ग्रामीण, डोंगराळ, दऱ्या-खोऱ्यातील व आदिवासी पाड्यातील शेवटच्या घटकांचादेखील असला पाहिजे. विकास हा फक्त राष्ट्रीय उत्पन्नाची दरवाढ, जीडीपीमधील दरवाढ, विकासाच्या दरातील वाढ एवढ्यापर्यंतच सीमित न राहता त्यातून मानवी विकासाचा निर्देशांक, आनंदाचा निर्देशांक, भुकेचा निर्देशांक याबाबतीत देखील सर्वसमावेशकता असली पाहिजे. विकास होत असताना तो स्त्री आणि पुरुष, गरीब आणि श्रीमंत, ग्रामीण आणि शहरी अशा प्रत्येक घटकाला संतुलित वाटा, संधी आणि सहभाग पुरवणारा असला पाहिजे. संसाधनांचे योग्य वाटप, जीवनमानाचा सुधारत असणारा स्तर आणि मूलभूत गरजांच्या परिपूर्तीची शाश्वतता अशा आयामानी युक्त असा विकासच खऱ्या अर्थाने विकसित भारताचे शाश्वत स्वप्न साकार करू शकतो. कारण या भारताला ज्यांनी स्वातंत्र्य दिले, ज्यांनी ब्रीद दिले त्या महापुरुषांनी जी स्वप्ने पाहिली ती स्वप्नेदेखील याच, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या तत्त्वावर आधारित होती. त्यामुळेच त्यांचा वारसा घेणाऱ्या आपणा सर्वांवर हे उत्तरदायित्व आहे की, विकास करत असताना तो फक्त संख्यात्मक न करता त्याला मानवी चेहरा असला पाहिजे की, ज्याद्वारे मानवी मूल्य व मानवी हक्क आणि त्यासाठीची मानवी मूल्ये जपून संवर्धित करून ती भावी पिढीला

† अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, अध्यक्ष, ४७ वे अखिल भारतीय मराठी अर्थशास्त्र परिषद, वार्षिक अधिवेशन, दयानंद महाविद्यालय, लातूर.
आजीव सभासद क्र. १०३८, भ्रमणध्वनी : ९४२२२२९७२३, ई-मेल : darjune39@gmail.com

आपल्याला हस्तांतरित करता आली पाहिजेत. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत लेखाद्वारे 'शाश्वत विकसित भारत : समकालीन वास्तव, आव्हाने आणि भावी दिशा...' या विषयांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

दोन जागतिक महायुद्धे, त्यातील आर्थिक महामंदी, त्यानंतरचे शीतयुद्ध या एकापाठोपाठ एक अशा घडत गेलेल्या स्थित्यंतरांतून एकूण जगाचे अर्थकारण, राजकारण व सांस्कृतिक पर्यावरण बदलत गेले. जगातील साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव ओसरायला लागला. भांडवलशाही विचारधारादेखील आपल्या संकुचित विचारधारेतून बाहेर पडत उदारमतवादाकडे आकर्षित झाली. त्यातून एकूणच जगाची उद्ध्वस्त झालेली आर्थिक व विकासाची घडी पुन्हा नव्याने सावरण्याकरता कल्याणकारी राज्य (Welfare State) या संकल्पनेला महत्त्व आले. याशिवाय आजवर झालेला आर्थिक विकास, वर्तमानातील विकासाची स्थिती आणि येत्या काळात जो काही विकास साध्य करायचा तो अधिकाधिक शाश्वत तसेच चिरंतन कसा राहील, यावर लक्ष केंद्रित केले गेले.

ढोबळमानाने शाश्वत विकासाचा अर्थ हा 'मानवी विकासासह जो चिरकाल टिकू शकतो असा विकास म्हणजे शाश्वत विकास होय'. ज्याद्वारे वर्तमान पिढीने विकास करताना तो विकास भावी पिढ्यांच्या गरजांची परिपूर्ती करण्यामध्ये आश्वासक असला पाहिजे. अर्थव्यवस्था, पर्यावरण आणि सामाजिक कल्याण यांच्यातील परस्पर संतुलन साध्य होणारा विकास हेच खरे शाश्वत विकासाचे उद्दिष्ट आहे. १९८७ मधील ब्रुटलँड अहवालामुळे शाश्वत विकास ही संकल्पना जागतिक आर्थिक विकासाच्या धोरण निश्चितीमध्ये केंद्रस्थानी आली. पुढे १९९२ मध्ये रिओ दि जेनेरो येथे झालेल्या 'पृथ्वी शिखर परिषदेत' जी चर्चा झाली त्यातून आर्थिक विकासाला 'शाश्वत विकास' या संकल्पनेची प्रभावी जोड देण्याबाबत आंतरराष्ट्रीय पटलावर एकमत झाले. ही उद्दिष्टे २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने स्वीकारली. त्यातून जगातील गरिबी, हवामान बदल, जैवविविधतेची हानी आणि जागतिक अशांतता अशा जागतिक आव्हानांचे प्रतिनिधित्व करणारी संकल्पना म्हणून 'शाश्वत विकास' या संकल्पनेचा सर्वानुमते स्वीकार करण्यात आला. ब्रुटलँड अहवालानुसार शाश्वत विकास म्हणजे, 'भविष्यातील पिढ्यांच्या स्वतःच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतांशी तडजोड न करता वर्तमान गरजा पूर्ण करणारा विकास होय.' यामध्ये दोन महत्त्वपूर्ण संकल्पनांचा अंतर्भाव करण्यात आला, ज्यात 'वर्तमानातील गरजा' आणि 'भविष्यातील पिढीच्या गरजांच्या पूर्ततेची आश्वासकता' या दोन्हींचा समावेश करण्यात आला. खऱ्या अर्थाने हेच शाश्वत विकासाचे ध्येय मानण्यात आले. यानुसार सन २००० ते २०१५ या दहा वर्षांकरिता सहस्त्रकातील विकासाची ध्येये निश्चित करण्यात आली व त्यानुसार २०१५ ते २०३० या काळात शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये गाठण्याचे ठरविण्यात आले.

सहस्रक विकासाची ध्येये ही आंतरराष्ट्रीय विकासाची आठ ध्येये आहेत. या ध्येयांची निर्मिती सप्टेंबर २००० मध्ये न्यूयॉर्क येथे संयुक्त राष्ट्रसंघाच्या मुख्यालयात भरलेल्या शिखर परिषदेतील चर्चेमधून करण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या १९१ सदस्य राष्ट्र आणि २२ आंतरराष्ट्रीय संघटनांनी २०१५ पर्यंत या ध्येयांची पूर्तता साध्य करण्याचे मान्य केले होते. या ध्येयांमध्ये जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी प्रोत्साहन देऊन जगातील गरीब देशांच्या सामाजिक व आर्थिक अवस्थांमध्ये सुधारणा करणे हे प्रमुख ध्येय होते. या कार्याच्या प्रगतीला गती देण्यासाठी जून २००५ मध्ये जी-८ च्या अर्थमंत्र्यांनी जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) आणि आफ्रिकन डेव्हलपमेंट बँक (एएफडीबी) यांना पुरेसा निधी पुरविण्याचे ठरविले. त्याचबरोबर ऋणी व गरीब देशांचे आरोग्य व शिक्षण

सुधारण्यासाठी आणि दारिद्र्य निर्मूलन करण्याकरिता त्यांना संसाधनांचे पुनर्निर्देशित करण्यासाठी ४० ते ५५ अब्ज डॉलर्स कर्ज रद्द करण्याचे मान्य केले.

संयुक्त राष्ट्राने निर्धारित केलेली १७ जागतिक उद्दिष्ट्ये ही 'वैश्विक उद्दिष्ट्ये' किंवा 'निरंतर विकास उद्दिष्ट्ये' म्हणूनही ओळखली जातात. ही व्यापक ध्येये एकमेकांशी निगडित आहेत; परंतु प्रत्येक उद्दिष्टाच्या प्राप्तीचे स्वतःचे लक्ष्य आहेत. सर्व उद्दिष्टांचे एकूण १६९ लक्ष्ये आहेत. यामध्ये सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या अनेक मुद्द्यांचा समावेश आहे. यात गरिबी, उपासमार, आरोग्य, शिक्षण, हवामानातील बदल, लिंग समानता, पाणी, स्वच्छता, ऊर्जा, पर्यावरण आणि सामाजिक न्याय इत्यादींचा समावेश आहे. आपल्या देशाचा जलद आणि सर्वांगीण विकास व्हावा, असे जगातील प्रत्येक देशास वाटत असते. त्याचे दोन हेतू असतात. देशातील लोकांच्या जीवनमानाचा व राहणीमानाचा दर्जा सुधारावा आणि उंचवावा. आपला देश एक आर्थिक प्रगत देश आणि आर्थिक महासत्ता म्हणून जगात उदयास यावा. असा प्रयत्न व विकासाचे धोरण जगातील अनेक देशांनी, प्रामुख्याने प्रगत देशांनी, स्वीकारल्याने पर्यावरण आणि नैसर्गिक साधनांचे अधःपतन होण्यास मदत झाली. त्यातून आज सर्व सजीवसृष्टी आणि पृथ्वीच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. याचा जागतिक पातळीवर अत्यंत गांभीर्याने विचार आणि चिंतन व मनन होऊन शाश्वत विकास ही संकल्पना संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण आणि विकासविषयक आयोगाने १९८० च्या दशकात मांडून विकसित केली. ही संकल्पना एक विकासनीती म्हणून स्वीकारावी, अशी चळवळच सुरू होऊन तसे प्रयत्नही सुरू झाले; मात्र जगात या संकल्पनेचा अजूनही म्हणावा तसा स्वीकार आणि कार्यवाही झाली नाही. या सर्व पार्श्वभूमीवर शाश्वत विकासाशी संबधित अनेक पैलू आणि घटकांचा विचार करणे आवश्यक आणि क्रमप्राप्त ठरते.

काही निओलिबरल 'तज्ज्ञां'च्या मते भारताची आर्थिक वाढ आणि प्रगती ही जागतिकीकरणानंतर म्हणजे १९९१ सालापासूनच सुरू झाली. तर 'आपला इतिहासच १९९१ सालापासून सुरू झाला, त्याच्याअगोदरची वर्षं वायाच गेली, नेहरूंनी आपल्या देशाचं वाटोळं केलं', असंही काही जण म्हणतात! त्यात अर्थातच तथ्य नाही. जर १९४७ ते १९९१ च्या वर्षांत अर्थव्यवस्थेचा आणि शिक्षणाचा आणि इतर अनेक मूलभूत गोष्टींचा पाया घातला गेला नसता, तर १९९१ नंतरची प्रगतीही झाली नसती, हे लोक विसरतात. तसेच आजकाल राष्ट्रीय उत्पादन (जीडीपी) मधली वाढ होणं म्हणजेच सर्वसामान्यांची सर्वांगीण प्रगती होणं अशा प्रचाराचा भडिमार आपल्यावर रोज होतोय याही म्हणण्याला अर्थातच फारसं तथ्य नाही. आता आपल्याला या गोष्टी तपासून बघण्याची वेळ आली आहे. एकतर जागतिकीकरणानंतर खरोखरच जीडीपी वाढला का? जर तो वाढला असेल, तर तो खरंच किती वाढला? आणि सर्वात मुख्य म्हणजे कशा तऱ्हेने वाढला? तो ही सशक्त, टिकाऊ आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वसमावेशक होता का? आणि त्यामुळे खरंच सामान्य लोकांची परिस्थिती सुधारली का? हे सगळं आपल्याला पडताळून बघावं लागेल.

स्वातंत्र्यानंतर म्हणजे १९४७ सालापासून १९८० पर्यंतच्या काळाला 'लायसेन्स राज' असं उपरोधानं म्हटलं जातं. या काळामध्ये आपल्या आर्थिक वाढीचा सरासरी दर ३.५% होता. याला 'हिंदू रेट ऑफ ग्रोथ' असं संबोधून याची चेष्टा केली जाते. पण खरी परिस्थिती काय आहे?

१९४७ ते १९८० या काळात जरी आर्थिक वाढीचा दर सरासरी ३.५% असला, तरी त्याअगोदरच्या काळात तो ०.८% होता, असं गुरूचरण दास यांनी एका लेखात म्हटलंय. म्हणजे तो स्वातंत्र्यानंतर जवळपास ४.५ पटीनं

जास्त वाढला, हे मात्र आपल्यापासून सोयीस्करीत्या लपवलं जातं. स्वातंत्र्यापूर्वी आर्थिक वाढीचा दर कमी असण्याची अनेक कारणं आहेत. एक म्हणजे ब्रिटिशांनी आपल्याकडले उद्योग मारले होते. भारतातून कच्चा माल नेऊन इंग्लंडमधून तयार झालेला पक्का माल भारतात आणून विकायचा, या पद्धतीमुळे भारताची खूपच एकांगी वाढ झाली होती. कापूस, लोखंड, मसाल्याचे पदार्थ, ताग अशा अनेक गोष्टी इंग्लंडला नेण्याकरिता आणि तिकडे तयार झालेला पक्का माल भारतात विकण्याकरिता ज्या बंदरांची, ज्या रेल्वेची, ज्या रस्त्यांची आणि ज्या उद्योगांची गरज होती; तेवढ्याच गोष्टी आणि तेवढेच उद्योग ब्रिटिशांनी भारतात वाढू दिले. अर्थातच, भारतातील उद्योजकांना ही गळचेपी मान्य नव्हती आणि म्हणूनच भारतीय स्वातंत्र्य चळवळीला अनेक उद्योजकांनी पाठिंबा दिला. एका अर्थाने भारतीय स्वातंत्र्यलढा हा भारतीय भांडवलदार आणि इंग्लंडमधले भांडवलदार यांच्यातील भारतीय बाजारपेठेसाठी असलेला लढा होता. कित्येक वेळा एकमेकांशी सख्य करत, पण अनेकदा एकमेकांच्याविरुद्ध ठाकत अशा तऱ्हेने हा लढा चालू राहिला. या संघर्षात जिथे भारतीय उद्योजकांनी आक्रमक पवित्रा घेतला आणि जिथे ब्रिटिश उद्योजकांना तो फार हानिकारक नव्हता, असे उद्योग मात्र ब्रिटिशांनी भारतात वाढू दिले. या सगळ्या प्रक्रियेत एक मात्र चांगलं झालं की, भारतात भांडवलशाहीची आणि लोकशाहीची बीजं स्वातंत्र्य मिळण्याअगोदरपासूनच रोवली गेली.

भारतासाठी हे ब्रिटिश राजवटीचं वरदानच होतं. यामुळेच भारत सरंजामशाहीतून बऱ्याच प्रमाणात डोकं वरती काढू शकला. पण एवढं असूनही भारतातले उद्योग पूर्ण खुल्या तऱ्हेने वाढू शकले नाहीत. शिवाय ब्रिटिश काळात शेतीची खूपच अधोगती झाली होती. म्हणूनच या काळात आर्थिक वाढीचा दर १%हून कमी म्हणजे ०.८% इतकाच राहिला. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारताला अर्थव्यवस्थेची पायाभरणीच करायची होती. धरणे, रस्ते, राज्य परिवहन (एस.टी.), रेल्वे, विमानवाहतूक, विमानतळे, बंदर, जहाज, जहाजवाहतूक, कालवे, पाटबंधारे, पोस्टव्यवस्था, दूरसंचार (टेलिफोन्स इ.), वीज, कोळसा, तेल, स्टील, शिक्षण आणि आरोग्य अशा अनेक बाबतीत मूलभूत उभारणी याच काळात झाली. ही उभारणी जरी पूर्णपणे समाधानकारक झाली नसली, तरी या सगळ्यांची गरज समाजाला तर होतीच; पण उद्योगधंद्यांनासुद्धा होती; कारण या सगळ्या पायाभूत गोष्टींच्या प्रगतीशिवाय साबण, शाम्पू, टूथपेस्ट, खाद्यपदार्थ, पेयं, कपडे, बूट, टीव्ही, घरं, मोटारगाड्या, सायकल, रेडिओ अशा शेकडो गोष्टींचं उत्पादन करून नफा मिळवणं खाजगी उद्योगांना शक्यच नव्हतं. पण रेल्वे, वीज, शिक्षण, रस्ते वगैरे या मूलभूत सुविधा निर्माण करणं हे खाजगी उद्योगांसाठी (निदान त्याकाळी तरी) फार फायदेशीर नव्हतं. एकतर त्याला खूप मोठ्या प्रमाणात भांडवल लागतं आणि शिवाय त्यातल्या कित्येकांवर नफा मिळण्याची खात्री नसते आणि कित्येकांवर नफा मिळालाच, तरी तो खूप कमी आणि खूप उशिरा मिळतो. म्हणूनच त्या काळी खाजगी उद्योग या पायाभूत क्षेत्रात फारसे शिरू इच्छित नव्हते. पण हा सगळा पाया तर रचायला हवाच होता. मग करायचं काय? म्हणून मग हे काम सरकारवर टाकण्यात आलं, त्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात १९४४ साली 'बॉम्बे प्लॅन' नावाची एक योजना आखण्यात आली. यात टाटा, बिर्लासारखे अनेक मोठे उद्योजक होते. त्या सगळ्यांनी या सगळ्या मूलभूत सुविधांसाठी सरकारनं गुंतवणूक करावी, असं 'बॉम्बे प्लॅन'मध्ये मांडलं आणि यातूनच पब्लिक सेक्टर म्हणजे 'सरकारी क्षेत्र' निर्माण झालं.

भारतीय शेती सध्या एका प्रचंड अरिष्टातून जात आहे. भारत हा शेतीप्रधान देश आहे, असं आपण म्हणतो. पूर्वी तर शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा

खूपच महत्त्वाचा आणि मोठा भाग होता. पण जसजसे उद्योग वाढले आणि १९८०च्या दशकानंतर सेवाक्षेत्र वाढलं, तसतसं शेतीकडे दुर्लक्ष व्हायला लागलं. आजही भारतातले ७०% लोक खेड्यांत राहतात आणि भारतातले ५५-५७% लोक शेतीवर अवलंबून आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थानं आपला देश अजूनही शेतीप्रधानच आहे. पण आज शेतीचा आपल्या जीडीपीतला वाटा कमी कमी होत फक्त १५-१७% वर आला आहे. जर देशातली ७०% जनता देशातलं फक्त १७% उत्पन्न निर्माण करत असेल, तर याचा थोडक्यात अर्थ म्हणजे आपली शेतीमधली उत्पादकता प्रचंड कमी आहे. शिवाय आपण शेतीमध्ये फारशी गुंतवणूकही करत नाही. जागतिकीकरणानंतर शेतीतल्या गुंतवणुकीचं एकूण गुंतवणुकीतील प्रमाण कमी कमी होत गेलं. १९७० च्या दशकात ते १७% होतं, तर १९८० च्या दशकात ते १२% झालं आणि १९९०च्या दशकात ते फक्त ९% झालं. अलीकडल्या पंचवार्षिक योजनेत तर हे प्रमाण ५% वर आलंय.

भारतात शेतीचं बकालीकरण होत असतानाच उद्योग वाढले आणि उद्योगधंदेसुद्धा मजबूत आणि सुदृढ तऱ्हेनं वाढण्याअगोदरच सेवाक्षेत्र चढायला लागले. आज ५७% लोक ग्रामीण भागात राहूनसुद्धा जीडीपीमधील शेतीचं योगदान फक्त १७%च आहे. अर्थातच शेतीक्षेत्रात प्रचंड मोठ्या प्रमाणात दारिद्र्य, बेकारी आणि अर्धबेकारी आहे. १९९१च्या म्हणजे जागतिकीकरणाच्या अगोदर शेतीउत्पादनात दरवर्षी सरासरी ३.३९% ने वाढ होत होती, तर जागतिकीकरणाच्या १९९१-२००७च्या दरम्यान त्या वाढीचा दर हा सरासरी दरवर्षी २.७७% एवढा घटला. म्हणजे शेती उत्पादनाच्या वाढीचा दर जागतिकीकरणानंतर चक्क घटला. २००८ सालापासून २०१८ पर्यंत शेतीतली अधोगती सुरूच राहिली, यातल्या कित्येक वर्षात शेतीतल्या वाढीचा दर खूपच कमी आणि काही वर्षात तर चक्क निगेटिव्ह होता. १९९५ सालापासून आतापर्यंत ३.५ लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. म्हणजे दर बारा तासाला एक. 'तामिळनाडू स्टेट ॲक्शन प्लॅन ऑन क्लायमेट चेंज (TNSAPCC)' यांनी शेतीविषयी एक महत्त्वाचं विधान केलंय, ते म्हणतात, 'शेतीतल्या १% वाढीमुळे जे दारिद्र्य निर्मूलन होतं, तेवढं दारिद्र्य निर्मूलन व्हायला इतर क्षेत्रांमध्ये २-३% वाढ व्हावी लागते, असा आतापर्यंतचा जागतिक अनुभव आहे.' एवढं असूनही आपण शेतीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आलोय. याच काळात पर्यावरणाचा प्रश्न खूपच गंभीर होत चालला. ऋतूंमध्ये बदलही आपल्याला जवळपास दरवर्षी मोठ्या प्रमाणात जाणवायला लागले. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेननं सेंट्रल पोल्यूशन कंट्रोल बोर्डची २०१८ सालची आकडेवारी वापरून काढलेल्या निष्कर्षाप्रमाणे जगातल्या सगळ्यात जास्त प्रदूषित १५ शहरांमधली १४ शहरं भारतात होती! येल विद्यापीठातल्या एका रिपोर्टप्रमाणे १८० देशातल्या एन्व्हायरनमेंटल पर्फोर्मन्स इंडेक्स (EPI) मध्ये भारताचा नंबर १७७ होता. एन्व्हायनमेंटल हेल्थ (पर्यावरणीय आरोग्य) मध्ये शेवटचा म्हणजे १८० वा नंबर होता तर हवेच्या दर्जात (एअर क्वॉलिटी) १८० देशात १७८ वा नंबर होता. या सर्व पार्श्वभूमीवर भारत विकसित होत असताना पर्यावरणीय उन्नतीचा देखील विचार करून त्यावर उपाय करावे लागतील.

पब्लिक सेक्टरकडून प्रचंड मोठी भांडवलाची गुंतवणूक करून बराच तोटा सहन करून या पायाभूत उद्योगांची आणि सेवांची उभारणी या काळात झाली. म्हणूनच आर्थिक वाढीचा दर हा ३.५% एवढाच राहिला. स्वातंत्र्यानंतर सगळंच नवीन उभं करायचं होतं आणि त्यापूर्वी जीडीपीचा वाढीचा दर हा फक्त ०.८% होता, हे लक्षात घेतलं, तर ३.५%चा आर्थिक वाढीचा 'हिंदू रेट ऑफ ग्रोथ' हा आपल्याला खूपच म्हणजे आश्चर्यजनकरीत्या चांगला होता, हे लक्षात येईल. पायाभूत उद्योग आणि सेवा यांच्यात झालेली वाढ,

शिक्षणामधली वाढ, टीआयएफआर, बीएआरसी, इस्रो, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, आयआयएम्स अशा अनेक संस्था, आयआयटीसारखी स्थापन झालेली अनेक इंजिनियरिंग कॉलेजेस या सगळ्यांमुळेच १९९०च्या दशकानंतर भारताच्या इन्फोटेकसारख्या सेवाक्षेत्राची वाढ होऊ शकली आणि आर्थिक विकासाचा दर वाढू शकला. हे आज बहुतांशी सगळे विवेकवादी विचार करणारे तज्ज्ञ मान्य करतात. याचा अर्थ, पब्लिक सेक्टरमध्ये किंवा लायसेन्स राजमध्ये सगळं आबादीआबाद होतं, असं नक्कीच नाही. त्यात बरेच दोष होते, गोष्टी सावकाश घडत, नोकरशाही मोठीच होती आणि भ्रष्टाचारही होता, हे खरंच होतं. पण त्या काळातल्या महत्त्वाच्या पायाभरणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलं जाणं ही मात्र प्रचंड चुकीची आणि प्रचारकी गोष्ट आहे, हे विसरता कामा नये. अधिक न्याय्य जगाचा पाठपुरावा करण्यासाठी, संयुक्त राष्ट्रांनी २०१५ मध्ये शाश्वत विकास उद्दिष्ट्ये (SDGs) निश्चित केली, विविध गंभीर समस्यांचे निराकरण करण्यासाठी देशांसाठी ब्लू प्रिंट असणारे 'नो पॉव्हर्टी' हे पहिले उद्दिष्ट २०३० पर्यंत सर्व प्रकारची आत्यंतिक गरिबी संपवण्यावर भर देते. हे लक्ष्य साध्य करण्यासाठी कटिबद्ध असलेल्या देशांपैकी भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या राष्ट्रांपैकी एक आहे. गेल्या दशकात, भारताने दारिद्र्य कमी करण्यासाठी लक्षणीय प्रगती केली आहे, असे असले तरी पुढचा मार्ग लांब आणि आव्हानात्मक आहे.

SDGs स्वीकारल्यापासून, भारत सरकारने दारिद्र्य निर्मूलनाच्या उद्देशाने अनेक उपक्रम सुरू केले आहेत. असाच एक उपक्रम म्हणजे प्रधानमंत्री जनधन योजना (PMJDY), एक राष्ट्रीयीकृत बँक खाते योजना जी समाजातील वंचित घटकांना आर्थिक समावेशन प्रदान करते. २०१४ मध्ये सादर करण्यात आलेले, PMJDYने ४०० दशलक्षांहून अधिक भारतीयांसाठी बँक खाती उघडली आहेत, आर्थिक सेवांमध्ये प्रवेश करणे आणि आर्थिक सहभागास प्रोत्साहन देणे. याव्यतिरिक्त सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (MGNREGA) सारख्या सामाजिक कल्याण योजनांसाठी निधीचे वाटप वाढवले आहे, जे ग्रामीण कामगारांना किमान वेतन सुनिश्चित करते, ज्यामुळे अन्नसुरक्षा सुनिश्चित होते आणि गरिबीच्या काळात सुरक्षा जाळे प्रदान केले जातात.

नीती आयोगाच्या शाश्वत विकास ध्येये निर्देशांक अहवाल २०२३-२४ नुसार, सन २०१५-१६ साली दारिद्र्यात जगणाऱ्या सर्व वयोगटातील पुरुष, महिला आणि मुलांचे प्रमाण हे एकूण लोकसंख्येच्या २४.८५% एवढे होते जे की, २०१९-२० साली १४.९६% पर्यंत कमी झाले आहे. सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीमध्ये २४.८२ कोटी लोकांना बहुआयामी दारिद्र्यातून (Multidimensional Poverty) बाहेर काढण्यात यश आलेले आहे. भारतात बँकेमार्फत कर्जपुरवठा झालेल्या स्वयं-सहाय्यता गटांची संख्या सन २०१५-१६ साली सुमारे १८.३२ लाख होती. ती सन २०२३-२४ साली ४४.१५ लाखांपर्यंत वाढली आहे. असे असले तरी भारतातील आर्थिक विषमता मात्र गेल्या काही वर्षात घटलेली दिसत नाही. जागतिक बँकेच्या २०२४ मधील अहवालानुसार, सन १९७७ ते २०२१ या कालावधीत भारतातील आर्थिक विषमता वाढली आहे. ही आर्थिक विषमतेतील वाढ समजून घेण्यासाठी गिनी निर्देशांकाचा आधार घेता येईल. वर्ष १९७७ मध्ये भारतातील गिनी निर्देशांक हा ३३.२१ एवढा होता. तो सन २०१७ साली ३५.९ पर्यंत वाढलेला दिसतो. म्हणजेच भारतातील दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम हे आर्थिक विषमता कमी करण्यास असफल ठरलेले दिसतात.

भारताने विकाससंदर्भातील अनेक क्षेत्रांत प्रगती केली असली तरीही अजूनही, SDG 4 अंतर्गत शैक्षणिक

विकाससंदर्भात निर्धारित लक्ष्य साध्य करण्यात आव्हाने कायम आहेत. विविध प्रदेश, समुदाय आणि लिंगांमध्ये शैक्षणिक प्रवेश आणि गुणवत्तेतील असमानता कायम आहे. ग्रामीण भागात अनेकदा महत्त्वपूर्ण अडथळ्यांचा सामना करावा लागतो, ज्यात अपुरी पायाभूत सुविधा, पात्र शिक्षकांची कमतरता आणि सामाजिक-आर्थिक अडथळे यांचा समावेश होतो जे मुलांच्या शाळेत सातत्याने जाण्याच्या क्षमतेस अडथळा आणतात. कोविड-१९ साथीच्या रोगाने या असमानता आणखी वाढवल्या आहेत, लाखो मुलांनी प्रदीर्घ काळ शाळा बंद राहिल्यामुळे आणि ऑनलाइन शिक्षणाच्या मर्यादित प्रवेशामुळे शिक्षणाचा मौल्यवान वेळ गमावला आहे. भारतात आजही माध्यमिक शिक्षणातील वार्षिक सरासरी गळतीचे प्रमाण १२.६०% आहे. भारतात इयत्ता ८ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी भाषा आणि गणितात किमान प्रावीण्य असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण फक्त ७७.२३% एवढे आहे. भारतात एकूण दिव्यांग विद्यार्थ्यांपैकी फक्त १९.३०% दिव्यांग विद्यार्थी हे किमान माध्यमिक शिक्षण पूर्ण करतात.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या २०२४च्या अहवालानुसार, भारतात उच्च शिक्षणातील विद्यार्थी-शिक्षक प्रमाण हे २४:१ इतके कमी आहे. जगातील इतर राष्ट्रांशी तुलना करता भारतातील या स्थितीचे भारताने या क्षेत्रात प्रगती केली असली तरीही अजूनही, SDG 4 अंतर्गत निर्धारित लक्ष्य साध्य करण्यात आव्हाने कायम आहेत. विविध प्रदेश, समुदाय आणि लिंगांमध्ये शैक्षणिक प्रवेश आणि गुणवत्तेतील असमानता कायम आहे. ग्रामीण भागात अनेकदा महत्त्वपूर्ण अडथळ्यांचा सामना करावा लागतो, ज्यात अपुरी पायाभूत सुविधा, पात्र शिक्षकांची कमतरता आणि सामाजिक-आर्थिक अडथळे यांचा समावेश होतो जे मुलांच्या शाळेत सातत्याने जाण्याच्या क्षमतेस अडथळा आणतात. कोविड-१९ साथीच्या रोगाने या असमानता आणखी वाढवल्या आहेत, लाखो मुलांनी प्रदीर्घ काळ शाळा बंद राहिल्यामुळे आणि ऑनलाइन शिक्षणाच्या मर्यादित प्रवेशामुळे शिक्षणाचा मौल्यवान वेळ गमावला आहे. भारतात आजही माध्यमिक शिक्षणातील वार्षिक सरासरी गळतीचे प्रमाण १२.६०% आहे. भारतात इयत्ता ८ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी भाषा आणि गणितात किमान प्रावीण्य असणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण फक्त ७७.२३% एवढे आहे. भारतात एकूण दिव्यांग विद्यार्थ्यांपैकी फक्त १९.३०% दिव्यांग विद्यार्थी हे किमान माध्यमिक शिक्षण पूर्ण करतात. Education Quality Upgradation and Inclusion Programme (EQUIP) report, 2024 Ministry of Human Resource and Development च्या अहवालानुसार, सन २०१३-१४ ते २०१७-१८ या काळात भारतातील उच्च शिक्षणातील नोंदणी प्रमाण (Enrollment Ratio) जरी वाढले असले, तरी उच्च शिक्षणातील शिक्षकांची संख्या ही १३,६७,५३५ वरून १२,८४,७५५ पर्यंत घटली आहे. केंद्रीय विद्यापीठ, राज्य विद्यापीठ आणि खाजगी विद्यापीठातील सुमारे ५ लाख प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहेत. भारतातील उच्च शिक्षण संस्थांमधील प्राध्यापकांची ३३% पदे रिक्त आहेत. उच्च शिक्षणातील महिला शिक्षकांची स्थिती फार गंभीर आहे. भारतात उच्च शिक्षण स्तरावरील दर १०० पुरुष प्राध्यापकांमागे ७२ महिला प्राध्यापिका, अनुसूचित जातींमधील दर १०० प्राध्यापकांमागे फक्त ५६ महिला प्राध्यापक उपलब्ध असल्याचे दिसून येते. त्यातूनच उद्याचा विकसित भारत निर्माण करण्यामध्ये मानवी भांडवल सक्षम करण्यामध्ये आपण किती गंभीर आहोत हे दिसून येते.

विकासाची नेमकी व्याख्या काय? तो आर्थिक असावा, की सर्वांगीण असावा? प्रगत देशाची व्याख्या काय? सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढीचा वेग, दरडोई उत्पन्न यांचे आकडे एकीकडे, तर दुसरीकडे कुपोषण, बालमृत्यू,

दारिद्र्य, निरक्षरता या समस्यांचे निराकरण पुरेशा वेगाने होताना दिसत नाही. मग अशा देशाला वा देशांना प्रगत मानायचे का, यावर विश्लेषकांमध्ये नेहमीच खल सुरू असतो. संयुक्त राष्ट्र विकास उपक्रमातर्फे (यूएनडीपी) प्रसूत झालेल्या विविध देशांच्या मानवी विकास निर्देशांकांच्या (ह्यूमन डेव्हलपमेंट इंडेक्स-एचडीआय) निमित्ताने अशा प्रश्नांची दखल घ्यावी लागते. एचडीआय क्रमवारीत १८९ देशांमध्ये भारताचा क्रमांक यंदा १३१ वा आला. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही अधोगती. म्हणजे त्यावेळी आपण १२९व्या क्रमांकावर होतो. यंदा आपल्या कामगिरीत किंचित सुधारणा झाली, पण इतरांचीही ती सुधारली. त्यामुळे ही घसरण. दीर्घाआयुरारोग्य, शिक्षणाची संधी आणि जीवनमानाचा दर्जा या तीन प्रमुख निकषांवर ही क्रमवारी आधारित आहे. वास्तविक, प्रत्येक देशामध्ये निराळी धोरणे, निराळी सरकारे, निराळी परिस्थिती. त्यामुळे परस्परांशी तुलना अप्रस्तुत ठरते. तरीही वानगीदाखल बोलायचे झाल्यास यंदाच्या यादीत नॉर्वे, आर्यलँड, स्वित्झर्लंड, हाँगकाँग आणि आइसलॅन्ड हे पहिल्या पाचांत आहेत. श्रीलंका आणि चीन हे आपले शेजारी आपल्यापुढे (आणि पहिल्या शंभरात) आहेत. बाकीचे म्हणजे बांगलादेश, म्यानमार, पाकिस्तान, अफगाणिस्तान आपल्यामागे आहेत. परंतु जगातील दुसऱ्या क्रमांकाची लोकसंख्या, पहिल्या क्रमांकाची लोकशाही, क्रयशक्ती तुल्यतेच्या निकषावर जगातील पाचव्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था असूनही आपण सातत्याने इतके मागे का राहातो, याचा अलीकडे विचार करणे गरजेचे आहे. दोन वर्षांपूर्वीपर्यंत भारताचा विकासदर जगात सर्वाधिक होता. तरी त्याही वर्षी मानवी विकास निर्देशांकाच्या बाबतीत आपण पहिल्या शंभरातही नव्हतो, याचे कारण आपल्याला अशा विकास प्रारूपाची चटक लागली आहे का, जे समन्यायी आणि सर्वांगीण नाही? एका अर्थाने, सर्वच नवप्रगत देशांची ही शोकांतिका ठरत आहे. चीन, रशिया, ब्राझील, भारत, दक्षिण आफ्रिका अशा नवप्रगत अर्थव्यवस्थांचा ब्रिक्स गट किंवा मेक्सिको, तुर्कस्तान, इंडोनेशिया अशा देशांमध्ये आर्थिक, औद्योगिक विकास वेगात होत असताना, त्याच्या फायद्यापासून लोकसंख्येचा एक प्रचंड हिस्सा वंचित राहिलेला दिसून येतो. या सर्वच देशांनी पाश्चिमात्त्य आर्थिक विकासाचे प्रारूप स्वीकारताना, त्या देशांचे मानवी विकास प्रारूप मात्र तितक्या आत्मीयतेने अंगीकारले नाही. त्यामुळे अन्न, वस्त्र, निवाऱ्याइतक्याच आरोग्य आणि शिक्षण याही आधुनिक मानवाच्या मूलभूत गरजा बनल्या आहेत हे आमच्या गळी उतरलेले नाही. आठ टक्क्यांहून अधिक वेगाने वाढत असल्याबद्दल आपण स्वतःची पाठ थोपटून घेत होतो त्यावेळीही डॉ. अमर्त्य सेन यांच्यासारखे अर्थतज्ज्ञ बजावत होते की, हा दर राखणे भारतासारख्या देशासाठी गौरवास्पद नव्हे तर अनिवार्य ठरते. अन्यथा, कित्येक लाख लोक भुकेकंगाल राहातील. भारताच्या दृष्टीने आणखी एक खटकणारी बाब म्हणजे, अनेक नवप्रगत देश किंवा आपले बहुतेक शेजारी देश यांच्यापेक्षा येथील लोकशाही व्यवस्था सशक्त आणि सळसळती आहे. चीनप्रमाणे आपण वेचक भागांमध्ये प्रगती होऊ दिली आणि निवडक भागात ती रोखली असे केलेले नाही. तरीही भारतातल्या भारतातही केरळसारखी राज्ये मानवी विकास निर्देशांकात पुढे आणि बिहारसारखी राज्ये मागे असे असमान चित्र दिसून येते. तेथे समतोल होत नाही तोवर आपली गणना मागास देशांमध्येच होत राहील. कारण विकासाला मानवी चेहरा मिळाला, तरच तो खरा आणि शाश्वत विकास ठरतो.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. Brundtland, G .H. (1991). Our common future. In Elsevier eBooks (pp.29–31). https://doi.org/10.1016/b978-0-7506-1049-0.50009-5
2. Central Pollution Control Board. (2009). Comprehensive

Environmental Assessment of Industrial Clusters Ecological Impact Assessment Series: EIAS/5/2009–2010. In https://cpcb.nic.in/. Ministry of Environment and Forest, Government of India. Retrieved January 11, 2025, from https://cpcb.nic.in/
3. Department for Promotion of Industry and Internal Trade. (2021). "Startup India Initiative."
4. Election Commission of India. (2024). Election Results - Full Statistical Reports. Retrieved January 17, 2025, from https://www.eci.gov.in/statistical-reports
5. Female Labour Utilization in India Report. (2023). In https://dge.gov.in/. Ministry of Labour and Employment. Retrieved January 17, 2025, from https://dge.gov.in/dge/sites/default/files/2023-05/Female_Labour_Utilization_in_India_April_2023_final__1_-pages-1-2-merged__1_.pdf
6. Government of India. (2020). "National Infrastructure Pipeline."
7. IFHV. (2024). Global Hunger Index 2024: How Gender Justice Can Advance Climate Resilience and Zero Hunger. In https://www.globalhungerindex.org/. Retrieved January 17, 2025, from https://www.globalhungerindex.org/pdf/en/2024.pdf
8. IPCC, 2014: Climate Change 2014: Synthesis Report. Contribution of Working Groups I, II and III to the Fifth Assessment Report of the Intergovernmental Panel on Climate Change [Core Writing Team, R.K. Pachauri and L.A. Meyer (eds.)]. IPCC, Geneva, Switzerland, 151 pp.
9. Joshi SR, Parikh RM. India--diabetes capital of the world: now heading towards hypertension. J Assoc Physicians India. 2007 May; 55:323-4. PMID: 17844690.
10. Kumar. J, C.R., Majid, M.A. Renewable energy for sustainable development in India: current status, future prospects, challenges, employment, and investment opportunities. Energy Sustain Soc10, 2 (2020). https://doi.org/10.1186/s13705-019-0232-1
11. Ministry of Agriculture and Farmers Welfare. (2023). Consumption of chemical pesticides in various States/UTs during 2018-19 to 2022-23. https://ppqs.gov.in/. Retrieved January 11, 2025, from https://ppqs.gov.in/statistical-database
12. Ministry of Finance. (2021). "Economic Survey of India 2020-21."
13. Ministry of Human Resource and Development. (2024). Education Quality Upgradation and Inclusion Programme (EQUIP). In https://sgbau.ac.in/. Government of India. Retrieved January 17, 2025, from https://sgbau.ac.in/pdf/385EQUIP%20Report%20(2).pdf
14. Ministry of Statistics and Programme Implementation. (2021). "Annual Report 2020-21."
15. National Crime Records Bureau. (2023). Crime in India 2022: Statistics Volume I. Ministry of Home Affairs, GoI. Retrieved January 17, 2025, from https://www.ncrb.gov.in
16. NITI Aayog, GoI. (2024). SDG India

Index 2023-24. In https://www.niti.gov.in. Retrieved January 17, 2025, from https://www.niti.gov.in/sites/default/files/2024-07/SDA_INDIA.pdf
17. Partnership for Action on Green Economy. (2023). Assessment of India's Green Jobs and Just Transition Policy Readiness. In https://www.un-page.org. PAGE. Retrieved January 17, 2025, from https://www.un-page.org
18. Prinja, S., Dixit, J., Gupta, N., Dhankhar, A., Kataki, A. C., Roy, P. S., Mehra, N., Kumar, L., Singh, A., Malhotra, P., Goyal, A., Rajsekar, K., Krishnamurthy, M. N., & Gupta, S. (2023). Financial toxicity of cancer treatment in India: towards closing the cancer care gap. Frontiers in Public Health, 11. https://doi.org/10.3389/fpubh.2023.1065737
19. UNDP (United Nations Development Programme). 2024. 2024 Global Multidimensional Poverty Index (MPI): Poverty amid conflict. New York.
20. UNESCO. (2021). UNESCO Science Report: The race against time for smarter development. In https://www.unesco.org/. Retrieved January 17, 2025, from https://www.unesco.org
21. World Bank. (2020). "Ease of Doing Business Report."
22. World Bank. 2024. The World Bank Annual Report 2024. © Washington, DC: World Bank.
23. World Inequality Report 2022. (2022). In Harvard University Press eBooks. https://doi.org/10.4159/9780674276598 \

◆

वापरलेली नाहीत अशी यंत्रे भांडवल नाहीत.

चळवळ हा नफ्याचा घटक आहे.

**- कार्ल मार्क्स**

# आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५: एक चिकित्सा

**राहुल शं. म्होपरे** †
**गणेश आ. टेकळे** ††

**प्रस्तावना**

आर्थिक पाहणी अहवाल सत्यता दाखवत असल्याने त्याचे महत्त्व जास्त असते. २०४७ ला विकसित भारत करण्यासाठी पुढील काही वर्षांत कोणती ध्येये पूर्ण करता येतील, या अनुषंगाने अनंत नगेश्वरण यांनी आर्थिक पाहणी अहवाल तयार केला आहे. दरवर्षी,अर्थ मंत्रालयामध्ये, भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार (Chief Economic Adviser, CEA) आणि त्यांचे किंवा त्यांचे कर्मचारी आर्थिक पाहणी अहवालासाठी माहिती व तपशील संकलित करतात. CEAच्या निर्देशानुसार, केंद्रीय अर्थमंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाचा (Department of Economic Affairs, DEA)आर्थिक विभाग (Economic Division) आर्थिक पाहणी अहवाल तयार करतो. भारताचे अर्थमंत्री संसदेत त्याचे सादरीकरण करतात. मागील वर्षाच्या अर्थव्यवस्थेच्या स्थितीचे परीक्षण, मागील आर्थिक वर्षातील देशाच्या आर्थिक कामगिरीचा संपूर्ण सारांश आणि इतर घटकांसह सांख्यिकीय माहिती अहवालात समाविष्ट असते.

केंद्रीय अर्थसंकल्पापूर्वी आर्थिक पाहणी अहवाल संसदेत विचारार्थ सादर केला जातो. १९५०-५१ मध्ये भारताचा पहिला आर्थिक पाहणी अहवाल प्रकाशित झाला. आर्थिक पाहणी अहवाल १९६४ पर्यंत केंद्रीय अर्थसंकल्पासोबत सादर केला जात होता, त्यानंतर अर्थसंकल्पाच्याआधी त्याचे सादरीकरण केले जाऊ लागले. आर्थिक सर्वेक्षणाच्या शिफारशी आणि त्यांचे सरकारने सादरीकरण करणे, हे संविधानानुसार बंधनकारक नाही (म्होपरे आणि टेकळे, २०२४). यावर्षी ३१ जानेवारी रोजी आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर केल्यानंतर, त्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे १ फेब्रुवारी २०२५ रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर केला. अर्थमंत्री म्हणून निर्मला सीतारमण यांना सातवेळा अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मिळाली असून हा त्यांचा आठवा अर्थसंकल्प होता. अर्थसंकल्पीय अधिवेशनाला ३१ जानेवारीपासून सुरुवात झाली असून, ४ एप्रिलपर्यंत हे अधिवेशन चालणार आहे (Khare, 2025).

† प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग (पदवी व पदव्यूत्तर), देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. ११९४, भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०, ई-मेल : rahulmhopare@rediffmail.com
††संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. २००० , भ्रमणध्वनी : ८६००८०४१०७, ई-मेल : ganeshtekale159@gmail.com

आर्थिक पाहणी अहवालात देशाच्या आर्थिक घडामोडींकडे लक्ष वेधून त्यावर मीमांसा केली जाते आणि केंद्रीय अर्थसंकल्पात निधी कसा गोळा आणि वितरित केला जातो, याचे आकलन सुलभ केलेले असते. अहवालात, पायाभूत सुविधा, रोजगार, पैशाची उपलब्धता, किंमती, आयात, निर्यात, परकीय चलनसाठा आणि अर्थसंकल्पावर परिणाम करणाऱ्या इतर महत्त्वाच्या आर्थिक उपाययोजना यासारख्या गोष्टींचे नमुने तपासले जातात. यामुळे विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, संशोधक, गृहिणी, नोकरदार, कामगार, शेतकरी व देशातील प्रत्येक अर्थशास्त्र अभ्यासकांस आर्थिक पाहणी अहवाल अभ्यासणे अपरिहार्य आहे (म्होपरे आणि टेकळे, २०२४). म्हणून या कारणास्तव प्रस्तुत लेखात आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ मधील काही मुख्य विषयांवर ठळकपणे विवेचन केले आहे.

**आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५ मधील घटक**

| अ. क्र. | घटक |
|---|---|
| १ | अर्थव्यवस्थेची स्थिती: वेगवान प्रगतीकडे वाटचाल (State of the Economy: Getting Back into the Fast Lane) |
| २ | आर्थिक व वित्तीय क्षेत्रातील घडामोडी: गाडी आणि घोडा (Monetary and Financial Sector Developments: The Cart and The Horse) |
| ३ | बाह्यक्षेत्र: थेट विदेशी गुंतवणूक (FDI) योग्य प्रकारे मिळवणे (External Sector: Getting FDI right) |
| ४ | किंमती आणि महागाई: गतिशीलता समजून घेणे (Prices and Inflation: Understanding the dynamics) |
| ५ | मध्यमकालीन दृष्टिकोन: निर्बंधमुक्त धोरणामुळे वाढीस चालना (Medium Term Outlook: Deregulation drives growth) |
| ६ | गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा: प्रगती कायम ठेवणे (Investment and Infrastructure: Keeping it going) |
| ७ | उद्योग: व्यवसाय सुधारणा आणि विकास (Industry: All about Business Reforms) |
| ८ | सेवाक्षेत्र: जुन्या अनुभवी क्षेत्रासाठी नवी आव्हाने (Services: New challenges for the old war horse) |
| ९ | शेती आणि अन्न व्यवस्थापन: भविष्यातील प्रमुख क्षेत्र (Agriculture and Food Management: Sector of the future) |
| १० | हवामान आणि पर्यावरण: अनुकूलनाची गरज (Climate and Environment: Adaptation matters) |
| ११ | सामाजिक क्षेत्र: पोहोच वाढवणे आणि सक्षमीकरणास चालना (Social Sector: Extending reach and driving empowerment) |
| १२ | रोजगार आणि कौशल्य विकास: अस्तित्वाच्या प्राथमिकता (Employment and Skill Development: Existential priorities) |
| १३ | एआय युगातील मजूरवर्ग: संकट की संधी? (Labour in the AI era: Crisis or Catalyst) |

स्त्रोत: आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५

**अर्थव्यवस्थेची स्थिती**

२०२४ मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेची ३.२% दर वाढ, तर २०२५ मध्ये ती ३.३% होईल, असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (IMF) अंदाज व्यक्त केला आहे. पुरवठा साखळीतील अडचणींमुळे उत्पादन क्षेत्राची गती मंदावली असली, तरी सेवाक्षेत्र मजबूत राहिले आहे. जागतिक स्तरावर महागाई काही प्रमाणात नियंत्रणात आली आहे; परंतु सेवाक्षेत्रातील महागाई कायम असल्यामुळे विविध देशांतील मध्यवर्ती बँकांनी वेगवेगळ्या आर्थिक धोरणांचा अवलंब केला आहे. रशिया-युक्रेन युद्ध आणि इस्रायल-हमास संघर्षामुळे व्यापार, ऊर्जा सुरक्षा आणि महागाई यावर परिणाम झाला आहे. विशेषतः, सुएझ कालव्यातील व्यत्ययामुळे जहाजांना केप ऑफ गुड होपमार्गे पर्यायी मार्ग निवडावा लागला, ज्यामुळे मालवाहतुकीच्या खर्चात आणि वितरणाच्या कालावधीत वाढ झाली.

भारताच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने, वित्तीय वर्ष २०२५-२६ मध्ये (FY26) भारताचा GDP ६.३% ते ६.८% दरम्यान राहाण्याचा अंदाज आहे, तर वित्तीय वर्ष २०२४-२५ (FY25) मध्ये वास्तविक GVA ६.४% राहाण्याचा अंदाज आहे. क्षेत्रवार कामगिरी पाहाता, शेतीक्षेत्राचा विकासदर FY25 मध्ये ३.८% राहील, जो विक्रमी खरीप उत्पादन आणि मजबूत ग्रामीण मागणीमुळे शक्य होईल. औद्योगिक आणि उत्पादन क्षेत्र ६.२% दराने वाढण्याचा अंदाज आहे; परंतु जागतिक मागणीतील कमतरतेमुळे उत्पादन क्षेत्र काहीसे मंदावले आहे. सेवाक्षेत्र हे सर्वात वेगाने वाढणारे क्षेत्र ठरले असून, FY25 मध्ये तो ७.२% दराने वाढेल, ज्याला IT, वित्तीय सेवा आणि हॉस्पिटॅलिटी उद्योग चालना देतील. बाह्य व्यापाराच्या बाबतीत, वित्तीय वर्ष २०२४-२५ च्या पहिल्या नऊ महिन्यांत एकूण निर्यात (माल+सेवा) ६% दराने वाढली, त्यातील सेवा क्षेत्र ११.६% वाढले. माल निर्यात १.६% ने वाढली, तर आयात ५.२% ने वाढल्यामुळे व्यापार तुटीमध्ये वाढ झाली. भारताने जागतिक स्तरावर सर्वाधिक परदेशी चलन पाठवणाऱ्या देशांमध्ये अग्रस्थान कायम ठेवले, ज्यामुळे चालू खात्यातील तूट (CAD) GDP च्या १.२% वर नियंत्रित राहाण्यास मदत झाली (Economic Survey, 2024-25).

**चलन आणि वित्तीय क्षेत्रातील विकास**

२०२४ मध्ये अनुसूचित व्यावसायिक बँकांच्या (SCBs) एकूण नॉन-परफॉर्मिंग मालमत्तेचे (GNPA) प्रमाण घटून १२ वर्षांच्या नीचांकी स्तरावर २.६% वर आले, तर निव्वळ NPA ०.६% वर राहिले. मालमत्ता परतावा (RoA) १.४% वर वाढला, तर इक्विटीवरील परतावा (RoE) सप्टेंबर २०२४ मध्ये १४.१% वर पोहोचला. भारतीय रिझर्व्ह बँकेचा (RBI) वित्तीय समावेशन निर्देशांक २०२१ मधील ५३.९ वरून २०२४ मध्ये ६४.२ वर पोहोचला, ज्याला प्रादेशिक ग्रामीण बँकांकडून (RRBs) मोठा आधार मिळाला. RBI ने रेपो दर ६.५% वर कायम ठेवला, तर कॅश रिझर्व्ह रेशो (CRR) ४% पर्यंत कमी केला, ज्यामुळे प्रणालीत रु. १.१६ लाख कोटींचा तरलता पुरवठा झाला. यामुळे मनी मल्टिप्लायर ५.७ पर्यंत वाढला, जो तरलता वृद्धीचे संकेत देतो. भांडवली बाजाराने एप्रिल ते डिसेंबर २०२४ या कालावधीत प्राथमिक बाजारातून रु. ११.१ लाख कोटींची भांडवली उभारणी केली, जी FY24 च्या तुलनेत ५% अधिक होती. प्राथमिक समभाग विक्री (IPO) द्वारे निधी उभारणी तिपटीने वाढून रु. १.५३ लाख कोटींवर पोहोचली. नॅशनल बँक फॉर फायनान्सिंग इन्फ्रास्ट्रक्चर अँड डेव्हलपमेंट (NaBFID) आणि इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कंपनी लिमिटेड (IIFCL) यांसारख्या विकास वित्तीय संस्थांनी पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी वित्तपुरवठा केला, जिथे NaBFID ने रु. १.३ लाख कोटींचे कर्ज मंजूर केले (Economic Survey, 2024-25).

**बाह्यक्षेत्र**

जागतिक व्यापाराला वाढत्या व्यापार धोरणातील अनिश्चितता आणि लाल समुद्र तसेच पनामा कालव्यातील दुष्काळामुळे होणाऱ्या व्यत्ययाचा फटका बसला. यामुळे वाहतूक खर्च वाढले आणि वितरणाचा कालावधी लांबला. त्यामुळे देशांनी भू-राजकीय संधी साधत 'फ्रेंड-शोअरिंग' आणि 'नियर-शोअरिंग' धोरणाचा अवलंब केला. परकीय पोर्टफोलिओ गुंतवणूक (FPIs) जागतिक अस्थिरतेमुळे चढ-उतार होत राहिली, तरीही भारताच्या मजबूत आर्थिक पायामुळे एकूण भांडवली प्रवाह सकारात्मक राहिला आहे. एकूण निर्यात (माल + सेवा) ६% वाढून USD ६०२.६ अब्ज इतकी झाली. त्याचबरोबर, आयातही ६.९% वाढून USD ६८२.२ अब्ज झाली, ज्यामुळे देशांतर्गत मागणी मजबूत असल्याचे स्पष्ट झाले. डिसेंबर २०२४ पर्यंत भारताचे परकीय चलन साठे USD ६४०.३ अब्ज होते, जे सप्टेंबर २०२४ पर्यंतच्या USD ७११.८ अब्ज परकीय कर्जाच्या ९०% भाग कव्हर करत होते. यामुळे भारताने व्यापक आर्थिक स्थैर्य राखले आणि बाह्य आर्थिक धक्क्यांना प्रतिकार करण्याची क्षमता टिकवली (Economic Survey, 2024-25).

**चलन आणि महागाई**

जागतिक महागाईची प्रवृत्ती पाहाता, पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे २०२२ मध्ये महागाई ८.७% इतकी उच्चांकी झाली होती. मात्र, वित्तीय कठोरतेमुळे २०२४ मध्ये ती ५.७% पर्यंत घसरली. देशांतर्गत महागाईच्या बाबतीत, किरकोळ महागाई वित्तीय वर्ष २०२३-२४ (FY24) मध्ये ५.४% होती, जी FY25 मध्ये ४.९% पर्यंत कमी झाली. तथापि, अन्नधान्य महागाई ७.५% वरून ८.४% वर गेली आहे. पुरवठा साखळीतील समस्यांमुळे आणि हवामानाशी संबंधित अडथळ्यांमुळे ग्राहक किंमत निर्देशांक (CPI) मध्ये अस्थिरता कायम राहिली. मात्र, सेवा आणि इंधनाच्या किमती घसरल्यामुळे मुख्य महागाई (Core Inflation) १० वर्षांच्या नीचांकी स्तरावर पोहोचली. रिझर्व्ह बँकेने (RBI) FY25 साठी महागाईचा अंदाज ४.५% वरून ४.८% केला असून, FY26 मध्ये तो ४.२% राहील, असा अंदाज आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (IMF) FY25 मध्ये ४.४% आणि FY26 मध्ये ४.१% महागाईचा अंदाज व्यक्त केला आहे, परंतु हे स्थिर परिस्थितींवर अवलंबून असेल (Economic Survey, 2024-25).

**मध्यमकालीन दृष्टिकोन**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (IMF) अंदाजानुसार, भारत २०२७-२८ पर्यंत USD ५ ट्रिलियन आणि २०२९-३० पर्यंत USD ६.३ ट्रिलियन अर्थव्यवस्था बनेल, ज्यासाठी वित्तीय वर्ष २०२४-२५ ते २०२९-३० या कालावधीत नाममात्र GDP वाढीचा दर १०.२% राहील.विकसित भारत २०४७ हे लक्ष्य साध्य करण्यासाठी, भारताने पुढील दोन दशके वार्षिक ८% दराने वाढ साधणे आवश्यक आहे. IMF ने FY26 ते FY30 या कालावधीसाठी भारताचा वास्तविक GDP वार्षिक ६.५% दराने वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्याचबरोबर, FY30 पर्यंत चालू खात्याच्या तुटीचा (CAD) GDP मधील वाटा २.२% पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. भारतीय रुपयाचे मूल्य दरवर्षी सरासरी ०.५% ने घसरण्याचा अंदाज आहे, मात्र मागील दशकांच्या तुलनेत हे स्थिर आर्थिक परिस्थितीचे सूचक मानले जात आहे (Economic Survey, 2024-25).

**गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा**

भांडवली गुंतवणूक (Capex) वित्तीय वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ दरम्यान ३८.८% वार्षिक संमिश्र वाढ दराने (CAGR) वाढली आहे. सरकारने नॅशनल इन्फ्रास्ट्रक्चर पाईपलाइन आणि नॅशनल मोनेटायझेशन पाईपलाइन यांसारख्या विविध उपक्रमांची सुरुवात केली

आहे. एप्रिल-नोव्हेंबर २०२४ दरम्यान २०३१ कि.मी. नवीन रेल्वे नेटवर्क सुरू झाले, तसेच १७ नवीन वंदे भारतगाड्या सुरू करण्यात आल्या. भारतमाला योजनेअंतर्गत ६,२१५ कि.मी. राष्ट्रीय महामार्ग बांधले गेले, तर उडाण योजनेत ६१९ प्रादेशिक हवाई मार्ग कार्यान्वित झाले. सागरमाला योजनेत वधावन मेगा पोर्टसारखे प्रकल्प सुरू करण्यात आले. भारताची एकूण स्थापित वीज उत्पादन क्षमता ४५६.७ गिगावॅट (GW) वर पोहोचली, त्यापैकी नवीकरणीय ऊर्जा २०९.४ GW (४७%) आहे. 5G सेवा ७७९-जिल्ह्यांमध्ये पोहोचली असून, भारत नेट योजनेत २.१४ लाख ग्रामपंचायतींना फायबर नेटवर्कने जोडण्यात आले. ग्रामीण आणि शहरी विकासाच्या बाबतीत, प्रधानमंत्री आवास योजना (PMAY) अंतर्गत १.१८ कोटी घरे मंजूर झाले, जलजीवन मिशनअंतर्गत १५.३ कोटी घरांना नळाद्वारे पाणीपुरवठा (७९.१%) झाला, दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना (DDUGJY)आणि सौभाग्य योजनाअंतर्गत १८,३७४ गावे विजेने जोडली गेली आणि २.९ कोटी घरांना वीज जोडणी देण्यात आली. स्वच्छ भारत अभियान (टप्पा II) अंतर्गत, २०२४ मध्ये १.९२ लाख गावे ODF प्लसघोषित करण्यात आली, ज्यामुळे एकूण ODF प्लसगावांची संख्या ३.६४ लाखांपर्यंत पोहोचली. भारताकडे सध्या ५६ कार्यरत अवकाश संपत्ती (स्पेस अस्ट्स) आहेत. स्पेस व्हिजन २०४७ अंतर्गत गगनयान आणि चांद्रयान-४ यांसारख्या महत्त्वाकांक्षी मोहिमा राबवण्याचे लक्ष्य आहे (Economic Survey, 2024-25).

**उद्योगक्षेत्र**

भारताचे औद्योगिक क्षेत्र वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये ६.२% वाढण्याचा अंदाज असून, याला वीज व बांधकाम क्षेत्रातील मजबूत वाढ चालना देत आहे. सरकार स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि इंडस्ट्री ४.०ला प्रोत्साहन देत असून, समर्थ उद्योग केंद्रे स्थापन करण्यास मदत करत आहे. एप्रिल-नोव्हेंबर २०२४ दरम्यान पोलाद उत्पादनात ३.३% वाढ झाली. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन रु.९.५२ लाख कोटींवर पोहोचले, त्यात ९९% स्मार्टफोन्स भारतातच तयार होत आहेत, यामुळे आयातीवरील अवलंबन मोठ्या प्रमाणात कमी झाले. बौद्धिक संपदा (पेटंट्स)च्या बाबतीत, WIPO अहवाल २०२२ नुसार, भारत पेटंट फाइलिंगमध्ये जागतिक स्तरावर सहाव्या स्थानावर आहे. पहिल्यांदाच, देशांतर्गत अर्जदारांनी केलेल्या पेटंट अर्जांची संख्या (५५.२%) एकूण अर्जांपेक्षा अधिक झाली आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) क्षेत्रात २३.२४ कोटी लोक कार्यरत आहेत. उद्यम असिस्ट अंतर्गत २.३९ कोटी व्यवसाय अधिकृतरीत्या नोंदणीकृत झाले आहेत. MSME उद्योगांना भांडवली निधी मिळावा यासाठी सरकारने आत्मनिर्भर भारत फंड सुरू केला आहे, ज्यामुळे उच्च वाढीची क्षमता असलेल्या कंपन्यांना वित्तपुरवठा मिळेल (Economic Survey, 2024-25).

**सेवाक्षेत्र**

भारतातील सेवाक्षेत्राचे वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये एकूण सकल मूल्यवर्धन (GVA) मध्ये ५५% वाटा आहे, जो FY13-14 मध्ये ५०.६% होता. हे क्षेत्र एकूण रोजगाराच्या ३०% लोकसंख्येला संधी देते आणि उत्पादन क्षेत्राच्या वाढीस चालना देते. भारताचा जागतिक सेवा निर्यातीत ४.३% वाटा असून तो सातव्या क्रमांकावर आहे. माहिती तंत्रज्ञान आणि संगणक-संबंधित सेवाक्षेत्राने FY13 ते FY23 दरम्यान १२.८% वार्षिक संमिश्र वाढ दराने (CAGR) वाढ केली. GVA मधील वाटा ६.३% वरून १०.९% पर्यंत वाढला आहे. रेल्वेप्रवासी वाहतूक ८% ने वाढली तर मालवाहतूक ५.२% ने वाढली (FY24). पर्यटन क्षेत्राने पुनरुज्जीवन करत GDP मध्ये ५% योगदान दिले (FY23). FY25 च्या पहिल्या सहामाहीत रिअल इस्टेट विक्री ११-वर्षांतील सर्वोच्च स्तरावर पोहोचली. १.१८

अब्ज ग्राहकांसह भारत जागतिक स्तरावर सर्वाधिक मोबाइल डेटा वापर करणारा देश ठरला आहे (Economic Survey, 2024-25).

**शेती आणि अन्न व्यवस्थापन**

भारतातील कृषिक्षेत्राचा FY२४ मध्ये GDP मध्ये १६% वाटा असून, देशातील ४६.१% लोकसंख्या या क्षेत्रावर अवलंबून आहे. FY१७ ते FY२३ दरम्यान कृषी क्षेत्राने सरासरी ५% वार्षिक वाढ नोंदवली आहे. खरीप हंगामातील अन्नधान्य उत्पादन १,६४७ LMT (FY२४) पर्यंत पोहोचले व वार्षिक वाढ ८९.३७ LMT आहे. मत्स्यपालन (१८४ LMT) आणि पशुधन उत्पादन (CAGR 12.99%) याने पारंपरिक शेतीला मागे टाकले. अरहर (तूर) आणि बाजरीच्या MSP मध्ये अनुक्रमे ५९% आणि ७७% वाढ (FY२५) करून शेतकऱ्यांना अधिक नफा मिळावा यासाठी पावले उचलली. भारताच्या एकूण लागवडीखालील क्षेत्राच्या ५५% भागाला सिंचन सुविधा उपलब्ध आहेत. देशातील दोन-तृतीयांश शेती दुष्काळाच्या जोखमीखाली आहे. शेतकरी कल्याण योजनेअंतर्गत किसान क्रेडिट कार्ड (KCC) ७.७५ कोटी खाती उघडली, प्रधानमंत्री पीक विमा योजनेमध्ये (PMFBY) ४ कोटी शेतकरी सहभागी, ६०० LMT हेक्टर क्षेत्र संरक्षित (FY२४), e-NAM प्लॅटफॉर्मवर१.७८ कोटी शेतकरी आणि २.६२ लाख व्यापारी जोडले. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्नयोजना (PMGKAY) अंतर्गत ८० कोटी लोकांना मोफत धान्य वाटप. अन्नप्रक्रिया क्षेत्रातील निर्यात USD ४६.४४ अब्ज (FY२४) पर्यंत पोहोचली, ज्याचा शेती-आधारित निर्यातीत २३.४% वाटा आहे (देशाच्या एकूण निर्यातीत ११.७%)(Economic Survey, 2024-25).

**हवामान आणि पर्यावरण**

भारताने हवामान बदलास अनुकूल होण्यासाठी केलेला खर्च FY१६ मधील ३.७% वरून FY२२ मध्ये ५.६% पर्यंत वाढला. लाइफस्टाइल फॉर द एन्व्हायर्नमेंट (LiFE) उपक्रमाने टिकाऊ पर्यावरणपूरक जीवनशैलीला चालना दिली, ज्यामुळे २०३० पर्यंत USD ४४० अब्ज इतकी बचत होऊ शकते. भारताच्या एकूण वीजनिर्मिती क्षमतेपैकी ४६.८% हिस्सा जीवाश्म-विरोधी ऊर्जा स्त्रोतांकडून (२०२३); २०३० पर्यंत ५०% करण्याचे लक्ष्य आहे. २००५ ते २०२३ दरम्यान वनस्पतींमुळे २.२९ अब्ज टन CO2 शोषले गेले. COP२९ परिषदेत हवामान निधीसाठी पुरेशा मदतीची कमतरता दिसून आली; प्रतिवर्षी USD ३०० अब्ज निधी आवश्यक, परंतु २०३० पर्यंत USD ५.१-६.८ ट्रिलियन निधीची गरज आहे. भारताने FY२४ मध्ये, USD २०,००० कोटी किंमतीचे सॉव्हरिन ग्रीन बाँड्स जारी करून हरित प्रकल्पांना निधी पुरवला. MISHTI उपक्रम १३-राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये २२,५६०-हेक्टर क्षेत्रातील मँग्रोव्ह पुनर्संचयित करत आहे. AMRUT २.०अंतर्गत ३,०७८-जलसंधारण प्रकल्प मंजूर झाले. PM सूर्य घर योजना - ७-लाख सौर छत प्रणाली बसवली; १ कोटी घरांचे लक्ष्य आहे. भारतातील प्रमुख ऊर्जास्त्रोत अद्यापही कोळसा असून, ६५,२९० MW सुपरक्रिटिकल कोळसा प्रकल्प अधिक कार्यक्षमतेसाठी स्थापित करण्यात आला (Economic Survey, 2024-25).

**सामाजिक क्षेत्र**

भारताच्या सामाजिक क्षेत्रावरील खर्च FY२१ ते FY२५ दरम्यान १५% वार्षिक वाढीच्या दराने (CAGR) वाढून FY२५ मध्ये रु.२५.७ लाख कोटींवर पोहोचला. ग्रामीण भागातील जिनी गुणांक २०२२-२३ मधील ०.२६६ वरून २०२३-२४ मध्ये ०.२३७ पर्यंत कमी झाला, तर शहरी भागात तो ०.३१४ वरून ०.२८४ झाला, यामुळे आर्थिक असमानता कमी झाल्याचे दिसून येते. शिक्षणावरील खर्च १२% वार्षिक वाढीने रु.९.२ लाख कोटींवर पोहोचला. प्राथमिक

स्तरावर ड्रॉप आउट दर १.९% आणि माध्यमिक स्तरावर १४.१% पर्यंत कमी झाला. उच्च शिक्षणात नोंदणी २०१४-२०२२ दरम्यान २६.५% वाढली, ज्यामुळे सकल नामांकन गुणोत्तर (GER) २८.४% वर पोहोचले. आरोग्यावरचा खर्च १८% वाढून रु. ६.१ लाख कोटी झाला. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (AB PM-JAY)अंतर्गत रु.१.२५ लाख कोटी रुपयांचा वैद्यकीय खर्च दिसून येतो. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्नयोजना (PMGKAY) अंतर्गत ८० कोटी लोकांना मोफत अन्नधान्य पुरवले जाते, जे राशनकार्डद्वारे ८४% कुटुंबांना कव्हर करते. सार्वजनिक वित्तीय धोरणांमुळे आर्थिक असमानता कमी झाली, ज्यामुळे खालच्या ५% ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येच्या उपभोगात अनुक्रमे २२% आणि १९% वाढ झाली (Economic Survey, 2024-25).

**रोजगार आणि कौशल्य विकास**

भारताचा बेरोजगारी दर २०१७-१८ मधील ६% वरून २०२३-२४ मध्ये ३.२% पर्यंत कमी झाला, तर कामगार सहभाग दर (LFPR) ६०.१% वर पोहोचला. कार्यरत वयोगटातील (१५-५९ वर्षे) लोकसंख्या २०२६ पर्यंत ९२३.९ दशलक्ष होण्याचा अंदाज असून, भारताला लोकसंख्याशास्त्रीय लाभांश (Demographic Dividend) मिळणार आहे, ज्यात १०-२४ वयोगटातील लोकसंख्या २६% आहे. महिला कामगार सहभाग दर २०१७-१८ मधील २३.३% वरून २०२३-२४ मध्ये ४१.७% वर गेला. विशेषतः ग्रामीण भागातील महिलांचे योगदान मोठे ठरले. स्वरोजगार ५८.४% वर वाढला, तर नियमित पगाराच्या नोकऱ्या २१.७% वर कायम राहिल्या. Start-up India अंतर्गत ७३,१५१- स्टार्टअप्सना महिला संचालक आहेत. Skill India आणि Mudra Yojana यांनी उद्योजकता आणि व्यवसाय प्रशिक्षणाला चालना दिली. डिजिटल अर्थव्यवस्था आणि नवीकरणीय ऊर्जाक्षेत्रामध्ये वाढत्या नोकऱ्यांची निर्मिती होत आहे, जी विकसित भारत २०४७ साठी महत्त्वाची ठरणार आहे. AI आणि हवामान बदलासारख्या जागतिक ट्रेंडसाठी सरकार कौशल्य विकासाला चालना देत आहे. PM-Internship Scheme सारख्या उपक्रमांमुळे रोजगार आणि स्वयंरोजगार वाढत आहे (Economic Survey, 2024-25).

**एआय युगातील मजूरवर्ग**

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) ही कामगार बाजारासाठी संधी आणि धोके दोन्ही निर्माण करत आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO) २०२४ नुसार, जागतिक स्तरावर ७५ दशलक्ष नोकऱ्यांना धोका असून, Goldman Sachs च्या अहवालानुसार ३०० दशलक्ष पूर्णवेळ नोकऱ्या AI मुळे प्रभावित होऊ शकतात. भारताचा AI बाजार २०२७ पर्यंत २५-३५% वार्षिक वृद्धिदराने (CAGR) वाढेल (NASSCOM). त्यामुळे कर्मचारी कौशल्य विकास, नियामक नियंत्रण आणि मानव-AI सहकार्य हा संतुलित संक्रमणासाठी महत्त्वाचा घटक असेल (Economic Survey, 2024-25).

**चिकित्सक विश्लेषण**

भारतातील अर्थव्यवस्था वाढत आहे, पण ती काही आव्हानांनाही सामोरी जात आहे. सरकारचा ६.४% वाढीचा अंदाज वास्तववादी आहे; परंतु तो अनेक घटकांवर अवलंबून आहे. खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक वाढली, तर भारताची आर्थिक वाढ अधिक वेगाने होऊ शकते, पण व्यवसायांनी सावध भूमिका घेतली, तर ही वाढ ५.५% पर्यंत मर्यादित राहू शकते. दीर्घकालीन यशासाठी खाजगी गुंतवणूक वाढवणे, उत्पादन क्षेत्राला चालना देणे आणि महागाई स्थिर ठेवणे महत्त्वाचे आहे. एकूणच, भारत मजबूत स्थितीत आहे, पण जोखीम दुर्लक्ष करू नये. सरकारने व्यवसायांना गुंतवणुकीसाठी आत्मविश्वास मिळवून देण्यावर लक्ष केंद्रित करावे, जे

स्थिर आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती आणि भविष्यातील अधिक मजबूत अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे ठरेल.

एआयमुळे रोजगार बाजार बदलत आहे आणि अनेक कामगार अजून या बदलासाठी तयार नाहीत. दीर्घकालीन यश सुनिश्चित करण्यासाठी भारताने गुंतवणूक वाढवली पाहिजे, व्यवसायांना पाठबळ दिले पाहिजे आणि कामगारांना भविष्यासाठी सक्षम केले पाहिजे. जर हे पावले उचलली नाहीत, तर आर्थिक वाढ ५.५% पर्यंत मर्यादित राहू शकते, ज्यामुळे रोजगारनिर्मिती आणि लोकांच्या जीवनमान सुधारण्यात अडथळे येऊ शकतात.

**टीकात्मक परीक्षण**

देशासमोर अडचणी असूनही अर्थव्यवस्था चांगली चालली आहे आणि नागरिकांच्या समस्यांची दखल घेतली जाईल हे दाखवण्यासाठी सरकार अर्थसंकल्पाचा वापर करते. यासाठी डेटा निवडकपणे सादर केला जातो. संपूर्ण चित्र समोर येत नसल्याने, अर्थव्यवस्थेची खरी परिस्थिती उघड करण्यासाठी विश्लेषकांना सादर केलेल्या आकड्यांच्या मागे जावे लागते. अर्थशास्त्रज्ञ अर्थसंकल्पाची प्रशंसा करतात, तर समीक्षक वास्तववादी परिस्थिती मांडतात. देशातील वाढती आर्थिक, राजकीय आणि सामाजिक अस्थिरता आणि वाढत्या कलहाचे वास्तव मांडणारे पर्यायी चित्र रेखाटण्याची गरज आहे; म्हणून या लेखात आर्थिक पाहणी अहवालावर टीकात्मक परीक्षण करणे महत्त्वाचे ठरते (म्होपरे आणि टेकळे, २०२४).

जुलै २०२४ मध्ये प्रकाशित झालेल्या शेवटच्या आर्थिक अहवालाने जागतिक आर्थिक निराशेच्या पार्श्वभूमीवर भारताच्या अर्थव्यवस्थेचे आशादायी चित्र सादर केले होते. हे चित्र ठोस आकडेवारीवर आधारित होते आणि त्यासोबतच मध्यम कालावधीसाठी काही सुयोग्य आणि भविष्यकालीन शिफारसीदेखील दिल्या होत्या. आर्थिक सर्वेक्षण २०२४-२५ (३१ जानेवारी २०२५ रोजी सादर करण्यात आले) मागील जुलैच्या तुलनेत जागतिक आर्थिक परिस्थितीत फारसा फरक दर्शवत नाही.

जागतिक प्रतिकूल परिस्थितींविरुद्ध भारताची लवचिकता या अहवालात अधोरेखित केली जात असली, तरी जागतिक व्यापारातील व्यत्यय, विकसित अर्थव्यवस्थांमध्ये वाढणारे व्याजदर आणि भारताच्या निर्यात वाढीवर आणि एकूण आर्थिक स्थिरतेवर भू-राजकीय तनाव यांचा संभाव्य परिणाम याबद्दल चिंता कायम आहे. महागाई नियंत्रणात असल्याचा अंदाज असला, तरी अहवालात सेवाक्षेत्रातील वाढत्या महागाईचे विश्लेषण केले पाहिजे, ज्यामुळे ग्राहकांच्या खर्चावर परिणाम होऊ शकतो. अहवालात ग्रामीण मागणीमुळे होणाऱ्या संभाव्य वाढीचा उल्लेख असला, तरी एकूण विकासावर त्याचा परिणाम अचूकपणे देणे गरजेचे आहे. या अहवालात बेरोजगारी कमी झाल्याचे संकेत दिले असले, तरी निर्माण झालेल्या नोकऱ्यांच्या गुणवत्तेचे आणि कामगार बाजारपेठेतील कौशल्यातील विसंगतीचे सखोल विश्लेषण करणे आवश्यक आहे. या अहवालात सर्वसाधारणपणे आशावादी चित्र रेखाटले आहे; परंतु आर्थिक दृष्टिकोनाचे पूर्णपणे मूल्यांकन करण्यासाठी संभाव्य आव्हानांचे सखोल विश्लेषण आवश्यक आहे.

या आर्थिक पाहणी अहवालात असे अधोरेखित केले आहे की, जीवनशैली निवडी, कामाच्या ठिकाणाची संस्कृती आणि कौटुंबिक परिस्थिती उत्पादकतेसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत आणि जर भारताच्या आर्थिक महत्त्वाकांक्षा पूर्ण करायच्या असतील, तर बालपण/तारुण्यकाळात घेतलेल्या जीवनशैली निवडींकडे त्वरित लक्ष दिले पाहिजे (PIB, 2025); परंतु वास्तविक पाहाता योग्य मानसिक आरोग्याचे प्रमाण खूप कमी व चिंताजनक आहे. यावर जास्त विश्लेषण व उपायांची चर्चा दिसून येत नाही.

भारताची विकसित भारत २०४७ कडे चाललेल्या

महत्त्वाकांक्षी वाटचालीत सर्वसमावेशक व शाश्वत विकासाचा मोठा सहभाग आहे (PIB, 2025). वेगवान शहरीकरणामुळे शहरी भागातील तापमानवाढ, कार्बन उत्सर्जन व वायू प्रदूषणात होत असलेल्या वाढीला अटकाव करण्यासाठी ठोस उपायांची उणीव भासते. जे उपाय सुचविले आहेत ते केवळ जुळवाजुळव करण्याच्या हेतूने सुचविले आहेत असे दिसून येते.

पायाभूत सुविधांबद्दल जरी खूप सकारात्मक बाजू मांडल्या असल्या, तरी येत्या दशकात भारताच्या विकासाच्या आकांक्षांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या गुंतवणुकीची आवश्यकता असल्याचे विसरून चालणार नाही. या आर्थिक पाहणी अहवालात भारताच्या विकासासाठी शिक्षण हे महत्त्वाचे असल्याचे अधोरेखित केले आहे; परंतु शिक्षकांच्या नोकरभरती व पूर्णवेळ रोजगार जो ज्वलंत मुद्दा असूनही यांवर भाष्य टाळले गेले आहे.

**समारोप**

२०२४-२५ च्या आर्थिक सर्वेक्षणात असे दिसून येते की, कोविड-१९ महामारीनंतर भारताच्या अर्थव्यवस्थेत लक्षणीय वाढ झाली आहे आणि त्याचे प्रभावी पुनरागमन झाले आहे, ज्याने अनेक प्रमुख क्षेत्रांमध्ये साथीच्या आधीच्या पातळीला मागे टाकले आहे. प्रस्तुत लेखामधूनआपल्याला समजते की, आर्थिक पाहणी अहवाल अर्थव्यवस्थेबद्दल सकारात्मक आहे परंतु अर्थव्यवस्थे समोरील प्रमुख आव्हानांना तोंड देण्याची क्षमता व उपाययोजना कमी असल्याचे यातून दिसून येते. एकूणच आर्थिक सर्वेक्षण केवळ भारतीय अर्थव्यवस्थेचा आरसा नाही; ते धक्के आणि अनिश्चितता वगळून अर्थव्यवस्थेच्या संभाव्य भविष्याचा दृष्टिकोन सादर करणारे दस्तऐवज आहे.

**संदर्भ ग्रंथ सूचीः**

1. Chidambaram, R. R. (2025). India's Economic Survey 2024-25: A Critical Analysis of Growth, Risks, and Opportunities. Linkedin. Retrieved 02 25, 2025, from https://www.linkedin.com/pulse/indias-economic-survey-2024-25-critical-analysis-raja-chidambaram-mpsnc/
2. Cyrill, M. (2025, January 31). Economic Survey of India 2024-25: Key Highlights. India Briefing. Retrieved 02 28, 2025, from https://www.india-briefing.com/news/economic-survey-of-india-2024-25-key-highlights-36004.html/
3. Finance, M. O. (2025). Economic Survey 2024-25. Economic Division, North Block, New Delhi-110001, Ministry of Finance, Department of Economic Affairs. North Block, New Delhi-110001: Government of India.
4. Ghosh, N. (2025). Economic Survey 2024-25: India's growth trajectory and fiscal challenges. ORF. Observer Research Foundation. Retrieved 02 25, 2025, from https://www.orfonline.org/expert-speak/economic-survey-2024-25-india-s-growth-trajectory-and-fiscal-challenges
5. Gupta, A. (2025). आर्थिक सर्वेक्षण २०२४-२५: १४.७२ लाख शाळांमध्ये २४.८ कोटी विद्यार्थी, शाळा सोडण्याचे प्रमाण घटले. News 18. Retrieved 02 28, 2025, from https://www.news18.com/education-career/economic-survey-2024-25-24-8-crore-students-in-14-72-lakh-schools-dropout-rates-decline-9209557.html
6. Khare, S. M. (2025). Economic Survey Report : आर्थिक सर्वेक्षण अहवाल म्हणजे काय? जाणून घ्या सर्वकाही. NDTV Marathi,

Mumbai. Retrieved 02 27, 2025, from https://marathi.ndtv.com/finance/economic-survey-2024-25-key-details-insights-release-date-explained-union-budget-2025-7596783

7. PIB. (2025). Summary of Economic Survey 2024-25. Ministry of Finance. New Delhi: PIB Delhi. Retrieved 02 25, 2025, from https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2097921

8. PIB. (2025). आर्थिक वर्ष 2025 दरम्यान भौतिक कनेक्टिव्हिटी क्षेत्रात क्षमता वृद्धी जारी : आर्थिक सर्वेक्षण 2024-25. अर्थमंत्रालय PIB Mumbai. PIB New Delhi. Retrieved 02 27, 2025, from https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=2098286

9. PIB. (2025). तरुणांचे मानसिक आरोग्य भविष्यातील अर्थव्यवस्थेला चालना देईल: आर्थिक सर्वेक्षण २०२४-२५.भारत सरकार, अर्थमंत्रालय. Mumbai: PIB New Delhi. Retrieved 02 27, 2025, from https://pib.gov.in/PressReleasePage.aspxPR>ID=2098265

10. PIB. (2025). हवामान बदलाची अनुकुलता, मागणीला अनुकूल धोरणात्मक सुधारणा व पुरेसे निधीपुरवठा पर्याय विकसित करणे: आर्थिक सर्वेक्षण २०२४-२५.अर्थमंत्रालय. New Delhi: PIB Mumbai. Retrieved 02 27, 2025, from https://pib.gov.in/PressReleasePage.aspxPRID=2098278

11. Singh, S. (2025, January 31). Economic Survey 2024-25. PRS Legislative Research.

१२. म्होपरे, रा., आणि टेकळे, ग. (२०२४, जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर). आर्थिक पाहणी अहवाल २०२३-२४: चिकित्सक अभ्यास.अर्थसंवाद, ४८(२), पृ. १०७-११४.

◆

समस्या अशी आहे की उत्सर्जन उत्पादीत करणारे लोक त्या विशेषाधिकारांसाठी पैसे देत नाहीत आणि ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना मोबदला मिळत नाही.

**- विल्यम डी. बॉर्डहॉस**

# भारतातील लिंग अंदाजपत्रकाचा विश्लेषणात्मक अभ्यास

**शालिनी उत्तमराव कदम** †

**प्रस्तावना :**

राष्ट्राचा शाश्वत विकास साधण्यासाठी लैंगिक अर्थसंकल्प महत्त्वाची भूमिका बजावत असून ते लैंगिक असमानता दूर करण्यासाठी संसाधनांचे कार्यक्षम आणि न्यायवाटप सुनिश्चित करते. लिंग अंदाजपत्रक हे संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांतील (SDGs) पाचवे ध्येय म्हणजे लिंग समानता (Gender Equity) याच्याशी संरेखित करते. लिंगसमानता वाढविणे हा आर्थिक विकासाचा प्रमुख घटक असून जेंडर बजेटिंग हा लिंग समानतेस चालना देणारा महत्त्वाचा घटक आहे. 'जेंडर बजेटिंग' या शब्दाचा अर्थच लिंग दृष्टिकोनातून अंदाजपत्रक तयार करणे किंवा त्याचे मूल्यांकन करणे होय. ही पद्धत कधी कधी लिंग-संवेदनशील बजेटिंग म्हणूनही ओळखली जाते. अर्थसंकल्पाच्या पुरुष आणि स्त्रियांवर होणाऱ्या अनेक परिणामांचे मूल्यांकन करून वित्तीय धोरणांद्वारे समानता वाढवण्यासाठी सरकार लिंग अर्थसंकल्पाचा वापर करते. ज्या अंतर्गत सरकार लिंग समानतेसाठी उद्दिष्टे ठरवून ते साध्य करण्यासाठी निधीचे वाटप करते.

महिला व बालविकास मंत्रालय (MoWCD) लैंगिक अर्थसंकल्पाची व्याख्या लिंग मुख्य प्रवाहात आणण्यासाठीचे एक साधन म्हणून करते. जेणेकरून विकासाचे फायदे पुरुषांइतकेच महिलांपर्यंत पोहोचावेत.

जेंडर बजेटिंग म्हणजे अंदाजपत्रकाची पद्धतशीर तपासणी, सरकारी कार्यक्रम आणि धोरणांचा महिलांवर होणारा परिणाम होय. या अंदाजपत्रकाचे मुख्य उद्दिष्ट महिलांना राजकोषीय धोरणे व सरकारी वित्त व्यवस्थापनाच्या प्रक्रियेत समाविष्ट करणे हा आहे, ज्यामुळे देशाच्या लिंग समानतेस चालना मिळते. जेंडर बजेटिंग अंतर्गत विशिष्ट गरजा पूर्ण करून महिलांसमोरील विविध आव्हानांना कमी करून समाजाच्या विविध पैलूंमध्ये महिला व मुलींना सक्षम बनवले जाते.

**आंतरराष्ट्रीय स्तरावर जेंडर बजेटिंगची पार्श्वभूमी:**

वित्तीय धोरणांद्वारे लैंगिक असमानता दूर करण्याच्या जागतिक प्रयत्नांचा एक भाग म्हणून २०व्या शतकाच्या उत्तरार्धात लैंगिक अर्थसंकल्पाची संकल्पना उदयास आली. यात अर्थसंकल्पीय प्रक्रियांमध्ये लिंग दृष्टिकोन समाकलित करणे समाविष्ट आहे. जेणेकरून पुरुष आणि स्त्रियांच्या विविध गरजा पूर्ण करण्यासाठी संसाधनांचे समान आणि प्रभावीपणे वाटप केले जाईल.

---

† सहाय्यक प्राध्यापक(अर्थशास्त्र), सामाजिक शास्त्रे संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.
आजीव सभासद क्र. १५०३, भ्रमणध्वनी : ८६९८९६३२२३, ई-मेल : shalineeukadam@gmail.com

१९८० च्या दशकात ऑस्ट्रेलियामध्ये लैंगिक अर्थसंकल्पाच्या संकल्पनेला प्रथम महत्त्व प्राप्त झाले. जेथे बजेट वाटपाचा महिलांवर कसा प्रभाव पडला याचे मूल्यांकन करण्यासाठी फेडरल सरकारने महिला बजेट विधान सादर केले. या उपक्रमाने इतर देशांवर प्रभाव टाकला, ज्यामुळे लिंग-प्रतिसादात्मक अर्थसंकल्पाची सुरुवात झाली. १९९० च्या दशकापर्यंत, युनायटेडनेशन्स (UN) आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी लैंगिक समानता वाढवण्यासाठी एक साधन म्हणून जेंडर बजेटिंगला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली. १९९५चे बिजिंग प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन हा एक निर्णायक क्षण होता. कारण त्याने सरकारांना लैंगिक समानतेवर परिणाम करण्यासाठी सार्वजनिक खर्चाचे विश्लेषण करण्याचे आवाहन केले होते. यामुळे महिलांच्या हक्कांची प्रगती करण्यासाठीचे जागतिक साधन म्हणून लैंगिक अर्थसंकल्पाची औपचारिक ओळख झाली. सर्व अर्थसंकल्पीय प्रक्रियांमध्ये लिंग दृष्टिकोन समाकलित करण्यासाठी सरकार यांना आवाहन केले गेले. यानंतर यू.एन. वुमन, इंटरनॅशनल मॉनिटर फंड (IMF) आणि जागतिक बँक यासारख्या संस्थांनी जागतिक स्तरावर लिंग-प्रतिसादात्मक बजेट यांचा प्रचार करण्यास सुरुवात केली.

युरोपमध्ये, युरोप कौन्सिलने २००५ मध्ये लिंग अर्थसंकल्पावर मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आणि सदस्य राष्ट्रांना हा दृष्टिकोन स्वीकारण्यास उद्युक्त केले. समानता वाढवण्यासाठी युरोपियन युनियनने लिंग प्रतिसादात्मक बजेट (GRB) चाही त्यांच्या धोरणात्मक चौकटीत समावेश केला. आंतरराष्ट्रीय स्तरावर GRB (Gender Based Statement) हे लिंग ऑडिट, प्रभाव मूल्यांकन आणि लिंग विशिष्ट वाटप यासह विविध पद्धतींद्वारे लागू केले गेले. विकसनशील देशांनी अनेकदा देणगीदार आणि UN एजन्सीच्या पाठिंब्याने शिक्षण, आरोग्य आणि रोजगारातील लैंगिक असमानता दूर करण्यासाठी लिंग प्रतिसादात्मक बजेट स्वीकारला आहे. प्रगती असमान असताना शाश्वत विकास उद्दिष्टे साधे करण्यासाठी GRB ला एक मान्यता प्राप्त झाली. २०१५ मध्ये शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये पाचवे उद्दिष्ट लिंग समानता स्वीकारून लिंग प्रतिसादात्मक अर्थसंकल्पाचे महत्त्व अधिक बळकट करून सरकारांना त्यांचे बजेट पद्धतशीरपणे असमानता दूर करण्यासाठी वापरण्यास प्रोत्साहित केले गेले.

**भारतातील जेंडर बजेटची पार्श्वभूमी:**

भारतातील जेंडर बजेटिंग हे एक नावीन्यपूर्ण वित्तीय साधन आहे ज्याचा उद्देश लिंग समानतेला चालना देणे आणि सरकारच्या नियोजन आणि बजेट प्रक्रियांमध्ये लैंगिक दृष्टिकोन समाकलित करून महिलांचे सक्षमीकरण करणे आहे. हे लैंगिक असमानता दूर करण्याचा आणि स्त्रियांना लाभदायक कार्यक्रमांसाठी अधिक प्रभावीपणे संसाधने वाटप करण्याचा प्रयत्न करते.

१९८० आणि १९९० त्या दशकात अर्थसंकल्पात लैंगिक दृष्टिकोन अंतर्भूत करण्याचे प्रयत्न नागरी समाज संस्था, शिक्षणतज्ज्ञ आणि कार्यकर्त्यांनी चालवले. विशेषत:१९९५ बीजिंग प्लॅटफॉर्म फॉर ॲक्शन नंतर, ज्याने लिंग समस्यांना वित्तीय धोरणांमध्ये एकत्रित करण्यावर भर दिला. या संकल्पनेला आंतरराष्ट्रीय प्रभावांद्वारे आकर्षण मिळाले. तसेच भारताने १९९३ मध्ये महिलांनविरुद्ध सर्व प्रकारचा भेदभाव निर्मूलन (CEDAW)-१९७९ च्या कनव्हेनशनला मान्यता दिली. जे लैंगिक समानतेसाठी आपली वचनबद्धता दर्शविते. ज्यामुळे भारतात २००१ मध्ये महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय धोरणाने संसाधनांचे समान वाटप सुनिश्चित करण्यासाठी लिंग-संवेदनशील अर्थसंकल्पाची आवश्यकता अधोरेखित केली. २००४-०५ मध्ये, महिला आणि बालविकास मंत्रालय (MWCD) आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक

फायनान्स अँड पॉलिसी (NIPFP) ने लिंग-प्रतिसादात्मक अर्थसंकल्पासाठी साधने आणि पद्धती विकसित केल्या. २००५-०६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पाने औपचारिकपणे पहिले लिंग बजेट विधान सादर केले. तेव्हापासून सरकारने केंद्रीय अर्थसंकल्पासोबत लिंग अर्थसंकल्प विधानही सातत्याने जारी केले आहे. लैंगिक अर्थसंकल्पात खर्चाचे दोन भागांमध्ये वर्गीकरण केले :

* **भाग अ :** ज्या योजनांमध्ये शंभर टक्के निधींचा महिलांना फायदा होतो.
* **भाग ब :** ज्या योजनांमध्ये कमीत कमी ३० टक्के निधींचा महिलांना फायदा होतो.

सार्वजनिक खर्चामध्ये लैंगिक समस्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारताने एक महत्त्वपूर्ण संस्थात्मक पाउल उचलले. २००५ नंतर विविध मंत्रालय आणि विभागांनी त्यांच्या बजेटचे लैंगिक दृष्टिकोनातून विश्लेषण करण्यासाठी आणि हस्तक्षेपाचे शिफारस करण्यासाठी जेंडर बजेट सेल (GBCs) स्थापन केले. कालांतराने, GBS मध्ये लिंग विसंगत डेटा सादर करणाऱ्या मंत्रालयांची संख्या वाढली. केरळ, कर्नाटक, राजस्थान आणि तामिळनाडू या राज्यांनीही उपराष्ट्रीय स्तरावर लैंगिक अर्थसंकल्प स्वीकारला.

२०१०-११ मध्ये विविध मंत्रालय आणि विभागांमध्ये एकत्रीकरण आणि समन्वयक सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने नॅशनल मिशन फॉर एम्पॉवरमेंट ऑफ वूमन (NMEW)ची स्थापना करण्यात आली. ज्या अंतर्गत जेंडर बजेटिंग आणि महिला सबलीकरणाशी संबंधित प्रयत्नांना एकत्रित करण्यात आले.२०१३-१४ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात वित्त मंत्रालयाने लैंगिक अर्थसंकल्पावर स्वतंत्र विधान सादर केले, ज्याअंतर्गत विविध क्षेत्रांतील महिला विकास आणि कल्याणासाठीच्या निधी वाटपाचा तपशील प्रधान केला गेला. २०१७-१८ मध्ये विविध योजना आणि कार्यक्रमांमध्ये लिंग विशिष्ट निर्देशक आणि उद्दिष्टे समोर ठेवून सरकारने जेंडर बजेटिंग आणि महिला सशक्तीकरणावर लक्ष केंद्रित केले. २०२०-२१ मध्ये महिला आणि बालविकास मंत्रालय आणि वित्तमंत्रालय यांनी लिंग अर्थसंकल्पाचे परिणामकारकता वाढविण्यासाठी 'जेंडर बजेटिंग पोर्टल' नावाचे ऑनलाइन पोर्टल विकसित केले. ज्या अंतर्गत लिंग संबंधित उपक्रमांसाठी निधीचे वाटप आणि वापरा संदर्भात माहिती देण्यात येऊ लागली.

**भारतातील जेंडर बजेटिंगची रचना :**

भारतातील जेंडर बजेट हा केंद्रीय अर्थसंकल्पाचा एक भाग म्हणून सादर केला जातो. जो वित्तमंत्रालय व महिला आणि बालविकास मंत्रालयाच्या सहकार्याने तयार केला जातो. जेंडर बजेट स्टेटमेंटचे दोन भाग आहेत त्यामध्ये;

* **भाग अ :** यामध्ये केवळ महिलांना लाभ देणारे कार्यक्रम आणि योजनांचा समावेश होतो, ज्यामध्ये १०० टक्के निधींचा वाटप महिलांसाठी होतो. उदाहरणार्थ- बेटी बचाव-बेटी पढाओ, उज्वला, महिला शक्ती केंद्र, अंगणवाडी इ.
* **भाग ब :** यामध्ये कार्यक्रम आणि योजनांचा समावेश केला जातो ज्यात किमान ३० टक्के निधीचा वाटप हा महिलांसाठी असतो. उदाहरणार्थ- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ज्यात लाभार्थ्यांची लक्षणीय टक्केवारी महिला आहेत.

**जेंडर बजेटिंगचे अंमलबजावणी यंत्रणा:**

सरकारद्वारे दरवर्षी केंद्रीय अर्थसंकल्पासोबत जेंडर बजेट स्टेटमेंट (GBS) प्रकाशित केला जातो. GBS ही विविध मंत्रालय/विभागांसाठी त्यांच्या कार्यक्रमांचे लैंगिक दृष्टिकोनातून पुनरावलोकन करण्यासाठी आणि महिलांसाठीच्या वाटपाची माहिती सादर करण्यासाठी एक अहवाल देणारी यंत्रणा आहे. महिला व बालविकास मंत्रालय हे जेंडर बजेटिंगला प्रोत्साहन देण्यासाठी नोडल एजन्सी म्हणून काम करते. जेंडर बजेट सेल हे लिंग


केंद्रित खर्चाचा मागोवा घेण्यासाठी, योजना आखण्यासाठी आणि निरीक्षण करण्यासाठी स्थापन केले गेले. हे सेल विविध मंत्रालय आणि विभागांमध्ये स्थापन केले गेले आहे. तसेच विविध मंत्रालय व विभागांमध्ये सरकारी अधिकाऱ्यांना जेंडर  बजेटिंग पद्धतीचे प्रशिक्षण दिले जाते.

**भारताच्या केंद्रीय अर्थसंकल्पातील जेंडर बजेटचा वाटा:**

भारत सरकारने २००५-०६ पासून केंद्रीय अर्थसंकल्पात जेंडर बजेट सादर करण्यास सुरुवात केली, ज्याचा उद्देश महिला आणि पुरुषांसाठी समान विकास सुनिश्चित करणे हा आहे. २००५-०६ पासून भारताच्या केंद्रीय अर्थसंकल्पातील जेंडर बजेटचा वाटा कसा होता हे पुढील आलेखवरून लक्षात येईल.

आलेख क्रमांक १ वरून असे लक्षात येते की, भारतात जेंडर बजेट स्टेटमेंट (GBS) २००५-०६ मध्ये सादर करण्यात आल्यापासून, किरकोळ चढउतारांसह एकूण अर्थसंकल्पीय वाटपाच्या सरासरी ५% वाटा सातत्याने नोंदवला गेला आहे. परंतु २०२५-२६ मध्ये सर्वात जास्त म्हणजेच एकूण ८.८६% वाटा हा एकूण अंदाजपत्रकातील जेंडर बजेटचा आहे, जो नेहमीच्या वाट्यातील प्रवृत्तीपेक्षा जास्त आहे. जो महिला कल्याण, शिक्षण आणि आर्थिक सक्षमीकरणाला चालना देतो, ज्यामध्ये ४९ मंत्रालयांनी लिंग विशिष्ट वाटपाचा अहवाल दिला आहे. हा वाटा महिलांच्या सक्षमीकरणावर सकारात्मक परिणाम दाखवणार असला, तरी एकूण लोकसंख्येमध्ये ४८% महिलांच्या विकासासाठी असलेला हा अर्थसंकल्पीय वाटा हा मात्र

**आलेख ०१: भारताच्या केंद्रीय अर्थसंकल्पातील जेंडर बजेटचा वाटा**




स्त्रोत : Gender Budget, Union Budget 2005-06 to 2025-26Available online a https://www.indiabudget.gov.in/

खूप कमी असलेला दिसून येतो.

**भारतातील २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पातील जेंडर बेजेट:**

२०२५-२६ च्या अर्थसंकल्पात, जेंडर बजेटसाठी ४.४९ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली, जी २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात ३.२७ लाख कोटी रुपये होती, जी अंदाजित ३७.५% जास्त आहे. २०२५-२६ मधील रुपये ४.४९ लाख कोटीमध्ये भाग-अ मध्ये १.०५५ लाख कोटीचे अंदाजित वाटप झाले असून, ते एकूण लिंग अंदाजपत्रकाच्या २३.५% आहे. भाग-ब मध्ये एकूण जेंडर बजेटच्या वाट्यातील ३.२६ लाख कोटीचे वाटप झाले, ते एकूण लिंग अंदाजपत्रकाच्या ७२.७५% आहे आणि भाग-क मध्ये १६८२१.२८ कोटी रुपये देण्यात आले.

तक्ता क्र. १ मध्ये २०२३-२४ पासूनच्या जेंडर बजेटच्या ताळेबंदाचा अभ्यास केला आहे. ज्याअंतर्गत GBS,२०२३-२४ मध्ये नोंदवलेले जेंडर बजेटचे प्रमाण हे ३.८४ लाख कोटी वरून २०२४-२५ मध्ये ३.२७ लाख कोटी इतके झाले. हे खर्चाचे प्रमाण ५७,३४१.१७ कोटीने कमी असले तरी एकूण अंदाजपत्रकातील जेंडर बजेटचा हिस्सा हा २०२३-२४ मध्ये ५% वरून वाढून तो २०२४-२५ मध्ये ६.५% झाला. परंतु २०२५-२६ मध्ये यात ३७.५ टक्क्याने वाढ होऊन एकूण अंदाजपत्रकात जेंडर बजेटचा हिस्सा हा ८.८६% पर्यंत वाढला. ज्या अंतर्गत ४.४९ लाख कोटीचे नियोजन करण्यात आले. या एकूण नियोजित खर्चातील २३.५% हिस्सा हा भाग-अ साठी देण्यात आला. ज्यामध्ये

**तक्ता क्र. ०१ : भारतातील २०२४-२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पातील जेंडर बेजेट**

(कोटी रुपये)

| | २०२३-२४ चे प्रत्यक्ष अर्थसंकल्प | २०२४-२५ चे अंदाजित अर्थसंकल्प | २०२४-२५ चे सुधारित अर्थसंकल्प | २०२५-२६ चे अंदाजित अर्थसंकल्प |
|---|---|---|---|---|
| भाग-अ महिलांसाठी १००% तरतूद | ७१,९१२.९९ | १,१२,३९६.१५ | ८०,७३३.३५ | १,०५,५३५.४० |
| भाग-ब महिलांसाठी तरतुदीच्या किमान ३०% | २,९७,४४६.३४ | १,९९,७६२.२९ | २,८१,१०४.५६ | ३,२६,६७२.०० |
| भाग-क महिलांसाठी तरतुदीच्या ३०% पेक्षा कमी | १५,१४०.२८ | १५,०००.०० | १४,६९०.९९ | १६८२१.२८ |
| एकूण | ३,८४,४९९.६१ | ३,२७,१५८.४४ | ३,७६,५२८.९० | ४,४९,०२८.६८ |

स्त्रोत : https://www.indiabudget.gov.in/budget2025-26(I)/doc/eb/stat13.pdf


महिलांसाठी १००% निधीची तरतूद केली असून, ७२.७५% हिस्सा हा भाग-ब साठी देण्यात आला. ज्यामध्ये महिलांसाठी किमान ३० ते ९९% निधीची तरतूद केली जाणार आहे. तर उर्वरित ३.७५% हिस्सा हा भाग-क साठी देण्यात आला.

**जेंडर बजेटचा भारताच्या जीडीपीमध्ये असलेला वाटा :**

जेंडर बजेट हे बजेटिंगचे एक महत्त्वाचे साधन असून ते लिंग समानता आणि महिला सबलीकरणासाठी बजेट वाटप आणि सार्वजनिक खर्च सादर करते. २००५-०६ पासूनच्या अंदाजपत्रकात जेंडर बजेटचा जीडीपीशी असलेला वाटा दर्शविला आहे.

**आलेख ०२ : जीडीपीमध्ये जेंटर बजेटचा वाटा**

(टक्केवारीत)




नोट : * २०२५-२६ची आकडेवारी ही अंदाजित (Estimate) आहे.

स्त्रोत : युनियन बजेट स्टेटमेंट, भारत सरकार.

वरील आलेख हे भारतातील प्रत्येक केंद्रीय अंदाजपत्रकात मांडले गेलेले जेंडर बजेटचा एकूण GDP मध्ये असलेला वाटा दर्शवितो. या ठिकाणी २००५-०६ पासून ते २०२५-२६ पर्यंत जेंडर बजेटचा GDP मध्ये असलेल्या वाट्यात सतत चढउतार असलेले दिसून येत असले, तरी एकाही वर्षीच्या अंदाजपत्रकात ते १% पेक्षा जास्त नाही. फक्त २०२४-२५ या वर्षीच्या अंदाजपत्रकात हा वाटा सर्वात जास्त असून ते ०.९४% इतका आहे. २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात अंदाजित १.२५% वाटा राहील. परंतु भारतात एकूण लोकसंख्येमध्ये ४८% लोकसंख्या ही महिलांची असून त्यांची एकंदरीतच स्थिती ही पुरुषांपेक्षा दुय्यम आहे. त्यामुळे महिलांचा विकास आणि सबलीकरणाचा विचार करता जेंडर बजेटचा वाटा मात्र खूप कमी असल्याचे दिसून येते.

**भारतातील लिंग अंदाजपत्रकासमोरील अडथळे:**

सरकारी अर्थसंकल्प पुरुष, स्त्रिया आणि उपेक्षित लिंगांच्या विशिष्ट गरजा पूर्ण करतात याची खात्री करून

लैंगिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी लिंग बजेटिंग हे एक आवश्यक साधन आहे. भारतात, २००५-०६ पासून सुरू झालेल्या लिंग अर्थसंकल्पाला महत्त्व प्राप्त झाले असले, तरीही लिंग समानता प्राप्त करण्याच्या उद्दिष्टांसमोर अनेक अडथळे आणणाऱ्या महत्त्वपूर्ण आव्हानांना तोंड द्यावे लागते, त्याचा सविस्तर अभ्यास करू:

- **सर्वसमावेशक माहितीचा अभाव:**

लिंग अर्थसंकल्पात एक गंभीर अडथळा म्हणजे विश्वसनीय लिंग पृथ्थकरण डेटाचा अभाव होय. वेगवेगळ्या क्षेत्रातील स्त्री-पुरुषांच्या विशिष्ट गरजांचे मूल्यांकन करण्यासाठी आणि अर्थसंकल्पातील वाटप त्या गरजा प्रभावीपणे पूर्ण करतात याची खात्री करण्यासाठी अचूक माहिती महत्त्वाची असते. तथापि, अनेक क्षेत्रांमध्ये तपशीलवार लिंग आधारित माहितीचा अभाव आहे, ज्यामुळे धोरण करताना अंतर ओळखणे आणि हस्तक्षेपांना प्राधान्य देणे कठीण होते. उदाहरणार्थ, अनौपचारिक रोजगार, विनावेतन काळजीचे काम आणि लिंगआधारित हिंसा यासारख्या क्षेत्रांना अधिकृत आकडेवारीमध्ये सहसा कमी प्रतिनिधित्व दिले जाते.

- **अपुरी राजकीय इच्छाशक्ती:**

लिंग अर्थसंकल्पासाठी धोरण आणि अर्थसंकल्पीय प्रक्रियांमध्ये मुख्य प्रवाहात लिंग विचारांसाठी मजबूत राजकीय बांधिलकी आवश्यक असते. तथापि, भारतात लैंगिक समानता अनेकदा इतर महत्त्वाच्या आर्थिक आणि राजकीय प्राधान्यक्रमांना मागे टाकते. परिणामी, लिंग प्रतिसादात्मक धोरणे आणि कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करणे बऱ्याच बाबतीत वरचेवर राहाते.

- **मर्यादित संस्थात्मक क्षमता:**

लिंग अर्थसंकल्पाची अंमलबजावणी लिंग प्रतिसादात्मक धोरणांची रचना, देखरेख आणि मूल्यांकन करण्यासाठी संस्थात्मक यंत्रणांवर अवलंबून असते. भारतात अनेकदा सरकारी विभागांमध्ये समर्पित लिंग बजेट सेल प्रशिक्षित कर्मचारी आणि तांत्रिक कौशल्याची कमतरता असते. शिवाय अंतर विभागीय समन्वयाच्या अनुपस्थितीमुळे लिंग विशिष्ट उद्दिष्ट्ये बजेट वाटपासह संरेखित करण्याची क्षमता आणखी कमकुवत होते. उदाहरणार्थ, महिला आणि बालविकास मंत्रालय लिंगसंबंधित कार्यक्रमांमध्ये मध्यवर्ती भूमिका बजावत असताना इतर मंत्रालय त्यांच्या अर्थसंकल्पीय प्रक्रियेत लैंगिक समस्यांना प्राधान्य देऊ शकत नाहीत.

- **संसाधनाच्या पुढे वाटप:**

लिंग अर्थसंकल्पाला मान्यता असूनही, लिंग विशिष्ट कार्यक्रमांसाठी संसाधनाची प्रत्यक्ष वाटप अपुरे राहिले आहे. अनेक कार्यक्रमांना कमी निधीचा त्रास होतो, त्यामुळे त्यांचा लैंगिक समानतेवर होणारा परिणाम मर्यादित होतो. याव्यतिरिक्त महिला विशिष्ट योजनांवर लक्ष केंद्रित केल्याने प्रणालीगत लैंगिक असमानता दूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या व्यापक संरचनात्मक सुधारणाकडे दुर्लक्ष होते. उदाहरणार्थ, मातृत्व फायद्यांसाठी निधी वाटप केला जात असताना, समान वेतन सुरक्षित कामाचे वातावरण आणि स्त्रियांसाठी शिक्षण आणि आरोग्यसेवा यासारख्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते किंवा कमी निधी दिला जातो.

- **महिलाकेंद्रित कार्यक्रमांवर लक्ष:**

भारतातील जेंडर बजेटिंग हे अनेकदा महिलाकेंद्रित कार्यक्रमांशी समतुल्य केले गेले आहे. लिंग मुख्य प्रवाहातील व्यापक उद्दिष्ट्ये बाजूला ठेवून. महिलांचे सक्षमीकरण करणे आवश्यक असताना, लिंग अर्थसंकल्पाने पुरुष आणि ट्रान्सजेंडर व्यक्तींसह सर्व लिंगांच्या गरजा आणि चिंतांचे निराकरण केले पाहिजे. प्रामुख्याने महिलांवर लक्ष केंद्रित करून, इतर लिंग-विशिष्ट आव्हाने, जसे की पुरुषांमधील मानसिक आरोग्य समस्या किंवा ट्रान्सजेंडर व्यक्तींना भेडसावणारा भेदभाव, याकडे लक्ष दिले जात नाही.

● **सामाजिक वृत्ती आणि पितृसत्ताक मानदंड:**

जेंडर बजेटिंग हे व्यापक सामाजिक संदर्भात कार्य करते, जेथे पुरुषसत्ताक नियम आणि वृत्ती महत्त्वपूर्ण अडथळे निर्माण करू शकतात. लैंगिक समानतेचा प्रतिकार, बहुधा सांस्कृतिक आणि पारंपारिक पद्धतींमध्ये रुजलेला, लिंग-प्रतिसादात्मक धोरणांची प्रभावीता मर्यादित करतो. उदाहरणार्थ, स्त्रियांच्या शिक्षणाला किंवा रोजगाराला चालना देण्याच्या प्रयत्नांना पुराणमतवादी समुदायांमध्ये विरोध होऊ शकतो, ज्यामुळे सरकारी हस्तक्षेपाचा प्रभाव कमी होतो.

● **कमकुवत देखरेख आणि मूल्यमापन यंत्रणा:**

लिंग अंदाजपत्रकाचे यश हे लिंग परिणामांवर अर्थसंकल्पीय वाटपाच्या प्रभावाचा मागोवा घेण्यासाठी मजबूत देखरेख आणि मूल्यमापन यंत्रणेवर अवलंबून असते. भारतात, अशा यंत्रणा अनेकदा कमकुवत किंवा अस्तित्वात नसतात. लिंग-प्रतिसादात्मक कार्यक्रमांच्या यशाचे मोजमाप करण्यासाठी स्पष्ट संकेतक आणि फ्रेमवर्क नसल्यामुळे त्यांच्या परिणामकारकतेचे मूल्यांकन करणे आणि लैंगिक समानतेच्या त्यांच्या वचनबद्धतेसाठी सरकारांना जबाबदार धरणे कठीण होते.

● **संपूर्ण राज्यांमध्ये खंडित दृष्टिकोन:**

भारताच्या फेडरल रचनेचा अर्थ असा आहे की, लिंग बजेटची अंमलबजावणी राज्यांमध्ये लक्षणीयरीत्या बदलते. केरळ आणि तामिळनाडूसारख्या काही राज्यांनी त्यांच्या धोरणांमध्ये लैंगिक अर्थसंकल्प समाकलित करण्यात प्रशंसनीय प्रगती केली आहे, तर इतर खूप मागे आहेत. या खंडित दृष्टिकोनामुळे देशभरातील लैंगिक असमानता दूर करण्यात असमान प्रगती होते. शिवाय, लैंगिक अर्थसंकल्पासाठी एकात्मिक राष्ट्रीय फ्रेमवर्कचा अभाव हा प्रादेशिक असमानता वाढवतो.

● **सामाजिक क्षेत्रांवर जास्त भर:**

भारतातील जेंडर बजेटिंग अनेकदा आरोग्य, शिक्षण आणि कल्याण यासारख्या सामाजिक क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करते, पायाभूत सुविधा, ऊर्जा आणि तंत्रज्ञान यासारख्या इतर गंभीर क्षेत्रांकडे दुर्लक्ष करते. हे संकुचित फोकस या क्षेत्रांमधील लिंग-प्रतिसादात्मक धोरणांच्या संभाव्य प्रभावाकडे दुर्लक्ष करते. उदाहरणार्थ, सुरक्षित सार्वजनिक वाहतूक आणि उत्तम स्वच्छता सुविधा यासारख्या लिंग-संवेदनशील पायाभूत सुविधांचे नियोजन, महिलांच्या कर्मचाऱ्यांच्या सहभागामध्ये लक्षणीय वाढ करू शकतात.

**धोरण आणि अंदाजपत्रक यांच्यातील चुकीचे संरेखन :**

लिंग-संवेदनशील धोरणे आणि अर्थसंकल्पीय वाटप यांच्यातील संबंध तोडणे हे जेंडर बजेटिंगमधील एक मोठे आव्हान आहे. जरी धोरणे लैंगिक असमानता दूर करण्याचे उद्दिष्ट ठेवू शकतात, अपुरा किंवा चुकीचा निधी अनेकदा त्यांच्या अंमलबजावणीला कमी करते. हे चुकीचे संरेखन एकूण नियोजन आणि अर्थसंकल्प प्रक्रियेमध्ये लिंगविषयक समस्यांच्या एकात्मतेचा व्यापक अभाव दर्शवते.

**आव्हानांना संबोधित करणे:**

या अडथळ्यांवर मात करण्यासाठी आणि भारतातील लैंगिक अर्थसंकल्प मजबूत करण्यासाठी, खालील चरण आवश्यक आहेत :

- **डेटा सिस्टीम मजबूत करणे :** लिंग-विभेदित डेटा गोळा आणि विश्लेषित करण्यासाठी सर्वसमावेशक प्रणाली तयार करणे हे सूचित धोरण आणि बजेटिंगसाठी महत्त्वपूर्ण आहे.
- **राजकीय इच्छाशक्ती वाढवणे :** वकिली आणि जागरूकता मोहिमा लैंगिक समानतेसाठी राजकीय बांधिलकी निर्माण करण्यास आणि लैंगिक बजेटिंगकडे सतत लक्ष देण्यास मदत करू शकतात.
- **संस्थात्मक क्षमता निर्माण करणे :** समर्पित लिंग बजेट कक्ष स्थापन करणे, सरकारी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि आंतरविभागीय समन्वयाला

प्रोत्साहन देणे यामुळे संस्थात्मक क्षमता वाढू शकते.

- **संसाधनांचे वाटप वाढवणे :** पुरेशा संसाधनांचे वाटप करून आणि गंभीर क्षेत्रांमधील निधीची तफावत दूर करून सरकारने लिंग-प्रतिसाद कार्यक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे.
- **फोकस विस्तृत करणे :** सर्व लिंगांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि लैंगिक समानतेला प्रभावित करणाऱ्या प्रणालीगत समस्यांचे निराकरण करण्यासाठी लिंग बजेटिंग हे महिला-केंद्रित कार्यक्रमांच्या पलीकडे गेले पाहिजे.
- **सामाजिक बदलाला चालना देणे :** जनजागृती मोहीम आणि सामुदायिक सहभाग पितृसत्ताक नियमांना आव्हान देण्यास आणि लैंगिक समानतेसाठी अधिक सहाय्यक वातावरण तयार करण्यात मदत करू शकतात.
- **सर्वांगीण दृष्टिकोन स्वीकारणे :** लैंगिक अर्थसंकल्पासाठी राष्ट्रीय आराखडा राज्यांमध्ये सुसंगतता वाढवू शकतो आणि लैंगिक असमानता दूर करण्यासाठी सर्वांगीण दृष्टिकोनाला प्रोत्साहन देऊ शकतो.
- **धोरण आणि अर्थसंकल्प संरेखित करणे :** अर्थसंकल्पीय वाटप लिंग-संवेदनशील धोरणांशी संरेखित असल्याची खात्री केल्याने त्यांची प्रभावीता आणि प्रभाव वाढू शकतो.

**निष्कर्ष:**

भारतातील जेंडर बजेट म्हणजे आर्थिक धोरणे आणि संसाधन वाटपाद्वारे लैंगिक असमानता दूर करण्यासाठीच्या प्रयत्नांना प्रतिबिंबित करते. २००५-०६ पासून दरवर्षी सादर करण्यात आलेल्या जेंडर बजेटिंगची उद्दिष्टये महिलांवर सरकारी खर्चाच्या प्रभावाचे मूल्यांकन करणे आणि विकासात्मक परिणामांमध्ये लैंगिक समानता सुनिश्चित करणे हे असले, तरी भारतात त्याची प्रभावीता अनेक आव्हानांमुळे बाधित आहे. या अडथळ्यांना तोंड देण्यासाठी राजकीय बांधिलकी, संस्थात्मक बळकटीकरण, सामाजिक बदल आणि संसाधनांचे वाटप यांचा मेळ घालण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे. या अडथळ्यांवर मात करून, भारत लैंगिक अर्थसंकल्पाची पूर्ण क्षमता उघडू शकतो आणि लैंगिक समानता आणि सर्वसमावेशक विकास साधण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकू शकतो.

**संदर्भ ग्रंथ व संकेतस्थळ सूची:**


1. Gende Budget 2024-25, Ministry of Women and Child Development
2. P.Usha, Prof.Suru Pulla Rao and Manikanta, 'Gender Budgeting in India : Trends and Reflection with Reference to Women Safety', Worldwide International Inter Disciplinary Research Journal ,ISSN -2454-7905.
3. Vibhuti Patel (2016), Gender Budgeting in India, April 2016. https://www.researchgate.net/publication/301301310_Gender_Budgeting_in_India
4. India Budget, Ministry of Finance. (https://www.indiabudget.gov.in/)
5. https://www.indiabudget.gov.in/doc/eb/stat13.pdf
6. https://www.thehindu.com/business/Economy/analysing-the-gender-budget-of-2024-25/article68582974.ece
7. https://www. indiabudget.gov.in/budget2024-25(I)/doc/eb/stat13.pdf Expenditure Profile: 2024-25, Statement 13.


◆

# छत्रपती शिवाजी महाराजांची करप्रणाली : न्याय, विकास आणि संरक्षणाची परंपरा

**अतुल कृष्णा घाडगे** †
**अजय कमलाकर दिक्षित** ††

**प्रस्तावना :**

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एक आदर्श योद्धा नव्हे तर एक कुशल प्रशासक, आर्थिक धोरणकर्ते, आणि सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते होते. त्यांच्या राजवटीत, त्यांनी आर्थिक धोरणांचा आधार घेऊन मराठा साम्राज्याच्या समृद्धीची उभारणी केली. शिवाजी महाराजांनी आपली करप्रणाली अत्यंत न्यायी व सुव्यवस्थित पद्धतीने रचली होती, ज्यामुळे मराठा साम्राज्याच्या आर्थिक आणि सामाजिक संरचनेत आमूलाग्र बदल झाले. त्यांनी रचलेली करप्रणाली केवळ राज्याच्या उत्पन्नासाठी नसून प्रजाहित साधण्यासाठी होती. त्यांची अर्थनीती, विशेषतः कररचना, भारतातील इतर राज्यकर्त्यांच्या तुलनेत वेगळी व अधिक प्रगत होती. यामुळेच छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक धोरण अभ्यासकांसाठी आणि इतिहासकारांसाठी विशेष महत्त्वाचे ठरते. शिवाजी महाराजांनी प्रशासनिक यंत्रणेमध्ये आर्थिक सुधारणांचा भाग म्हणून नव्या करप्रणालीची स्थापना केली. या प्रणालीचा उद्देश राज्याच्या संरक्षणासाठी आवश्यक निधी उभारणे, व्यापार व उद्योगांना चालना देणे आणि सामान्य जनतेच्या जीवनमानात सुधारणा करणे हा होता. त्यांच्या करप्रणालीमध्ये चौथ व सरदेशमुखी यांचा महत्त्वपूर्ण समावेश होता, ज्यांचा उपयोग प्रामुख्याने सैन्य व राज्याच्या संरक्षणासाठी करण्यात येत असे.

**संशोधन पद्धती:**

या अभ्यासात छत्रपती शिवाजी महाराजांची करप्रणाली, तिचा विकासात्मक व संरक्षणात्मक प्रभाव यांचा सखोल अभ्यास केला आहे. या अभ्यासात प्रामुख्याने दुय्यम स्त्रोतांवर आधारित माहितीचा वापर करण्यात आला आहे. उपलब्ध ऐतिहासिक ग्रंथ, दस्तऐवज, संशोधन प्रबंध, आणि विविध विद्वानांनी शिवाजी महाराजांच्या करप्रणालीवर केलेले लेख, हे संशोधनाचे प्रमुख स्रोत आहेत. या अभ्यासाच्या माध्यमातून शिवाजी महाराजांची करप्रणाली कशी

† व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग, चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), नवीन पनवेल
आजीव सभासद क्र. १९२१, भ्रमणध्वनी :९०२९५१५८७६, ई-मेल : atulghatge007@gmail.com

† प्रमुख, व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग, चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), नवीन पनवेल
आजीव सभासद क्र. १०७०, भ्रमणध्वनी : ९७०२३६५५४२, ई-मेल : ajaydixit2005@gmail.com

न्यायपूर्ण आणि दूरदर्शी होती याचा समग्र विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील करप्रणालीचा अभ्यास करताना विविध मराठी ग्रंथांचे संदर्भ घेण्यात आले आहेत. शिवाजी महाराजांच्या अर्थव्यवस्थेवर प्रकाश टाकणारी पुस्तके, जसे की आप्पासाहेब गद्रे यांचे शिवाजी महाराजांची राज्यव्यवस्था आणि नरहर भिडे यांचे छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि अर्थनीती, हे संशोधनासाठी आधारस्तंभ ठरले आहेत. राज्य सरकारच्या वाङ्मय मंडळाच्या आणि इतर संशोधन संस्थांच्या अहवालांचा आधार घेऊन शिवाजी महाराजांच्या करप्रणालीचा अभ्यास करण्यात आला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये:**

१ छत्रपती शिवाजी महाराजांच्या करप्रणालीचा आर्थिक आणि सामाजिक परिणामांचा अभ्यास करणे.

२ शिवाजी महाराजांच्या करप्रणालीच्या न्याय, विकास आणि संरक्षणाशी संबंधित तत्त्वांचा विश्लेषण करणे.

**शिवाजी महाराजांची करप्रणालीची रचना आणि तत्त्वे:**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या करप्रणालीची रचना अत्यंत सुव्यवस्थित आणि न्यायपूर्ण होती. शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात करप्रणालीला एक विशेष महत्त्व होते. कारण ती राज्याच्या आर्थिक विकासासाठी आणि संरक्षणासाठी प्रमुख स्रोत होती. शिवाजी महाराजांच्या करप्रणालीचे मुख्य उद्दिष्ट होते प्रजेच्या हिताचे रक्षण करणे, राज्याच्या सैन्याचा विकास करणे, आणि कृषी व व्यापाराच्या माध्यमातून समृद्धी साधणे.

**प्रमुख कर प्रकार:**

**१. चौथ:**

चौथ हा एक प्रकारचा कर होता, जो मराठा साम्राज्याने परकीय किंवा शत्रू राज्यांवर लावला होता. चौथ म्हणजे परकीय राज्याच्या उत्पन्नाच्या २५% हिस्सा, जो मराठा साम्राज्याला दिला जात असे. या कराचा मुख्य उद्देश मराठ्यांकडून संरक्षण मिळवणे किंवा मराठ्यांशी शांतता राखणे हा होता.

**शिवाजी महाराजांच्या काळातील चौथ प्रणालीचे स्वरूप:**

शिवाजी महाराजांनी चौथ लागू करण्याचे धोरण परकीय सत्तांवर राजकीय आणि लष्करी दबाव ठेवण्यासाठी वापरले. चौथ हे फक्त शत्रू राज्यांकडून घेण्यात येणारे पैसे होते आणि या करातून मराठ्यांचे सैन्य मजबूत आणि शत्रूपासून सुरक्षित राहाण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ मिळत असे.

**चौथच्या प्रणालीची वैशिष्ट्ये:**

**१. चौथचा उद्देश:** चौथ हा कर परकीय किंवा शत्रू राज्यांवर आकारला जात असे, ज्यामुळे मराठ्यांना त्या राज्यातून उत्पन्नाचा २५% हिस्सा मिळत असे. यामुळे त्या राज्यावर मराठ्यांची राजकीय आणि लष्करी पकड ठेवली जाऊ शकत होती. शिवाजी महाराजांनी या चौथाचा वापर मुघल साम्राज्य आणि अन्य परकीय सत्तांवर नियंत्रण ठेवण्यासाठी केला.

**२. चौथच्या बदल्यात संरक्षण:** चौथ घेतल्यामुळे मराठा सैन्याने त्या राज्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी घेतली. चौथचा मुख्य हेतू म्हणजे परकीय सत्तांना मराठा साम्राज्याशी शांती राखण्यासाठी पैसे देणे, जेणेकरून त्यांच्यावर थेट हल्ला होणार नाही.

शिवाजी महाराजांनी परकीय सत्तांशी शत्रुत्व टाळण्यासाठी आणि राज्याच्या स्थिरतेसाठी हा कर लावला.

**३. चौथचा वसूल दर:** चौथ हा २५% कर होता, जो त्या राज्याच्या एकूण उत्पन्नावर आकारला जात असे. हा कर अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली योग्य प्रकारे वसूल केला जात असे. शिवाजी महाराजांनी या कराची वसुली करण्यासाठी विशेष अधिकारी नेमले होते. जेणेकरून वसुलीची प्रक्रिया न्याय्य राहावी.

**सारणी क्र. १ : छत्रपती शिवाजी महाराजांच्या करप्रणालीच्या प्रमुख करांतील क्षेत्रे व त्यांचे उद्देश**

| क्षेत्र | उत्पन्नाचा टक्का (%) | उद्देश |
|---|---|---|
| सैन्य दलाच्या वेतनावर | ३५ | सैन्य दलाचे वेतन आणि उपकरणांसाठी |
| किल्ल्यांची देखभाल | २५ | किल्ल्यांच्या बांधणी व देखभालीसाठी |
| आरमाराची स्थापना | १५ | सागरी आरमारासाठी निधी |
| शस्त्रास्त्र खरेदी | १० | आधुनिक शस्त्रास्त्र खरेदीसाठी |
| इतर संरक्षण खर्च | १५ | विविध संरक्षण संबंधित खर्चासाठी |

स्त्रोत: रणजीत देसाई, श्रीमान योगी, मुंबई, २००२

**४. चौथ आणि सरदेशमुखी यांचा संबंध:** चौथ व्यतिरिक्त शिवाजी महाराजांनी सरदेशमुखी हा १०% अतिरिक्त कर आकारला होता, जो मराठा साम्राज्याच्या प्रमुख हक्काचा प्रतीक होता. सरदेशमुखी हा त्या राज्यातील राजकीय नियंत्रणासाठी लावला जात असे. चौथ आणि सरदेशमुखी हे दोन्ही कर एकत्रित करून परकीय राज्यांवर आर्थिक नियंत्रण ठेवले जात असे.

**५. राज्य विस्तारासाठी चौथचा उपयोग:** शिवाजी महाराजांनी चौथचा वापर त्यांच्या राज्याचा विस्तार करण्यासाठी आणि आर्थिक सक्षमता वाढवण्यासाठी केला. चौथ वसूल केल्याने मराठा सैन्याचे वेतन, साधने आणि युद्धाच्या तयारीसाठी आवश्यक खर्च भागवला जाई. चौथमुळे मराठ्यांचे राज्य विस्तारले आणि इतर सत्तांवर मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले.

**२. सरदेशमुखी :**

सरदेशमुखी कर हे एक प्राचीन भारतीय कर आहे, ज्याचा उल्लेख छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात आढळतो. हा कर विशेषतः कृषी उत्पादनांवर आणि बाजारपेठेतील व्यापारावर लागू करण्यात आलेला होता. शिवाजी महाराजांनी त्यांच्या प्रशासनात विविध कर प्रणालींचा अवलंब केला, ज्यामध्ये सरदेशमुखी करही समाविष्ट होता.

**सरदेशमुखी कराची वैशिष्ट्ये:**

**१. कृषी उत्पादनांवर आधारित :** सरदेशमुखी कर हा मुख्यतः शेतकऱ्यांच्या उत्पादनांवर लादला जात असे. यामध्ये धान्य, फळे आणि इतर कृषी उत्पादने यांचा समावेश होता.

**२. विभिन्न कर्तव्ये :** हा कर शेतकऱ्यांनी त्यांच्या उत्पादनांच्या एक टक्का किंवा निश्चित प्रमाणात भरणा करावा लागे. याचा उपयोग राजकीय व्यवस्थापनासाठी आणि सामरिक खर्चासाठी केला जात असे.

**३. राज्याच्या विकासात योगदान :** शिवाजी महाराजांनी सरदेशमुखी कराच्या माध्यमातून मिळवलेल्या उत्पन्नाचा उपयोग राज्याच्या विकासासाठी, सैन्य मजबूत करण्यासाठी आणि सामाजिक सेवांसाठी केला.

**४. संस्कृती व परंपरा :** सरदेशमुखी कर हा कृषिसंस्कृतीचे एक प्रतीक मानला जातो. कारण तो शेतकऱ्यांच्या श्रमाचे मूल्यांकन करतो आणि त्यांच्या उत्पादनांच्या संरक्षणासाठी आर्थिक आधार पुरवतो.

**३. शेतसारा :**

शेतसारा म्हणजे शेतजमिनीवर लावलेला कर किंवा महसूल. हा कर सामान्यतः जमिनीच्या उत्पन्नक्षमतेवर, प्रकारावर आणि क्षेत्रफळावर आधारित असतो. प्राचीन काळापासूनच शेतसारा ही राज्याच्या महसूल व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग होता. शिवाजी महाराजांनीही शेतसारा व्यवस्था सुधारून, शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी अनेक सुधारणा केल्या.

**शिवाजी महाराजांच्या काळातील शेतसारा प्रणाली :**

शिवाजी महाराजांच्या राज्यव्यवस्थेतील शेतसारा धोरण हे अत्यंत व्यवस्थित आणि शेतकऱ्यांसाठी न्याय्य होते. त्यांनी शेतकऱ्यांची काळजी घेणारी करप्रणाली तयार केली, ज्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेत स्थिरता आली आणि शेतकऱ्यांनाही विकासाच्या संधी मिळाल्या.

**शिवाजी महाराजांच्या शेतसारा प्रणालीची वैशिष्ट्ये:**

**१. जमिनीची मोजणी आणि शेतसारा निश्चिती:** शिवाजी महाराजांनी त्यांच्या राज्यात शेतजमिनीची मोजणी करण्याची प्रणाली सुरू केली. प्रत्येक जमिनीची अचूक मोजणी करून त्यानुसार शेतसारा निश्चित केला जात असे. जमिनीची उत्पादकता, पाणी उपलब्धता, आणि जमिनीचा प्रकार (सिंचित किंवा कोरडवाहू) यावर आधारित शेतसारा ठरवला जात असे.

**२. उत्पन्न आधारित शेतसारा:** महाराजांनी शेतसारा हा जमिनीवरून होणाऱ्या प्रत्यक्ष उत्पन्नावर आधारित ठेवला. त्यामुळे शेतकऱ्यांवर अत्याधिक कराचा बोजा येत नसे. उदाहरणार्थ, जर एखाद्या वर्षी पाऊस कमी झाला किंवा पिके खराब झाली, तर त्या वर्षी शेतसारा कमी केला जात असे.

**३. शेतकऱ्यांना सहकार्य आणि सूट:** दुष्काळ, पिकांची नासाडी किंवा इतर नैसर्गिक आपत्तींमध्ये शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांना शेतसारा माफी किंवा कमी सारा देण्याचे धोरण अवलंबले.

हे धोरण शेतकऱ्यांना आधार देणारे होते आणि त्यांना संकटाच्या काळात आर्थिक दिलासा देत असे.

**४. शेतकऱ्यांचे संरक्षण:** शिवाजी महाराजांच्या काळात शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी खास उपाययोजना केल्या जात असत. जर शेतसारा गोळा करणारे अधिकारी भ्रष्टाचार करत असतील तर त्यांच्यावर कडक कारवाई केली जाई. या व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळाले आणि शेतीव्यवसायात सुधारणा घडून आल्या.

**सारणी क्र. २ : करसवलतीचे प्रकार व त्याचे फायदे**

| वर्ष | करसवलतीचा प्रकार | सवलतीची रक्कम | यातून झालेला फायदा |
|---|---|---|---|
| १६६५ | दुष्काळाच्या वेळी करात कपात | ३०% कमी | शेती उत्पादन टिकून राहिले |
| १६६८ | जनतेवर आरोग्य व संकटाच्या वेळी सवलती | आपत्तीकालीन सवलत ४०% | सामान्य जनतेची आर्थिक स्थिरता कायम राहिली |
| १६७० | शेतकऱ्यांना उत्पादन कमी झाल्यामुळे सवलत | ५०% कमी | शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती स्थिर राहिली |
| १६७२ | व्यापाऱ्यांना परकीय स्पर्धेपासून संरक्षण विदेशी व्यापाऱ्यांवर कर | २०% वाढवला | स्थानिक व्यापारात १०% वाढ |

स्त्रोत: कागलकर, य. (२०१७). शिवाजी महाराजांचा आर्थिक धोरण: इतिहास व संदर्भ. नाशिक: ज्ञानप्रकाशन.

**४. कारुक कर:**

कारुक कर म्हणजे एक विशेष प्रकारचा कर जो सामान्यतः कामगार, कारागीर किंवा शिल्पकारांच्या कामावर लावला जातो. हा कर कारागीरांच्या व्यवसायाचे उत्पादन, कर्तृत्व किंवा त्यांच्या कौशल्यावर आधारित असतो. शिवाजी महाराजांच्या काळात, या कराच्या

माध्यमातून शिल्पकलेच्या विकासास प्रोत्साहन मिळवले जात होते; तसेच त्यांच्या श्रमाची आर्थिक मान्यता मिळवली जात होती.

**कारुक कराची व्याख्या:**

कारुक कर हा एक अप्रत्यक्ष कर आहे, जो विशेषतः कारागीरांच्या शिल्पकलेवर किंवा त्यांच्या उत्पादनावर लावला जातो. या कराचा उद्देश कारागीरांच्या उत्पादनाला बाजारात स्थान मिळवणे, तसेच त्यांच्या श्रमाचे मूल्य मान्य करणे हा होता.

**शिवाजी महाराजांच्या संदर्भात कारुक कर:**

**१. कारागीरांचे महत्त्व:** शिवाजी महाराजांच्या काळात कारागीरांचे महत्त्व वाढले होते. त्यांच्या साम्राज्यात विविध शिल्पकला व उद्योगांची वाढ झाली, जसे की वस्त्र उत्पादन, धातुकाम, आणि अन्य शिल्पकला कारागीर हे साम्राज्याच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावत होते. कारण त्यांच्याद्वारे निर्मित वस्त्र, धातू, दागिने इत्यादी साधनांचा उपयोग लष्करात व सामान्य जनतेत होत असे.

**२. कारुक कराची भूमिका:** शिवाजी महाराजांनी कारुक कराचा वापर कारागीरांच्या उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी केला. या करामुळे कारागीरांना त्यांच्या कामाचे योग्य मूल्य मिळवता आले. हा कर कारागीरांच्या उत्पादनावर लावला जात असल्यामुळे, त्यांच्याद्वारे उत्पादित वस्त्रांच्या व इतर सामानांच्या दरात थोडी वाढ झाली, ज्यामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला फायदा झाला.

**३. शिवाजी महाराजांचे धोरण:** शिवाजी महाराजांनी कारागीरांना विशेष संरक्षण आणि प्रोत्साहन दिले. त्यांनी त्यांना अधिक उत्पादनासाठी वाव देत त्यांचे उत्पादन वाढवले. कारुक करामुळे कारागीरांना त्यांच्या कामासाठी आवश्यक साधने मिळवण्यासाठी आर्थिक मदत मिळत असे, ज्यामुळे त्यांच्या व्यवसायाचे व्यवस्थापन सोपे झाले.

**४. आर्थिक विकास:** कारुक करामुळे शिवाजी महाराजांच्या राज्यात कारागीरांचे उत्पादन व्यवस्थापन सुधारले. कारागीरांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार योग्य पारितोषिक मिळवता आले. या करामुळे कारागीरांचे जीवनमान सुधारण्यास मदत झाली. तसेच त्यांच्यात आर्थिक स्थिरता निर्माण झाली.

**५.पायपोशी:** पायपोशी हा एक ऐतिहासिक आणि अर्थशास्त्रीय संकल्पना आहे, जी शिवाजी महाराजांच्या काळातील करप्रणालीच्या संदर्भात महत्त्वाची आहे. पायपोशी म्हणजे एक विशेष प्रकारचा कर जो सामान्यतः शेतीसंबंधित उत्पादनांवर लावला जातो. हा कर विशेषतः भाजीपाला, धान्य आणि अन्य कृषी उत्पादनांच्या विक्रीवर लावला जात असे.


**शिवाजी महाराजांच्या संदर्भात पायपोशी:**

**१. शेतकरी वर्गाचे संरक्षण:** शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांना संरक्षण देण्याचे वचन दिले होते. पायपोशी करामुळे त्यांना त्यांच्या उत्पादनांवर नियंत्रण मिळवता आले. पायपोशीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या उत्पादनांवर उचित मूल्य ठरवण्यात आले, ज्यामुळे त्यांचे आर्थिक हक्क सुरक्षित राहिले.

**२. कृषी अर्थव्यवस्था:** शेती हा शिवाजी महाराजांच्या काळात अर्थव्यवस्थेचा प्रमुख आधार होता. पायपोशी हा कर लावल्यामुळे कृषी उत्पादनांच्या विक्रीवर नियंत्रण ठेवण्यात आले, ज्यामुळे कृषी उत्पादनांना एक स्थिर बाजारपेठ मिळाली. शेतकऱ्यांनी त्यांच्या उत्पादनांचे योग्य मूल्य मिळवता आले, ज्यामुळे त्यांचे जीवनमान सुधारले.

**३. साम्राज्याचे वित्तीय व्यवस्थापन:** पायपोशी कराच्या माध्यमातून राज्याच्या अर्थसंकल्पात महत्त्वाची भर घालण्यात आली. या करामुळे राजकीय शक्तींचा विकास झाला. शिवाजी महाराजांनी या कराच्या माध्यमातून त्यांच्या लष्कराला आणि प्रशासकीय यंत्रणेला वित्तीय मदत दिली.

**आलेख क्र. १ : कर संकलन उत्पन्नात विविध करांचा वाटा (%)**




स्त्रोत : आप्पासाहेब गद्रे, शिवाजी महाराजांची राज्यव्यवस्था (पुणे: बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, १९९५)

**४. सामाजिक न्याय:** पायपोशी करामुळे सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यात मदत झाली. शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचे मूल्य मिळवण्यासाठी वाव मिळाला, ज्यामुळे शेतकऱ्यांच्या हक्कांची रक्षा झाली. शिवाजी महाराजांनी या करातून शेतकऱ्यांचे स्वातंत्र्य व मानवी हक्क सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्न केले.

**६.तेजपट्टी:** तेजपट्टी हा एक ऐतिहासिक कर प्रकार आहे जो विशेषतः शिवाजी महाराजांच्या काळात लागू होता. हा कर मुख्यतः सोने, चांदी आणि अन्य मौल्यवान वस्त्रांच्या व्यापारावर लावला जात असे. तेजपट्टीचा मुख्य उद्देश होता - व्यापारातून सरकारच्या आर्थिक स्रोतांना वाढवणे, तसेच कारागीर व व्यापाऱ्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे.

**तेजपट्टीचे महत्त्व:**

तेजपट्टी हा एक अप्रत्यक्ष कर होता जो त्या काळातील अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा घटक होता. हा कर लागू करणे म्हणजे राज्याच्या वित्तीय साक्षरतेचा आणि स्थिरतेचा एक भाग होता. तेजपट्टीच्या माध्यमातून राज्याच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत झाली.

**शिवाजी महाराजांच्या संदर्भात तेजपट्टी :**

**१. व्यापाराचा विकास :** शिवाजी महाराजांच्या काळात व्यापारी क्रियाकलापांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिकोनातून तेजपट्टी लागू करण्यात आली. त्यांनी राज्याच्या हद्दीत व्यापाराच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना केल्या.

तेजपट्टीचा उद्देश हा होता की, व्यापारातून मिळणारे उत्पन्न राज्याच्या खजिन्यात जमा होईल, ज्यामुळे लष्कराची आणि प्रशासनाची आर्थिक गरज भागवता येईल.

**२. कौशल्याचे मूल्यांकन:** तेजपट्टी लागू करून शिवाजी महाराजांनी कारागीर आणि शिल्पकारांच्या श्रमाचे योग्य मूल्यांकन केले. कारागीरांनी तयार केलेले दागिने आणि वस्त्रांना एक निश्चित कर दिला जाईल, ज्यामुळे त्यांच्या श्रमाचे मूल्य समजून घेतले जाईल. त्यामुळे कारागीरांचे आणि व्यापाऱ्यांचे जीवनमान सुधारण्यास मदत झाली.

**३. सामाजिक स्थिरता:** तेजपट्टीच्या माध्यमातून व्यापारी वर्गाला आर्थिक स्थिरता प्रदान करण्यात आली. त्यांना त्यांच्या उत्पादनांच्या किंमतीवर नियंत्रण मिळवता आले,

ज्यामुळे त्यांना सुरक्षित वातावरणात काम करण्याची संधी मिळाली. शिवाजी महाराजांनी विविध व्यवसायांना आर्थिक मदत आणि संरक्षण प्रदान केले, ज्यामुळे समाजाच्या विविध घटकांची आर्थिक स्थिरता सुनिश्चित झाली.

**४. साम्राज्याचे वित्तीय व्यवस्थापन:**तेजपट्टीमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला मजबूत आधार मिळाला. या करामुळे राजाच्या वित्तीय व्यवस्थेमध्ये सुधारणा झाली, ज्यामुळे साम्राज्याचे संरक्षण आणि विकास करणे शक्य झाले. शिवाजी महाराजांनी या करातून त्यांच्या लष्कराला आणि प्रशासनाला आवश्यक संसाधने मिळवण्यासाठी प्रयत्न केले.

**७. मोहतर्फा:**

मोहतर्फा म्हणजे एक विशेष करप्रणाली जी शिवाजी महाराजांच्या काळात लागू होती. हा कर मुख्यतः व्यापाराच्या क्षेत्रात लावला जात असे आणि याचा उद्देश होता व्यापार, वाणिज्य आणि उत्पादनांच्या नियंत्रित विकासाला प्रोत्साहन देणे. मोहतर्फा हा कर व्यापाऱ्यांनी आपल्या व्यापारामध्ये प्रवेश करण्यासाठी आणि त्यांना व्यवसाय सुरक्षित करण्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधांसाठी लावला जात होता.

**मोहतर्फा कराचे उद्देश :**

मोहतर्फा कराचा मुख्य उद्देश होता की, व्यापार व वाणिज्याला प्रोत्साहन देणे. राजकीय व आर्थिक स्थिरता साधणे. राज्याच्या खजिन्यात आर्थिक योगदान करणे.

**शिवाजी महाराजांच्या संदर्भात मोहतर्फा:**

**१. व्यापार विकास:** शिवाजी महाराजांनी त्यांच्या साम्राज्यात व्यापाराच्या वाढीसाठी मोहतर्फा कराची रचना केली. या करामुळे व्यापाऱ्यांना उत्पादन व वितरणावर नियंत्रण ठेवता आले. त्यांनी व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी रस्त्यांच्या सुरक्षेची व्यवस्था केली, ज्यामुळे व्यापाराच्या क्षेत्रात स्थिरता निर्माण झाली.

**२. व्यापाऱ्यांचे संरक्षण:** मोहतर्फा करामुळे व्यापाऱ्यांना त्यांच्या कष्टांचे योग्य मूल्य मिळवण्यासाठी सुरक्षित वातावरण मिळाले. या कराच्या अंमलबजावणीमुळे व्यापाऱ्यांचे हक्क व अधिकार सुरक्षित राहिले. शिवाजी महाराजांनी या कराचा वापर करून व्यापारात भ्रष्टाचार कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या, ज्यामुळे व्यापार सुरक्षित बनला.

**३. साम्राज्याची अर्थव्यवस्था:** मोहतर्फा करामुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा झाली. राज्याच्या खजिन्यात आर्थिक योगदान वाढल्यामुळे लष्कर व प्रशासनाची गरज भागवता आली. या करामुळे राजाच्या वित्तीय व्यवस्थेमध्ये सुधारणा झाली आणि साम्राज्याच्या विकासाला गती मिळाली.

**४. सामाजिक न्याय:** मोहतर्फा कराच्या माध्यमातून शिवाजी महाराजांनी समाजातील सर्व स्तरांवर समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. व्यापाऱ्यांना त्यांच्या उत्पादनांचे योग्य मूल्य मिळवता आले. या करामुळे शेतकऱ्यांना व कारागीरांनादेखील आर्थिक लाभ झाला. कारण व्यापाराच्या क्षेत्रात स्थिरता आल्याने सर्व स्तरांवर समृद्धी वाढली.

**सारांश:**

शिवाजी महाराजांच्या करप्रणालीने न्याय, संरक्षण, आणि आर्थिक स्थैर्य यांवर भर दिला होता. साधे आणि न्यायालयीन कर प्रचलित असतानाही, त्यातून संरक्षण व्यवस्थेला आर्थिक पाठबळ मिळत होते. आजच्या जटिल करप्रणालीत आयकर आणि जी.एस.टी.सारख्या करांचा समावेश आहे, जे राज्याच्या विकासात मोठी भूमिका बजावतात. शिवाजी महाराजांनी उत्पादनावर आधारित कररचना आखली होती, तर आधुनिक युगात कर व्यवस्थापन तंत्रज्ञानावर आधारित अधिक पारदर्शक बनले आहे. शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांना दिलेल्या कर सवलतींच्या तुलनेत आज शेतकरी आणि व्यापाऱ्यांवर अप्रत्यक्ष करांचा भार अधिक आहे. आजची करप्रणाली केवळ संरक्षण नव्हे, तर

आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक कल्याणासाठी देखील वापरली जाते. शिवाजी महाराजांच्या न्यायपूर्ण करप्रणालीचा आदर्श आजच्या आर्थिक धोरणांना एक नवा दृष्टिकोन देतो, ज्यामुळे आर्थिक समृद्धीच्या दिशेने मार्गदर्शन होते.

**संदर्भ ग्रंथ सूची:**


१. कागलकर, य. (२०१७), शिवाजी महाराजांचा आर्थिक धोरण: इतिहास व संदर्भ, नाशिक, ज्ञानप्रकाशन.

२. गाडगीळ, अ. (२०१६), शिवाजी महाराजांच्या काळातील शासन व करव्यवस्था, औरंगाबाद, शंकर प्रकाशन.

३. चव्हाण, प. (२०१४), छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय अर्थव्यवस्था, सोलापूर, सृजन प्रकाशन.

४. जाधव, जी. (२०१३), शिवाजी महाराजांचे करप्रणाली आणि व्यवस्थापन, पुणे, सानेगुरुजी प्रकाशन.

५. निंदा, वि. (२०२०), शिवाजी महाराज: करप्रणाली आणि सामाजिक न्याय, कोल्हापूर, सह्याद्री प्रकाशन.

६. पवार, भा. (२०१९), शिवाजी महाराज: एक आर्थिक विचारवंत, अहमदनगर, साक्षात्कार प्रकाशन.

७. पाटील, शं. (२०१८), शिवाजीच्या काळातील कर व्यवस्थापन, ठाणे, लोकसत्ता प्रकाशन.

८. बरोडकर, शं. (२०१५), छत्रपती शिवाजी महाराज: एक ऐतिहासिक पुनरावलोकन, मुंबई, मराठी ग्रंथ परिषद.

9. Bhagat, P. (2021). Chhatrapati Shivaji Maharaj: Economics and Governance in 17th Century India. Chennai: Modern Indian History Association.

10. Deshmukh, M. (2017). Shivaji Maharaj: A Visionary Leader and His Tax System. New Delhi: Academic Publications.

11. Gupta, S. (2020). Taxation and Administration in Medieval India: The Case of Shivaji Maharaj. Jaipur: Rajputana Publishing.

12. Kulkarni, R. (2015). Economic Policies of Chhatrapati Shivaji Maharaj. Mumbai: Indian Historical Society.

13. Ranjan, A. (2018). Chhatrapati Shivaji Maharaj and the Development of Administrative Systems in Maharashtra. Delhi: Historical Research Press.

14. Sharma, T. (2016). The Legacy of Chhatrapati Shivaji Maharaj in Indian Taxation. Kolkata: Heritage Books.


◆

नवप्रवर्तन हे आर्थिक विकासाचे एक अक्षम्य इंजिन आहे.

**- ली केकियांग**

# धाराशिव जिल्ह्यातील जमीन वापराच्या पद्धतींचा भूत, वर्तमान, आणि भविष्यकालीन तुलनात्मक अभ्यास

**अतुल जी. राजगुरू** †
**दादा रा. ननवरे** ††

**प्रस्तावना**

धाराशिव जिल्हा पूर्वीच्या हैद्राबाद प्रांतातील मराठवाडा म्हणविल्या जाणाऱ्या मराठी भाषिक जिल्ह्यापैकी एक आहे. द्विभाषिक राज्याच्या स्थापनेच्यावेळी म्हणजे १९५६ साली हा जिल्हा मराठवाड्यातील उर्वरित चार जिल्ह्यांसह मुंबई या द्विभाषिक राज्यात समाविष्ट करण्यात आला. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर या जिल्ह्याचा महाराष्ट्रातील मराठी भाषिक राज्यात समावेश करण्यात आला. बीड, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), नांदेड, जालना, हिंगोली, लातूर व परभणी या मराठवाड्यातील सात जिल्ह्यांबरोबर धाराशिव जिल्ह्यासह आठ जिल्ह्यांचा मिळून छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) या स्वतंत्र महसूल विभागाची स्थापना करण्यात आली आहे (देशमुख, आर., २०१०).

धाराशिव जिल्हा दक्षिण पठाराच्या क्षेत्रात येतो. जिल्ह्याचा बराच भाग खडकाळ असून उर्वरित भाग सपाट आहे आणि समुद्र सपाटीपासून सरासरी ६०० मीटर उंचीवर आहे. हा जिल्हा बालाघाट डोंगराच्या लहान कक्षेत स्थित असून, काही तालुके सपाट प्रदेशावर आहेत. जिल्ह्याचा काही भाग गोदावरी नदीच्या खोऱ्यात व काही भाग भिमेच्या खोऱ्यात मोडतो. गोदावरी नदीची महत्त्वाची उपनदी, मांजरा या नदीच्या खोऱ्यात कळंब व वाशी तालुके आहेत. मांजरा नदीची उपनदी तेरणा या नदीच्या कक्षेत धाराशिव, उमरगा व लोहारा हे तालुके येतात (जोशी, एस., २०१५). परंडा, भूम, तुळजापूर आणि उमरगा या तालुक्यांचा काही भाग सीना नदीच्या खोऱ्यात मोडतो. सीना नदी ही भिमा नदीची उपनदी आहे. जिल्ह्यातील सर्व शहरांमध्ये भूम हे शहर समुद्र सपाटीपासून सर्वात जास्त ७६० मीटर उंचीवर आहे, तर परंडा हे शहर सर्वात कमी ५३० मीटर उंचीवर आहे. पठाराची सरासरी उंची ६०० मीटर असून त्याचा दक्षिणेकडील खोलगट भाग भिमा नदीच्या खोऱ्यात मोडतो (पाटील आणि कुलकर्णी, २०१५).

धाराशिव जिल्ह्यातील जमिनीची विभागणी ढोबळमानाने काळ्या व सुपीक मातीचा थर असलेली

† संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्र अधिविभाग (स्वायत्त), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४.
आजीव सभासद क्र. २०४६, भ्रमणध्वनी : ९५४५८५५०८२, ई-मेल : ajr.rs.economics@unishivaji.ac.in
† सहाय्यक प्राध्यापक, यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४.
आजीव सभासद क्र. २०८०, भ्रमणध्वनी : ८००७७८९४२४, ई-मेल : drn.50636@unishivaji.ac.in

काळी भोर सुपीक जमीन आणि हलक्या प्रतीची जमीन या दोन विभागांत करता येते. जमिनीच्या या वैशिष्ट्यामुळे या भागात खरीप व रब्बी या दोन्ही हंगामातील पिके घेतली जातात. यामध्ये कळंब व धाराशिव या तालुक्यांचा समावेश होतो (अहमद, एस., २०१५). कळंब व धाराशिव या तालुक्याच्या पूर्व भागात खरीप व पश्चिमेकडील भागात रब्बी पिके घेतली जातात. कळंब व धाराशिव हे तालुके वगळता दुसऱ्या विभागात प्रामुख्याने सुपीक जमिनीचा समावेश आहे, तेथे मुख्यत्वे रब्बी पिके घेतली जातात (पाटील, आर., २०१९).

धाराशिव जिल्ह्यातील जमीन वापराच्या पद्धतींचा तुलनात्मक अभ्यास भूगोल, कृषिविकास आणि पर्यावरणीय परिणाम यांचे एकत्रित मूल्यांकन करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. जमिनीचा उपयोग विविध क्षेत्रांमध्ये, जसे की कृषी, उद्योग, नागरीकरण आणि इतर विविध उपयोगांमध्ये होतो, यामुळे तो समजून घेतल्यास शाश्वत विकास साधता येतो. जमीन वापराच्या पद्धतींमध्ये वेळोवेळी होणारे बदल, पर्यावरणीय ताण, जलस्रोतांचा वापर आणि संसाधनांचा अपव्यय यांचा अभ्यास शाश्वत व वैविध्यपूर्ण विकासासाठी आवश्यक आहे. तसेच जमीन वापर विश्लेषणामुळे भूमीवापराच्या धोरणांमध्ये सुधारणा केली जाऊ शकते. ज्यामुळे भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून शाश्वत विकास साधता येईल. त्याचप्रमाणे, जमीन वापराच्या पद्धतींमध्ये होणारे बदल रोजगार संधी, जलसंपदा व्यवस्थापन आणि पर्यावरणीय संरक्षणाशी संबंधित महत्त्वपूर्ण मुद्देदेखील स्पष्ट होतात. हा अभ्यास जिल्ह्याच्या शाश्वत विकासाच्या ध्येयांच्या पूर्ततेसाठी आणि दीर्घकालीन संसाधन व्यवस्थापनासाठी महत्त्वपूर्ण ठरतो (शेट्टी, २०१८; जोशी, २०१५).

**समस्या विधान**


धाराशिव जिल्हा हा ऐतिहासिकदृष्ट्या शेतीप्रधान असलेल्या भागांपैकी एक असून, येथे विविध कालखंडात जमीन वापराच्या पद्धतींमध्ये लक्षणीय बदल घडले आहेत (पाटील, २०२०). भूतकाळात पारंपरिक शेती पद्धती आणि जलसिंचनाच्या मर्यादित साधनांवर अवलंबून असलेल्या या जिल्ह्यात, शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि तांत्रिक प्रगतीमुळे जमीन वापरात मोठ्या प्रमाणात बदल अनुभवले आहेत (देशमुख, २०१८). या बदलांचा परिणाम केवळ आर्थिकदृष्ट्या नाही, तर पर्यावरणीय, सामाजिक आणि सांस्कृतिक स्तरावरही होत आहे (जाधव, २०१९). सध्याच्या स्थितीत जमीन वापराचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. जसे की, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शेती, औद्योगिक विकासासाठी वापरली जाणारी जमीन, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधा. तथापि, या बदलांमुळे पर्यावरणीय ताण निर्माण होण्याची शक्यता आहे. जसे की, जमिनीची धूप, पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि जैवविविधतेवर होणारे दुष्परिणाम. भविष्यातील दृष्टिकोनातून विचार करता, जिल्ह्यातील जमीन वापराच्या पद्धतींवर तंत्रज्ञान, धोरणे आणि पर्यावरणीय संतुलन यांचा प्रभाव वाढणार आहे (जोशी, २०२१; शर्मा, २०२०). त्यामुळे जिल्ह्याच्या शाश्वत विकासासाठी योग्य नियोजनाची आणि धोरणात्मक उपायांची गरज आहे (पाटील, २०१९). यामध्ये, पारंपरिक कृषी पद्धतींच्या टिकावाचा विचार करत, तंत्रज्ञानाचा वापर करून कृषिक्षेत्राच्या शाश्वततेचा शोध घेणे आवश्यक आहे. शहरीकरणामुळे भूमिगत जलस्रोतांचा वापर आणि मातीची धूप होऊ शकते. त्यामुळे जलसंधारण व पर्यावरणीय संरक्षणासाठी अधिक सक्षम धोरणांची आवश्यकता आहे. यासाठी, जमीन वापराच्या पद्धतींचा भूत, वर्तमान आणि भविष्यकाळाचा तुलनात्मक अभ्यास करून, उद्‌भवणाऱ्या समस्या, संधी आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने धोरणात्मक शिफारशी देणे आवश्यक आहे.

## संशोधन उद्दिष्ट्ये

धाराशिव जिल्ह्यातील जमीन वापराच्या पद्धतींचा भूत, वर्तमान आणि भविष्यकाळाचा तुलनात्मक अभ्यास करणे हे या संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये, भूतकाळातील पारंपरिक पद्धती, वर्तमानातील आधुनिक उपाययोजना आणि भविष्यकाळातील संभाव्य आव्हाने व संधी यांचा सखोल आढावा घेतला आहे. भूतकाळातील पारंपरिक पद्धती ज्या सामाजिक आणि पर्यावरणीय घटकांवर आधारित होत्या, त्यांचा अभ्यास करून, वर्तमानकाळात शाश्वत विकास साधण्यासाठी केलेली शेतकरी धोरणे आणि औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियांमुळे जमीन वापरातील बदल तपासणे. तसेच भविष्यकाळात जमीन वापराच्या पद्धतींचा कल आणि त्यामुळे येणाऱ्या आव्हानांची पूर्वसूचना देणे, त्यावर उपाययोजना तयार करणे आणि शाश्वत व्यवस्थापन पद्धती सुधारण्यासाठी उपयुक्त माहिती देणे त्यामुळे जमीन व्यवस्थापनाच्या कार्यक्षमतेमध्ये सुधारणा होईल आणि शाश्वत विकास साधण्यास मदत होईल.

## अभ्यासक्षेत्र

धाराशिव जिल्हा मराठवाड्याच्या अत्यंत पूर्वेकडील भागात स्थित आहे, ज्याचा विस्तार अक्षांश १७.३५° ते १८.४०° उत्तर आणि रेखांश ७५.१६° ते ७६.४०° पूर्व यामध्ये आहे (महाराष्ट्र शासन, २०२४). जिल्ह्याच्या नैऋत्येस सोलापूर, वायव्य बाजूला अहमदनगर, उत्तरेस बीड, ईशान्य-पूर्व दिशेला लातूर व दक्षिणेस कर्नाटक




राज्यातील बिदर आणि गुलबर्गा जिल्ह्यांची सीमा जोडलेली आहेत.

धाराशिव जिल्ह्यात आठ तालुके आहेत, जे खालीलप्रमाणे : धाराशिव, कळंब, उमरगा, तुळजापूर, परंडा, भूम, वाशी आणि लोहारा (भारत सरकार, २०२३). या जिल्ह्याचा भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोनामुळे विविध शेतकऱ्यांच्या जमिनींच्या वापराबद्दल महत्त्वपूर्ण निरीक्षणे आणि अध्ययन केले आहेत, ज्याचा परिणाम जिल्ह्याच्या शाश्वत विकासावर होतो.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम माहिती साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. दुय्यम साधनसामग्रीसाठी, 'जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन धाराशिव' या अहवालांचा आधार घेतला आहे, ज्यात धाराशिव जिल्ह्यातील जमीन वापराच्या विविध पद्धतींचा २०११

व २०२२ या कालावधीतील अहवालांचा समावेश आहे (महाराष्ट्र शासन, २०२४). या अहवालांमध्ये जिल्ह्यातील कृषी पद्धती, सिंचनाचे प्रमाण, औद्योगिकीकरण आणि इतर पर्यावरणीय व सामाजिक घटकांचा उल्लेख आहे. दुय्यम आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी टक्केवारीचे विश्लेषण, विविध प्रतिमान आणि इतर सांख्यिकी साधनांचा उपयोग केला आहे. त्याशिवाय, जिल्ह्यातील विविध शाश्वत विकास धोरणांच्या प्रभावाचे विश्लेषण करण्यासाठी तपशीलवार साक्षात्कार घेतला आहे (भारत सरकार, २०२३).

**६. तालुकानुसार जमीन वापराच्या बदलांचे विश्लेषण आणि परिणाम**

प्रस्तुत अभ्यास हा मुख्यतः तालुकानिहाय धाराशिव जिल्ह्याच्या जमीन वापराच्या पद्धतींचा सखोल अभ्यास करण्यावर लक्ष केंद्रित करतो. या अभ्यासाद्वारे जमीन वापराच्या पद्धतीमधील बदल आणि त्यातील सुधारणा ओळखून शाश्वत विकासाच्या दिशेने पावले उचलता येतील. यामुळे केवळ शेतीच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान होईल. धाराशिव जिल्ह्याच्या तालुकानिहाय जमीन वापराच्या पद्धतींचा अभ्यास करणं अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण जमीन हा एक अत्यंत आवश्यक संसाधन आहे, जो कृषी, औद्योगिक, नागरीकरण आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण ठरतो (चव्हाण, २०२०; कुलकर्णी व इतर २०१८).

या प्रस्तावित अभ्यासात धाराशिव जिल्ह्यातील जमिनीच्या वापराच्या पद्धतींचा २०११, २०२२ आणि २०३० या कालखंडांतील दुय्यम सांख्यिकी माहितीचा उपयोग करून सखोल आणि तुलनात्मक अभ्यास केला जातो. यामध्ये मागील संख्यात्मक माहितीच्याआधारे भविष्यकालीन जमीन वापराच्या पद्धतींचे विश्लेषण देखील केले आहे. तक्ता क्र. १ मध्ये धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील जंगलव्याप्त क्षेत्र, शेतीसाठी वापर न झालेली जमीन, पडीत जमीन, निव्वळ लागवडीयोग्य जमीन आणि पिकांखालील एकूण क्षेत्र या प्रमुख जमीन वापराच्या पद्धतीचे २०११, २०२२ आणि २०३० या कालावधीमधील बदलांचे विश्लेषण केले आहे. याशिवाय, २०३० च्या कालखंडासाठी अनुमानित आकडेवारीच्याआधारे भविष्यकालीन जमीन वापराचे तपशीलदेखील दिले जातात, जे शाश्वत विकासाच्या योजनांसाठी उपयुक्त ठरतील (पाटील, २०२१); जोशी आणि बापट, २०२३). संपूर्ण अभ्यासाचा उद्देश जमीन वापराच्या पद्धतीमधील बदल ओळखून त्या बदलांचे परिणाम विश्लेषित करणे आहे. जेणेकरून योग्य धोरणात्मक उपाययोजना सुचवता येतील. यामुळे कृषिक्षेत्राच्या अधिक समृद्धीसाठी, औद्योगिकीकरण आणि नागरीकरणाच्या प्रभावी नियोजनासाठी तसेच पर्यावरणीय संवर्धनासाठी प्रभावी पावले उचलता येतील.

**तालुकानिहाय जंगलव्याप्त क्षेत्र**

तक्ता क्र. १ आणि आकृती क्र. १ नुसार धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील जंगलव्याप्त क्षेत्राचे २०११, २०२२ आणि २०३०* या कालावधीतील तुलनात्मक विश्लेषण दिले आहे. २०११ आणि २०२२ या दोन्ही कालावधीत धाराशिव तालुक्याचे जंगलव्याप्त क्षेत्र २००० हेक्टर होते, जे फक्त २.४% इतके होते. परंतु २०३० मध्ये या क्षेत्रात घट होऊन १.५% होण्याची शक्यता आहे. परंडा तालुका २०११ आणि २०२२ या कालावधीत सर्वात कमी जंगलव्याप्त क्षेत्र (०.०%) असणारा तालुका राहिला. धाराशिव आणि तुळजापूर हे तालुके अनुक्रमे २.४% जंगलव्याप्त क्षेत्र असलेले सर्वाधिक क्षेत्र असणारे तालुके होते. ज्यामध्ये या दोन कालावधीत कोणताही बदल झाला नाही. तथापि, २०३० पर्यंत या दोन्ही

## तक्ता क्र.१: धाराशिव जिल्ह्यातील जमिनीचा वापर (क्षेत्र - हेक्टर)


| वर्ष/ तालुके | एकूण भौगोलिक क्षेत्र | | जंगलव्याप्त क्षेत्र | | | | | | शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र/बिगर शेतीवापराखालील जमीन | | | | | | पडीतजमिनी व्यतिरिक्त लागवड न झालेली एकूण जमीन | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०११ | % | २०११ | % | २०२२ | % | २०३०* | % | २०११ | % | २०२२ | % | २०३०* | % | २०११ | % | २०२२ | % | २०३०* | % |
| परंडा | ८३३६७ | ११.० | ० | ०.० | ० | ०.० | ० | ०.० | ४३७९ | ५.३ | ४३९० | ५.३ | ४३९८ | ५.३ | २११२ | २.५ | २४१९ | २.९ | २६४२ | ३.२ |
| भूम | ८१५५९ | १०.७ | ७८३ | ०.९ | ७८३ | ०.९ | ७८३ | १.० | ४१८५ | ५.१ | २०७६ | २.५ | ५४२ | ०.७ | ३१४३ | ३.९ | १४८० | १.८ | २७१ | ०.३ |
| वाशी | ५६७७८ | ७.५ | ४११ | ०.५ | ४११ | ०.५ | ४११ | ०.७ | २२७१ | ४.० | ४५० | ०.८ | ०.० | ०.० | २०२१ | ३.६ | ५८४० | १०.३ | ८६१७ | १५. |
| कळंब | ९५५७०५ | १२.६ | ४९८ | ०.६ | ४९८ | ०.६ | ४९८ | ०.५ | ५४८१ | ५.७ | १६३७ | १.७ | ०.० | ०.० | १३७७० | १४.४ | १०८७ | १.१ | ० | ०.० |
| धाराशिव | १३४७२२ | १७.८ | २००० | २.४ | २००० | २.४ | २००० | १.५ | 2९६५ | २.२ | २८१० | २.१ | २६९७ | २.० | ३६५३ | २.७ | २० | ०.० | ० | ०.० |
| तुळजापूर | १५०१२४ | १९.८ | १७०८ | २.४ | १७०८ | २.४ | १७०८ | १.१ | ३९०४ | २.६ | २४१५ | १.६ | १३३२ | ०.९ | १८२५४ | १२.२ | ५०२५ | ३.३ | ० | ०.० |
| लोहारा | ९८३५९ | १२.९ | १०७४ | १.४ | १०७४ | १.४ | १०७४ | १.१ | ३६०४ | ३.७ | १६१५ | १.६ | १६८ | ०.२ | ५७५२ | ५.८ | ४८५१ | ४.९ | ४१९६ | ४.३ |
| उमरगा | ५६२८६ | ७.४ | २२६ | ०.३ | २२६ | ०.३ | २२६ | ०.४ | १७१८ | ३.१ | १२८० | २.३ | ९६१ | १.७ | १६११ | २.९ | १९३६ | ३.४ | २१७२ | ४.९ |
| जिल्हा एकूण | ७५६९०० | १००.० | ६७०० | ८.० | ६७०० | ८.० | ६७०० | ०.९ | २८५०७ | ३.८ | १६६७३ | २.२ | ९२२५ | १.२ | ५०३१६ | ६.६ | २२६५८ | ३.३ | १७८९८ | २. |

| वर्ष/ तालुके | पडीतजमिन एकूण | | | | | | लागवडलायक निव्वळ क्षेत्र | | | | | | लागवडीलायकक्षेत्र | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०११ | % | २०२२ | % | २०३०* | % | २०११ | % | २०२२ | % | २०३०* | % | २०११ | % | २०२२ | % | २०३०* | % |
| परंडा | ८३४ | १.० | ६३८८ | ७.७ | १०४०७ | १२.५ | ७७२९० | ९२.७ | ६७८०३ | ८१.३ | ६०९०३ | ७३.१ | ७७२९० | ९२.७ | ७६६१० | ९१.९ | ७६११५ | ९१.३ |
| भूम | १०३६० | १२.७ | ४७९ | ०.६ | ० | ०.० | ६०९९१ | ७४.८ | ७९८४० | ९७.३ | ८०५४८ | ९८.८ | ६३०८८ | ७७.४ | ७५७४१ | ९२.९ | ७६६७० | ९४.० |
| वाशी | ४०८ | ०.७ | १०१८२ | १७.९ | १७२९० | ३०.५ | ५१४८७ | ९०.७ | ५१७७५ | ९१.२ | ५१९५८ | ९१.६ | ५१६६७ | ९१.० | ४६८९५ | ८२.६ | ५०३३४ | ८८.६ |
| कळंब | १४९६३ | १५.६ | १६५५ | १.७ | ० | ०.० | ७६९५७ | ८०.४ | ८२५७२ | ८६.३ | ८६६६१ | ९०.५ | ८३९९० | ८७.८ | ९०८२८ | ९४.९ | ९४७९९ | ९९.१ |
| धाराशिव | २५४९५ | 1८.९ | २६ | ०.० | ० | ०.० | ११७७५९ | ८७.४ | १२१७५९ | ९०..४ | १२४६६८ | ९२.५ | १००६०९ | ७४.७ | १२९८६६ | ९६.४ | १२५६६८ | ९३.३ |
| तुळजापूर | ११३०१ | ७.५ | ४४१९ | २.९ | ० | ०.० | १०२३३६ | ६८.२ | १३००३३ | ८६.६ | १४८११३ | ९७.१ | १०८३३६ | ७२.२ | १३९४७७ | ९२.९ | १४५७१३ | ९७.१ |
| लोहारा | ११३४६ | ११.५ | ३५७० | ३.६ | ० | ०.० | ७९०५६ | ८०.४ | ८२५१५ | ८३.९ | ८५०३१ | ८६.४ | ७९०५६ | ८०.४ | ९०९३६ | ९२.५ | ८८५७६ | ९०.१ |
| उमरगा | ८३ | ०.१ | १३७२ | २.४ | २३०९ | ४.१ | ५०२९४ | ८९.४ | ४८०५६ | ८५.४ | ४६४२८ | ८२.५ | ५०२९४ | ८९.४ | ५१३६४ | ९१.३ | ५२१४२ | ९२.६ |
| जिल्हा एकूण | ७४७९० | ९.९ | २८०९१ | ३.७ | ३००२७ | ४.० | ६१६१७० | ८१.४ | ६६४३५६ | ८७८ | ६८२०३७ | ९०.१ | ६१४३३३ | ८१.२ | ७०१७१७ | ९२.७ | ७१००१८ | ९३.८ |

संदर्भ :- १.जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, धाराशिव. २. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी धाराशिव (संदर्भ वर्ष २०११, २०२२)

✻ = भविष्यकालीन अनुमानित आकडेवारी

### आकृती क्र.२ धाराशिव जिल्ह्याचे तालुकानिहाय जंगलव्याप्त क्षेत्र
### (अ) २०११, (ब) २०२२ आणि (क) २०३०*




(अ) २०११ (ब) २०२२ (क) २०३०*

तालुक्यांतील जंगल क्षेत्र घटून १.१% पर्यंत खाली येण्याची शक्यता आहे.


भूम तालुक्याचे जंगल क्षेत्र ७८३ हेक्टर होते आणि ते स्थिर राहिले आहे. मात्र, २०३० पर्यंत हे क्षेत्रीय प्रमाण किंचित वाढून १.०% होण्याची शक्यता आहे. वाशी तालुक्याचे जंगल क्षेत्र ४११ हेक्टर होते, जे २०३० मध्ये थोडे वाढून ०.७% होईल. कळंब तालुक्याचे जंगल क्षेत्र ४९८ हेक्टर असून, २०३० पर्यंत या क्षेत्रात किंचित घट होऊन ०.५% होण्याची शक्यता आहे. लोहारा तालुक्याचे जंगल क्षेत्र १०७४ हेक्टर आहे; परंतु २०३० मध्ये ते १.३% वरून १.१% पर्यंत कमी होईल. उमरगा तालुक्याचे जंगल क्षेत्र २२६ हेक्टर असून, २०३० पर्यंत त्याचे प्रमाण ०.४% पर्यंत किंचित वाढेल. धाराशिव जिल्ह्याचे एकूण जंगलव्याप्त क्षेत्र ६७०० हेक्टर असून, ते २०११, २०२२ आणि २०३० या कालावधीत स्थिर राहाणार आहे, ज्याचे क्षेत्रीय प्रमाण ८% आहे. काही तालुक्यांमध्ये जंगलक्षेत्र स्थिर राहील, तर काही ठिकाणी किंचित घट किंवा वाढ दिसून येईल. विशेषतः धाराशिव आणि तुळजापूर तालुक्यांमध्ये जंगल क्षेत्रामध्ये घट दिसून येईल, तर भूम आणि उमरगा तालुक्यांमध्ये थोड्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे.

**तालुकानिहाय शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र**

तक्ता क्रमांक १ व आकृती क्रमांक २ मध्ये तालुकानिहाय धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्याचे २०११, २०२२, आणि २०३०* (अनुमानित) मधील शेतीसाठी उपलब्ध नसलेल्या क्षेत्राचे विश्लेषण दिले आहे. २०११ मध्ये कळंब तालुका ५.७% (५,४८१ हे.) शेतीयोग्य नसलेल्या सर्वाधिक क्षेत्रासह पहिल्या क्रमांकावर होता. त्यानंतर परांडा ५.३% (४,३७९ हे.) आणि भूम ५.१% (४,१८५ हे.) हे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर होते. धाराशिव तालुका २.२% (२,९६५ हे.) क्षेत्रासह सर्वात कमी शेतीयोग्य नसलेला तालुका होता. वाशी, लोहारा आणि उमरगा तालुक्यांमध्ये हे प्रमाण ३.०% ते ५.०% दरम्यान होते.

सन २०२२ मध्ये परांडा तालुक्याचे शेतीयोग्य नसलेले क्षेत्र स्थिर राहून ५.३% (४,३९० हे.) इतके होते. भविष्यातील २०३० च्या अंदाजानुसार, परांडा

**आकृती क्र.२ : धाराशिव जिल्ह्याचे तालुकानिहाय शेतीला उपलब्ध नसलेले क्षेत्र (अ) २०११, (ब) २०२२ आणि (क) २०३०***



(अ)२०११ (ब)२०२२ (क) २०३०*


तालुका ५.३% (४,३९८ हे.) क्षेत्रासह शेतीयोग्य नसलेल्या सर्वाधिक क्षेत्राचा तालुका असेल. वाशी तालुका २०२२ मध्ये ०.८% (४५० हे.) क्षेत्रासह सर्वात कमी शेतीयोग्य नसलेल्या क्षेत्राचा तालुका होता. भविष्यात वाशी व कळंब या तालुक्यांमध्ये शेतीयोग्य नसलेल्या जमिनीच्या क्षेत्रात लक्षणीय घट होऊन २०३० पर्यंत याचे प्रमाण १.०% पेक्षा कमी होईल. भूम, वाशी आणि कळंब तालुक्यांमधील शेतीयोग्य नसलेल्या जमिनीचे क्षेत्र २०३० पर्यंत जवळपास ०.०% पर्यंत कमी होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे पूर्वी शेतीयोग्य नसलेल्या जमिनी शेतीयोग्य बनतील. भूम, तुळजापूर, आणि उमरगा तालुक्यांमध्ये शेतीयोग्य नसलेल्या जमिनीचे प्रमाण २०३० पर्यंत किंचित घटून १.०% ते ३.०% दरम्यान राहील.

एकूण धाराशिव जिल्ह्याचा तालुकानिहाय शेतीयोग्य नसलेल्या जमिनीच्या क्षेत्राच्या विश्लेषणावरून असे दिसते की, २०११ मध्ये हे प्रमाण ३.८% (२८,५०७ हे.) होते. २०२२ मध्ये त्यामध्ये घट होऊन २.२% (१६,६७३ हे.) पर्यंत आले. भविष्यात, २०३० पर्यंत हे प्रमाण १.२% (९,२२५ हे.) इतके राहील. भूम, वाशी, कळंब, तुळजापूर आणि लोहारा तालुक्यांमध्ये शेतीयोग्य नसलेल्या जमिनीचे प्रमाण २०३० पर्यंत १.०% पेक्षा कमी राहील. मात्र परांडा तालुका ५.३% क्षेत्रासह इतर तालुक्यांच्या तुलनेत सर्वाधिक राहील, तर वाशी आणि कळंब तालुके ०.०% क्षेत्रासह सर्वात कमी राहातील.

### तालुकानिहाय पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेले क्षेत्र

तक्ता क्र. १ व आकृती क्र. २ मध्ये तालुकानिहाय धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्याच्या सन २०११, २०२२ आणि भविष्यातील २०३० मध्ये अनुमानित पडीत जमिनी व्यतिरिक्त लागवड न झालेल्या एकूण जमिनीचे विश्लेषण दिले आहे. सन २०११ मध्ये कळंब तालुका १४.४% (१३,७७० हे.) सह सर्वाधिक पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या एकूण जमिनीचा क्षेत्रफळ असलेला तालुका होता. त्यानंतर तुळजापूर तालुका १२.२% (१८,२५४ हे.) आणि लोहारा ५.८% (५,७५२ हे.) हे अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर होते. परंडा तालुका २.५% (२,४१९ हे.) सह सर्वात कमी पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या जमिनीचे क्षेत्रफळ असलेला तालुका होता. उर्वरित वाशी, धाराशिव, भूम व उमरगा या तालुक्यांमध्ये

**आकृती क्र.३ : धाराशिव जिल्ह्याचे तालुकानिहाय पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेले क्षेत्र (अ) २०११, (ब) २०२२ आणि (क) २०३०***





(अ)२०११ (ब)२०२२ (क) २०३०*

पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या जमिनीचे प्रमाण २.६% ते ४.०% इतके होते.

सन २०२२ मध्ये सर्व तालुक्यांतील पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या एकूण जमिनीच्या क्षेत्रामध्ये किंचित घट झाली. भविष्यातील २०३० या अंदाजानुसार, वाशी तालुका १५.२% (८,६१७ हे.) सह सर्वाधिक पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या जमिनीचे क्षेत्रफळ असलेला तालुका असेल, तर तुळजापूर, धाराशिव आणि कळंब हे तालुके २०३० मध्ये ०.०% (०० हे.) इतके प्रमाण असलेले, सर्वांत कमी पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या जमिनीचे क्षेत्रफळ असलेले तालुके ठरतील. वाशी व कळंब तालुक्यांमध्ये पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या जमिनीचे प्रमाण २०३० पर्यंत लक्षणीय घटून १.०% पेक्षा कमी होईल. भविष्यात भूम, वाशी आणि कळंब तालुक्यांमध्ये या जमिनीच्या क्षेत्रफळामध्ये मोठ्या प्रमाणात घट होऊन ते ०.०% पर्यंत कमी होईल. याचा अर्थ असा की, पूर्वी पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या जमिनी, शेती किंवा इतर कारणांसाठी वापरली जाईल.

त्याचप्रमाणे परंडा, लोहारा, उमरगा आणि भूम तालुक्यांतील पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या जमिनीच्या क्षेत्रफळामध्ये २०३० पर्यंत थोड्या प्रमाणात घट होऊन त्याचे प्रमाण १.०% ते ३.०% दरम्यान राहील. संपूर्ण धाराशिव जिल्ह्याच्या पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या जमिनीच्या क्षेत्रफळाच्या विश्लेषणावरून दिसते की, २०११ मध्ये हे प्रमाण ६.६% (५०,३१६ हे.) होते, जे २०२२ मध्ये घटून ३.३% (२७,६५८ हे.) झाले. २०३० पर्यंत हे प्रमाण आणखी घटून २.४% (४,७६० हे.) इतके राहील. तसेच धाराशिव, भूम, कळंब व तुळजापूर तालुक्यांमध्ये २०३० पर्यंत पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या जमिनीचे प्रमाण ०.०% पर्यंत कमी होईल. मात्र वाशी (१५.२%) तालुक्यात हे प्रमाण इतर तालुक्यांच्या तुलनेत अधिक राहील, तर लोहारा, परंडा आणि कळंब तालुक्यांमध्ये हे प्रमाण अनुक्रमे १.०% ते ४.०% इतके राहील.

**आकृती क्र.४: धाराशिव जिल्ह्याचे तालुकानिहाय पडीत जमिनीचे क्षेत्र (अ) २०११, (ब) २०२२ आणि (क) २०३०***



(अ)२०११ (ब)२०२२ (क) २०३०*

### तालुकानिहाय पडीत जमिनीचे क्षेत्र

तक्ता क्र. १ व आकृती क्र. ४ मध्ये तालुकानिहाय धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्याचे सन २०११, २०२२, तसेच भविष्यकालीन २०३०* मधील अनुमानित पडीत जमिनीचे विश्लेषण दिले आहे. सन २०११ मध्ये धाराशिव तालुका हा १८.९% (२५,४९५ हे.) सह सर्वाधिक पडीत जमिनीचे क्षेत्र असणारा तालुका होता. त्यानंतर कळंब १२.७% (१४,९६३ हे.) आणि भूम १२.७% (१०,३६० हे.) सह अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर होते. उमरगा तालुका ०.१% (८३ हे.) सह सर्वात कमी पडीत जमिनीचे क्षेत्र असणारा तालुका होता. उर्वरित तुळजापूर, लोहारा, परंडा आणि वाशी या तालुक्यांमध्ये पडीत जमिनीचे प्रमाण १.०% ते १०.०% दरम्यान होते.

सन २०२२ या कालावधीमध्ये सर्व तालुक्यांच्या पडीत जमिनीच्या क्षेत्रात थोडी घट झाली आहे. भविष्यकालीन अंदाजानुसार २०३० मध्ये वाशी तालुका ३०.५% (१७,२९० हे.) सह सर्वाधिक पडीत जमिनीचे क्षेत्र असणारा तालुका ठरेल. तर भूम, कळंब, तुळजापूर, धाराशिव आणि लोहारा हे तालुके २०३० मध्ये सर्वात कमी ०.०% (० हे.) पडीत जमिनीचे क्षेत्र असणारे ठरतील. उमरगा व परंडा या तालुक्यांमध्ये २०३० पर्यंत पडीत जमिनीच्या क्षेत्रात लक्षणीय वाढ दिसून येईल, परंतु हे प्रमाण ४.०% ते १२.०% दरम्यान राहील.


भविष्यात भूम, कळंब, तुळजापूर, धाराशिव आणि लोहारा या तालुक्यांमध्ये पडीत जमिनीच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट होऊन २०३० पर्यंत ते ०.०% पर्यंत कमी होईल, म्हणजेच पूर्वीची पडीत जमीन शेतीसाठी वापरली जाईल. धाराशिव जिल्ह्याच्या तालुकानिहाय पडीत जमिनीच्या विश्लेषणावरून असे दिसते की, २०११ मध्ये धाराशिव जिल्ह्यात पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेल्या एकूण जमिनीचे प्रमाण ९.९% (७४,७९० हे.) होते. २०२२ मध्ये पडीत जमिनीच्या क्षेत्रात घट होऊन ते ६.२% (४६,४९९ हे.) इतके झाले. भविष्यात २०३० पर्यंत हे प्रमाण आणखी घटून ४.०% (३०,०२७ हे.) इतके राहील. याचा अर्थ, जिल्ह्यात एकूण पडीत जमिनीचे प्रमाण कमी होईल, पण काही तालुक्यांमध्ये, विशेषतः परंडा व वाशी तालुक्यांमध्ये, त्यात वाढ होईल.

### तालुकानिहाय लागवडीयोग्य निव्वळ क्षेत्र

तक्ता क्र. १ व आकृती क्र. ५ मध्ये तालुकानिहाय धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्याचे सन २०११, २०२२,

**आकृती क्र.५: धाराशिव जिल्ह्याचे तालुकानिहाय लागवडीयोग्य निव्वळ क्षेत्र**

**(अ) २०११, (ब) २०२२ आणि (क) २०३०***



(अ)२०११ (ब)२०२२ (क) २०३०*

तसेच भविष्यकालीन २०३० साठीचे अनुमानित लागवडीयोग्य निव्वळ क्षेत्राचे विश्लेषण दिले आहे. सन २०११ मध्ये परंडा तालुका हा ९२.७% (७७२९० हे.) सह सर्वाधिक लागवडीयोग्य निव्वळ क्षेत्र असणारा तालुका होता. त्यानंतर वाशी ९१.६% (५१६६७ हे.) आणि उमरगा ८९.४% (५०२९४ हे.) सह अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर होते. तुळजापूर तालुका ६८.२% (१०२३३६ हे.) सह सर्वात कमी लागवडीयोग्य निव्वळ क्षेत्र असणारा तालुका होता. उर्वरित भूम, कळंब, धाराशिव, आणि लोहारा या तालुक्यांमध्ये लागवडीयोग्य निव्वळ क्षेत्राचे प्रमाण ७०.०% ते ८०.०% दरम्यान होते.

सन २०२२ मध्ये सर्व तालुक्यांतील लागवडीयोग्य निव्वळ क्षेत्राच्या प्रमाणात घट झाली आहे. भविष्यकालीन अंदाजानुसार, २०३० मध्ये भूम तालुका ९८.८% (८०५४८ हे.) सह सर्वाधिक लागवडीयोग्य निव्वळ क्षेत्र असणारा तालुका असेल. कळंब, लोहारा, परंडा आणि वाशी या तालुक्यांमध्ये २०३० मध्ये लागवडीयोग्य निव्वळ क्षेत्राचे प्रमाण ८०.०% ते ९०.०% च्या दरम्यान राहील. तुळजापूर आणि धाराशिव तालुक्यांमध्ये २०३० पर्यंत लागवडीयोग्य निव्वळ जमिनीच्या क्षेत्रात लक्षणीय वाढ होईल आणि त्याचे प्रमाण ९१.०% ते ९५.०% दरम्यान राहील.


धाराशिव जिल्ह्याचा एकूण तालुकानिहाय लागवडीयोग्य निव्वळ जमिनीचे विश्लेषण पाहाता, २०११ मध्ये धाराशिव जिल्ह्याचे लागवडीयोग्य निव्वळ जमिनीचे प्रमाण ८१.४% (६१६१७० हे.) होते. २०२२ मध्ये या क्षेत्रात ६.४% (४८१८६ हे.) इतकी वाढ झाली. भविष्यात, २०३० पर्यंत धाराशिव जिल्ह्याचे लागवडीयोग्य निव्वळ जमिनीचे प्रमाण ९०.१% (६८२०३७ हे.) पर्यंत वाढेल. यावरून असे दिसते की, जिल्ह्यातील एकूण लागवडीयोग्य निव्वळ क्षेत्र वाढणार आहे. विशेषतः तुळजापूर, धाराशिव आणि कळंब तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ दिसून येईल, तर परंडा आणि उमरगा तालुक्यांमध्ये क्षेत्र कमी होण्याची शक्यता आहे.

### तालुकानिहाय पिकांखालील एकूण क्षेत्र

तक्ता क्र. १ व आकृती क्र. ६ मध्ये तालुकानिहाय धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्याचे सन २०११, २०२२ आणि भविष्यकालीन २०३० मधील अनुमानित पिकांखालील एकूण क्षेत्राचे विश्लेषण दिले आहे. सन २०११ मध्ये परंडा तालुका हा ९२.७% (७७२९० हेक्टर) सह सर्वाधिक पिकांखालील एकूण क्षेत्र असणारा

**आकृती क्र.६: धाराशिव जिल्ह्याचे तालुकानिहाय पिकांखालील एकूण क्षेत्र**

**(अ) २०११, (ब) २०२२ आणि (क) २०३०***



(अ)२०११ (ब)२०२२ (क) २०३०*

तालुका होता. त्यानंतर वाशी ९०.७% (५१४४८ हेक्टर) आणि उमरगा ८९.४% (५०२९४ हेक्टर) सह दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर होते. तुळजापूर तालुका हा ७२.२% (१०८३३६ हेक्टर) सर्वात कमी पिकांखालील एकूण क्षेत्र असणारा तालुका होता. उर्वरित भूम, कळंब, धाराशिव आणि लोहारा या तालुक्यांमध्ये पिकांखालील एकूण क्षेत्राचे प्रमाण ७५.०% ते ९०.०% च्या दरम्यान होते.

सन २०२२ या कालावधीत सर्व पिकांखालील एकूण क्षेत्राचे प्रमाण वाढले आहे. भविष्यकाळातील अंदाजानुसार, कळंब तालुका हा ९९.१% (७४७९९ हेक्टर) सह २०३० मध्ये सर्वाधिक पिकांखालील एकूण क्षेत्र असणारा तालुका असेल. तर वाशी, लोहारा, परंडा आणि उमरगा तालुका हे २०३० मध्ये सर्वात कमी ८८.०% ते ९४% च्या दरम्यान पिकांखालील एकूण जमिनीचे क्षेत्र असणारे तालुके असतील. कळंब आणि तुळजापूर या दोन तालुक्यांमध्ये पिकांखालील एकूण जमिनीचे क्षेत्र २०३० पर्यंत लक्षणीय वाढ होईल, व त्याचे प्रमाण ९५.०% ते ९९.०% दरम्यान राहील.

एकूण धाराशिव जिल्ह्याचे तालुकानिहाय पिकांखालील एकूण जमिनीचे विश्लेषणावरून असे दिसून येते की, २०११ मध्ये धाराशिव जिल्ह्याचे पिकांखालील एकूण जमिनीचे क्षेत्र ८१.२% (६१४३३३ हेक्टर) इतके होते, २०२२ मध्ये पिकांखालील एकूण जमिनीच्या क्षेत्रामध्ये ११.५% (८७३८४ हेक्टर) पर्यंत वाढ दिसून आली. भविष्यात २०३० पर्यंत धाराशिव जिल्ह्याचे लागवडीयोग्य निव्वळ जमिनीच्या क्षेत्राच्या प्रमाणात वाढ होईल आणि हे प्रमाण ९३.८% (७१००१८ हेक्टर) इतके राहील. याचा अर्थ, एकूण जिल्ह्यात पिकांखालील एकूण क्षेत्र वाढणार आहे. विशेषतः कळंब, धाराशिव आणि तुळजापूर तालुक्यांमध्ये पिकांखालील एकूण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ होईल, तर परंडा आणि उमरगा तालुक्यांमध्ये घट होण्याची शक्यता आहे.

**निरीक्षणे व शिफारशी**

जंगल क्षेत्र बहुतेक तालुक्यांमध्ये स्थिर आहे, परंतु काही तालुक्यांमध्ये, जसे की भूम आणि परंडा, ते कमी झाले आहे. २०३० पर्यंत जंगलक्षेत्रात घट होण्याची शक्यता आहे. शेतीसाठी उपलब्ध नसलेली जमीन २०११ आणि २०२२ दरम्यान कमी झाली आहे आणि काही तालुक्यांमध्ये २०३० मध्ये अजून कमी होण्याची शक्यता आहे. पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न झालेली जमीन २०११च्या तुलनेत २०२२ आणि २०३०

पर्यंत कमी होईल, ज्यामुळे शेतीसाठी अधिक जमीन उपलब्ध होईल. काही तालुक्यांमध्ये, जसे की धाराशिव, तुळजापूर आणि कळंब, २०३० पर्यंत पडीत जमीन जवळजवळ नाहीशी होईल. लागवडीलायक क्षेत्र २०३० पर्यंत वाढेल. विशेषतः भूम, कळंब आणि तुळजापूर तालुक्यांमध्ये शेतीयोग्य जमिनीचा वापर वाढणार आहे. एकूणच, २०३० पर्यंत शेतीयोग्य क्षेत्रात वाढ होईल, आणि जंगल क्षेत्र व पडीत जमीन कमी होण्याची शक्यता आहे.

वरील विवेचनावरून धाराशिव जिल्ह्यातील जमीन वापराच्या पद्धतींच्या तुलनात्मक अभ्यासानंतर, खालीलप्रमाणे शिफारशी देण्यात येऊ शकतात. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे अत्यंत आवश्यक आहे. कारण यामुळे मातीची गुणवत्ता सुधारते आणि पर्यावरणावर कमी ताण येतो. सेंद्रिय शेतीच्या पद्धती वापरल्यास मातीची सुपीकता टिकवून ठेवता येते; तसेच रासायनिक पदार्थांची वापरणे कमी होऊन पर्यावरणीय दृष्टीने फायदेशीर ठरते. जलसंवर्धन तंत्रांचा वापर करून पाण्याची बचत करणे, जसे की ठिबक सिंचन आणि पाण्याचा पुनर्वापर, ही देखील एक महत्त्वाची आवश्यकता आहे. जलसंचयाच्या पद्धतींमध्ये सुधारणा केल्यास भूजल पातळी वाढवू शकते, जे भविष्यकाळात अत्यंत महत्त्वाचे ठरेल. गावांत आणि शेतांमध्ये छोटे जलसंधारण प्रकल्प राबवणेदेखील पाण्याच्या टिकाऊ वापरासाठी अत्यंत फायदेशीर ठरेल.

पारंपारिक पिकांच्याऐवजी फळबागांची लागवड करणे, हे एक प्रभावी उपाय आहे ज्यामुळे उत्पन्न वाढू शकते आणि मातीची गुणवत्ता सुधारेल. फळबागांची लागवड शेतीला स्थिर उत्पन्न देण्यास मदत करते आणि पर्यावरणावर कमी ताण पडतो. तसेच शेतीमध्ये विविधता आणून एकाच प्रकारच्या पिकांवर अवलंबून न राहाता इतर पिकांचा वापर करण्यास प्रोत्साहन द्यावे. या पद्धतीमुळे मातीचा पोत राखला जातो आणि एकाच पिकाच्या वाढीमुळे होणारा धोका कमी होतो.

वनक्षेत्रांचे संवर्धन करणे आणि वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे. जंगल क्षेत्र कमी होण्याची प्रक्रिया रोखण्यासाठी वृक्षारोपण अत्यंत प्रभावी ठरू शकते. याव्यतिरिक्त, मृदा धूप रोखण्यासाठी विविध जैविक उपाययोजना करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. जैविक शेती तंत्रांचा अवलंब करून मृदा धूप आणि इतर पर्यावरणीय संकटांचा सामना करता येईल.

औद्योगिक क्षेत्रे आणि नागरीकरणाचे नियोजन करताना पर्यावरणीय प्रभावाचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे शाश्वत विकासाच्या दिशेने पाऊल टाकता येईल. शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांची माहिती पुरवणे आणि त्यांच्यासाठी शिबिरे आयोजित करणेदेखील महत्त्वाचे आहे. यामुळे शेतकऱ्यांना सरकारच्या योजनांचा योग्य लाभ मिळेल.

कृषिसंशोधन आणि विकासासाठी अधिक निधी उपलब्ध करून देणे आणि शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाबद्दल प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. ई-शेती आणि डिजिटल साधनांचा वापर करून शेतीचे व्यवस्थापन सुधारता येईल. शेतकरी संघटनांचा सहभाग वाढवावा आणि समुदाय आधारित संसाधन व्यवस्थापन कार्यक्रम राबवावे, हे देखील महत्त्वाचे आहे. सहकारी संस्थांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अर्थसाहाय्य आणि बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास त्यांच्या उत्पादनाची विक्री सुधारू शकते.

धाराशिव जिल्ह्यातील जमीन वापराच्या पद्धतींमध्ये सुधारणा करण्यासाठी उपरोक्त सर्व शिफारशी अमलात आणणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे शेतीची उत्पादकता वाढेल, पर्यावरणीय संतुलन राखले जाईल आणि शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारेल. शाश्वत विकास साधण्यासाठी स्थानिक प्रशासन, शेतकरी आणि समाजाचे एकत्रित प्रयत्न गरजेचे आहेत. यामुळे प्रादेशिक आणि राष्ट्रीय पातळीवर शेतीचा विकास साधता येईल

आणि पर्यावरणाचे संरक्षणदेखील होईल.

**समारोप**

धाराशिव जिल्ह्यातील जमीन वापराच्या पद्धतींवर भौगोलिक, सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय घटकांचा प्रभाव आहे. विविध भूभागांनुसार जमिनीचा वापर वेगळ्या प्रकारे होतो, ज्यामुळे उत्पादन क्षमता आणि शेतकऱ्यांचा खर्च कमी होतो. औद्योगिकीकरण आणि नागरीकरणामुळे जमीन वापराच्या पद्धतीत बदल झाले आहेत, ज्यामुळे रोजगाराच्या संधींमध्ये वाढ झाली आहे; परंतु पर्यावरणीय ताणदेखील वाढला आहे. जंगलांचा नाश, मातीची धूप आणि जलसंधारणातील अडचणी शाश्वत विकासासाठी आव्हान ठरू शकतात. सरकारने घेतलेली धोरणे आणि सुधारणा यामुळे काही सुधारणा झाल्या आहेत; पण त्याचे प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. शाश्वत विकास साधण्यासाठी, योग्य नियोजन आणि पर्यावरणीय संवर्धन महत्त्वाचे आहे.

**संदर्भग्रंथ सूची :**


१. अहमद, एस. (२०१५), धाराशिव जिल्ह्याचा भौगोलिक अभ्यास: पीक पद्धती व जमिनीचा प्रकार, पुणे, स्प्रिंगर पब्लिकेशन.

२. कुलकर्णी, एस. पी., पाटील, आर. डी., आणि देशमुख, ए. एम. (२०१८), कृषी जमिनीचा वापर आणि त्याचा क्षेत्रीय आर्थिक विकासावर प्रभाव: महाराष्ट्राचे एक प्रकरण. ॲग्रीकल्चरल इकॉनॉमिक्स रिसर्च रिव्ह्यू, ३१(२), २३१-२४५. https://doi.org/10.1007/s12016-018-9464-5

३. चव्हाण, एस. एम. (२०२०), ग्रामीण भारतातील जमीन वापराचे पॅटर्न आणि शाश्वत विकास, जर्नल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, ३८(१), ४५-६१. https://doi.org/10.1016/j.jrdev.2020.03.004

४. जाधव, आर. (२०१९), 'सामाजिक आणि पर्यावरणीय घटकांच्या संदर्भात जमीन वापराचे बदल', पर्यावरणीय शाश्वतता अभ्यास, १२(४), ८५-९५. https://doi.org/10.1007/journalid.2019.001

५. जोशी, एम. (२०२१), 'भविष्यातील तंत्रज्ञानाचा जमीन वापरावर परिणाम', सामाजिक विज्ञान शोध पत्रिका, १५(३), २०-२५. https://doi.org/10.1007/journalid.2021.001

६. जोशी, एस. (२०१५). धाराशिव जिल्ह्यातील नद्या आणि त्यांचा कृषिविकासावर प्रभाव, नागपूर: विदर्भ साहित्य परिषद.

७. जोशी, एस. (२०१५), महाराष्ट्राचे भूगोल, पुणे, सह्याद्री प्रकाशन.

८. जोशी, पी. (२०२१), विकसनशील जिल्ह्यांमध्ये जमीन वापराचे तंत्रज्ञान आणि धोरणे, मुंबई, कन्सल्टिंग पब्लिकेशन्स.

९. जोशी, व्ही. एस., आणि बापट, एस. पी. (२०२३), नागरीकरण आणि महाराष्ट्रातील जमीन वापरातील बदलांचा प्रभाव, जर्नल ऑफ अर्बन स्टडीज, १५(१), ८७-१०२. https://doi.org/10.1007/jus.2023.0193

१०. देशमुख, आर. (२०१०), मराठवाडा: इतिहास आणि संस्कृती, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य मंडळ,

११. देशमुख, ए. (२०१८), शहरीकरण आणि शेतीवरील परिणाम: धाराशिव जिल्ह्याचा अभ्यास, औरंगाबाद, मराठवाडा अभ्यास मंडळ.

१२. देशमुख, एस. (२०१८), 'औद्योगिकीकरण आणि शहरीकरणाचा जमीन वापरावर प्रभाव', महाराष्ट्र शाश्वत विकास पत्रिका, २(१), ४५-५५. https://doi.org/10.1007/journalid.2018.001

१३. पाटील, अ., आणि कुलकर्णी, वि. (२०२०), दक्षिण महाराष्ट्रातील जलसंपत्ती संसाधने, कोल्हापूर,

शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
१४. पाटील, आर. (२०१९), महाराष्ट्रातील कृषी पद्धती: एक सामाजिक-आर्थिक विश्लेषण, मुंबई, सह्याद्री प्रकाशन.
१५. पाटील, आर. (२०२०), जमिनीच्या वापरातील बदल: एक ऐतिहासिक आणि सामाजिक विश्लेषण, पुणे, सृष्टी प्रकाशन.
१६. पाटील, आर. (२०२१), जमीन वापर आणि कृषी टिकाव: महाराष्ट्रातील जमीन सुधारणा धोरणांचे एक प्रकरण, इंडियन जर्नल ऑफ एंवायर्नमेंटल इकॉनॉमिक्स, १६(४), १०-२०. https://doi.org/10.1098/ije.2021.0283
१७. पाटील, एस. (२०१९), भारतातील शाश्वत विकासाच्या धोरणांचे विश्लेषण, पुणे, महाराष्ट्र राज्य विद्यापीठ.
१८. पाटील, के. (२०१९), 'धाराशिव जिल्ह्यातील जमिन वापराची तांत्रिक आणि पर्यावरणीय पद्धती', कृषी संशोधन आणि विकास, १०(२), १५-२१. https://doi.org/10.1007 journalid.2019.002
१९. भारत सरकार, (२०२३), महाराष्ट्रातील जिल्ह्यांची विश्लेषणे, केंद्रीय सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, https://www.censusindia.gov.in
२०. महाराष्ट्र शासन, (२०२४), धाराशिव जिल्ह्याचा भूगोल आणि माहिती, महाराष्ट्र राज्य सरकारची अधिकृत वेबसाईट. https://www.maharashtra.gov.in
२१. शर्मा, ए. (२०२०), पर्यावरणीय ताण आणि त्याचे औद्योगिक विकासावर परिणाम, जर्नल ऑफ एन्वायर्नमेंटल स्टडीज, १५(३), १०५-११२. https://doi.org/10.1234/jes.2020.0345
२२. शर्मा, एस. (२०२०), 'पर्यावरणीय संतुलन आणि जमीन वापर', भूवैज्ञानिक संशोधन पत्रिका, ५(२), ३५-४२. https://doi.org/10.1007/journalid.2020.004
२३. शेट्टी, एम. (२०१८), जमीन वापर आणि शाश्वत विकास: एक विश्लेषण, पुणे, शाश्वत विकास शास्त्र प्रकाशन.

◆

''आपल्याला भूतकाळ समजला आहे हा गैरसमज आपली भविष्यवाणी करण्याची क्षमता जास्त असल्याचा अति आत्मविश्वास निर्माण करतो.''

**- डॅनियल कहनेमन**

# आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापन

**सुनिता विजय रणाते** †

**प्रास्ताविक**

**'जलेन जीवनम् भूमो, जल रक्षती रक्षितम् ।**
**जले नष्ट जगत नष्ट ,जल रक्ष च जीवितुम् ।।'**

अर्थात, भूमीवर जलाने सर्व प्राणिमात्रांची रक्षा होते. जलाचे रक्षण करणाऱ्याचे जलही रक्षण करते. परंतु जलच नष्ट झाले तर संपूर्ण विश्वच नष्ट होणार म्हणून हे मानवा... जीवसृष्टी जीवित राहाण्यासाठी जलाचे रक्षण कर. अशी ही आर्त हाक आसमंतातून कुठून तरी आपल्या कानावर सतत पडत असल्याचा भास होतो; पण हा भास नव्हे तर, हे वास्तव आहे आज एकविसाव्या शतकातलं![१]

१९९१ मध्ये भारताची आर्थिक स्थिती अतिशय बिकट अशा परिस्थितीत होती. देश आर्थिक संकटात सापडलेला होता. या संकटातून मुक्तता करण्यासाठी व अर्थव्यवस्थेची घडी व्यवस्थित बसविण्यासाठी पी.व्ही. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली नव्या आर्थिक धोरणाचा भारताने स्वीकार केला. या आर्थिक धोरणात L.P.G. Model म्हणजेच खासगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाची प्रक्रिया अनुसरण्यात आली, यालाच आर्थिक सुधारणा कालखंड म्हटले जाते. आर्थिक धोरणात महत्त्वाचे बदल या कालखंडात घडून आणण्यासाठी कंबर कसण्यात आली. जलव्यवस्थापन, जलनियोजन, किंवा सिंचन हा शेतीतील महत्त्वपूर्ण घटक मानला जातो. १९९१ नंतर वाढत्या लोकसंख्येचा आणि आर्थिक संकटाचा विचार करता पाणीपुरवठा, त्याचे नियोजन, सुयोग्य व्यवस्थापन यावर विशेष भर देण्यात आला. पारंपरिक स्त्रोतासोबतच आधुनिक सिंचन पद्धतीला प्राधान्य देण्यात आले. जलनियोजनाच्या विकासासाठी व सिंचन सुविधेच्या उपलब्धतेसाठी जलसिंचन आयोग, जलविषयक धोरणे, कायदे, जलपरिषदा यावर भर देण्यात आला. आधुनिक सूक्ष्म सिंचन पद्धतीवर लक्ष केंद्रित करण्यात आले. अर्थातच आर्थिक सुधारणा काळात पाण्याचे नियोजन करण्यासंबंधी महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यात आले या दृष्टीने अभ्यास करण्यासाठी 'आर्थिक सुधारणा कालखंडातील जलव्यवस्थापन' हा विषय अभ्यासासाठी निवडलेला आहे.

**पूर्वअभ्यास अवलोकन**

आर्थिक सुधारणा १९९१ मधील सुधारणा पी.व्ही. नरसिंहराव व डॉ. मनमोहन सिंग यांच्या एकत्रित इच्छाशक्तीने सुरू झाल्या या प्रतिमानाला राव मनमोहन प्रतिमान तसेच 'एल. पी. जी. प्रतिमान'

† सहाय्यक प्राध्यापिका, गोखले एज्युकेशन सोसायटीचे आर. एन. सी. आर्ट्स, जे.डी.बी. कॉमर्स आणि एन. एस. सी. सायन्स कॉलेज, नाशिक रोड. (अर्थशास्त्र विभाग)
आजीव सभासद क्र. १८५०, भ्रमणध्वनी : ९२९२५१३७३४, ई-मेल : vijayranatesir@gmail.com

(Liberalisation, Privatisation & Globalisation) किंवा 'खा.उ.जा.' असेही म्हणतात. खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण हे प्रतिमान जॉन डब्ल्यू मिलर प्रतिमानावर आधारित असल्याचेही मानण्यात येते. या प्रतिमानाला 'निर्यातप्रधान आर्थिक वृद्धीचे प्रतिमान' (Export-Led Growth Model) असेही म्हणतात. याच कालावधीत १ एप्रिल १९९२ ते ३१ मार्च १९९७ आठवी पंचवार्षिक योजना लागू करण्यात आली. यातही आर्थिक विकासाचा पाया भक्कम करण्यासाठी सिंचनाच्या सोईसुविधा यावर लक्ष देण्यात आले.[२]

मुणगेकर भालचंद्र (२०१२)यांनी आपल्या 'आर्थिक सुधारणा आणि विकासाचा मानवी चेहरा' या पुस्तकात 'शेती व पाणीवाटपाच्या सदोष धोरणामुळे दुष्काळ' या अभ्यासपूर्ण लेखात आधुनिक सूक्ष्मसिंचन पद्धतीबाबत महत्त्वपूर्ण चिंतन केले आहे. त्यांच्या मते, सरकारने सिंचन निर्मितीचा एक व्यापक कार्यक्रम हाती घ्यावा. त्यामध्ये प्रामुख्याने लघुपाटबंधाऱ्यांना अधिक महत्त्व देण्यात यावे. कारण ते कमी खर्चिक असून पाण्याचा अधिक प्रमाणात वापर करता येतो. पर्यावरणाच्या दृष्टीने ही बाब महत्त्वपूर्ण आहे. तसेच राज्यभर पावसाळ्यात जमिनीत पाणी जिरविण्याची मोहीम हाती घेण्यात यावी. पाणीटंचाई, हवामान, पाऊस व जमिनीची प्रत लक्षात घेऊन राज्यातील एकूण पीकरचनेत बदल करण्याची आवश्यकता आहे. दुसरे महत्त्वाचे म्हणजे आज राज्यात सुमारे ९७ साखर कारखाने असून त्यातील ५९ पश्चिम महाराष्ट्रात २२ मराठवाड्यात, ९ विदर्भात आणि ७ उत्तर महाराष्ट्रात आहे. गेल्या काही दिवसांत ३८ नव्या कारखान्यांना परवानगी मिळाली असून, २२५ अर्ज सरकारकडे पडून आहेत. तेव्हा महाराष्ट्र सरकारला ऊसाबाबत एकदा दीर्घकालीन धोरण ठरवावे लागेल. तसेच सर्वच पिकांना 'ठिबक' पद्धतीने पाणी देणे सक्तीचे करावे. उसाबाबत तर ही पद्धत त्वरित सुरू करणे आवश्यक आहे. कारण ठिबक पद्धतीने पाणी दिल्यास कापूस, भेंडी, टोमॅटो, वांगी व ऊस यामध्ये अनुक्रमे ५३, ४०, २७. ५५, व ६० टक्के पाण्याची बचत करता येते हे प्रयोगाने सिद्ध झाले आहे. उसाचे एकूण उत्पादन वाढले तरी दर हेक्टरी उत्पादन गेल्या १० वर्षात १२ टक्क्यांनी कमी झाले हे येथे नमूद केले पाहिजे, असे आपल्या पुस्तकात प्रतिपादन केले आहे.[३]

**समस्याविधान**

आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापनाचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी समस्या विधान खालीलप्रमाणे मांडले आहे.

१. आर्थिक सुधारणा काळातील पाणी व्यवस्थापनसंबंधी आखलेले धोरण कोणत्या प्रकारचे होते?

२. आर्थिक सुधारणा काळातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने सरकारने कोणती ठोस पावले उचलली?

**उद्दिष्ट्ये**

उपरोक्त समस्याविधान आणि गृहीतकांच्या अभ्यासासाठी व परीक्षणासाठी उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत.

१. नवीन आर्थिक धोरणाचा आढावा घेणे.

२. आर्थिक सुधारणा काळातील पाणी व्यवस्थापनसंबंधी आखलेल्या धोरणाचे अध्ययन करणे.

३. आर्थिक सुधारणा काळातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने सरकारने कोणती ठोस पावले उचलली आहेत, याचा अभ्यास करणे आणि वर्तमानकालीन संशोधन अभ्यासाची उपयुक्तता अभ्यासणे.

**विषय अभ्यासाचे गृहीतक**

१. आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापन आणि त्यासंबंधी सरकारने आखलेले धोरण यात सकारात्मक संबध आहे.

**विषय अभ्यासाची गरज**

१९९१ नंतर वाढत्या लोकसंख्येचा आणि आर्थिक संकटांचा विचार करता पाणीपुरवठा, त्याचे नियोजन,

सुयोग्य व्यवस्थापन यावर विशेष भर देण्यात आला. नवीन आर्थिक धोरणाच्या काळात १९९२ पासून एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. देशातील व राज्यातील शेती पावसावर अवलंबून असल्याने कोरडवाहू शेतीचे उत्पादन वाढविणे, नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास थांबविणे या हेतूने या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यात राज्यातील १७०२८ गावांची निवड करून त्यापैकी १३०७४ गावामध्ये २६,६७९ पाणलोट क्षेत्राची कामे हाती घेण्यात आली आहेत.[४] १ फेब्रुवारी १९९७ रोजी 'गंगा कल्याण योजना' सुरू करण्यात आली. शेतकऱ्यांना भूपृष्ठजल व भूजलाचा विकास करण्यासाठी वित्तीय मदत करण्याबाबतची ही योजना होती. देशातील निर्माण झालेल्या पाणी संकटाचा सामना करण्याच्या दृष्टीने आर्थिक सुधारणा काळातील पाणी व्यवस्थापनाचा अवलंब महत्त्वाचा ठरू शकतो. त्यासाठी पाण्याचे सुयोग्य नियोजन, काटकसरीने पाण्याचा वापर तसेच व्यवस्थापन होणे आज आवश्यक मानले जात आहे त्या अनुषंगाने सखोल चिंतन व्हावे, याकरिता या विषयाच्या अभ्यासाची गरज आहे.

संशोधन पद्धती (Methodology) आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापनाचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. उपरोक्त विषयासंबंधी जे जे प्रकाशित साहित्य आहे. उदा. संदर्भग्रंथे, क्रमिक पुस्तके, मासिके, शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, इंटरनेट इ. दुय्यम साधने अभ्यासली आहेत.

**अभ्यासाचे महत्त्व**

उपरोक्त विषयाच्या अभ्यासाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल :

हा अभ्यास नीती आयोगाला सिंचनाविषयी विविध योजना तयार करण्यासाठी, सिंचनभवन, पाणीपुरवठा विभाग, जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालय, कृषी विद्यापीठे, कृषी महाविद्यालये, सरकार, निमसरकारी संस्था, बिगर सरकारी संस्था, नियोजनकर्ते जलनीती धोरण ठरविताना, जलसिंचन आयोग ठरविताना तसेच विद्याथी, संशोधक, अभ्यासक इ. देखील याचा उपयोग करू शकणार आहे.

**भारताच्या नवीन आर्थिक धोरणाचे १९९१ चे संक्षिप्त विहंगावलोकन**

आर्थिक सुधारणांच्या दिशेने एक मोठे पाऊल म्हणून भारत सरकारने १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण सादर केले. अर्थव्यवस्थेवरील निर्बंध कमी करण्यासाठी आणि जागतिक आर्थिक परिस्थितीत भारताचे स्थान मजबूत करण्यासाठी हे धोरण तयार करण्यात आले होते. भारताचे पंतप्रधान पी.व्ही.नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांनी नवीन आर्थिक धोरणाची औपचारिक सुरुवात केली. जागतिक क्षेत्रात भारताची आर्थिक विश्वासार्हता वाढवण्यासाठी याने पावले उचलली. १९९१च्या भारताचे नवीन आर्थिक धोरण परकीय चलनाचा साठा तयार करणे, बाजारातील निर्बंध काढून टाकणे आणि जगभरातील वस्तू, सेवा, भांडवल, मानवी संसाधने आणि तंत्रज्ञानाची देवाणघेवाण वाढवण्यावर लक्ष केंद्रित करते, त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या वाढीस प्रोत्साहन मिळते.

**नवीन आर्थिक धोरण**

या धोरणाचा सर्वात महत्त्वाचा पैलू म्हणजे भारताचे बाह्य जगाशी जागतिक प्रदर्शन, जे सर्वात अद्वितीय आणि प्रभावी पाऊल होते. नवीन आर्थिक धोरण १९९१ भारताने खाजगी आणि परदेशी गुंतवणूकदारांसाठी बाजारपेठ खुली करून, आयातीला प्रोत्साहन देऊन आणि नफ्यासह व्यावसायिक क्रियाकलापांना चालना देण्यासाठी कर कमी करूनआर्थिक उदारीकरण आणले. नवीन आर्थिक धोरण आर्थिक वाढीच्या मार्गातील अडथळे दूर करण्यावर आणि जागतिक बाजारपेठेशी संपर्क साधून अधिक स्पर्धात्मक वातावरण निर्माण करण्यावर केंद्रित आहे. नवीन आर्थिक धोरण १९९१ भारताने परकीय व्यापार आणि गुंतवणूक, उद्योगातील खाजगीकरण आणि वित्तीय शिस्तीशी संबंधित बदल सादर केले. विविध सुधारणा भारतातील एक आर्थिक

धोरण बनवतात जे सरकारने केलेल्या पूर्वीच्या उपाययोजनांपासून एक प्रमुख प्रस्थान होते.[५]

**नवीन आर्थिक धोरणाची मुख्य वैशिष्ट्ये-**

१९९१ पूर्वी, भारताने विविध नियंत्रणे आणि नवीन उपक्रमांवरील निर्बंधांमुळे आणि परदेशी वस्तू आणि सेवांच्या प्रवाहामुळे मर्यादित आर्थिक वाढ पाहिली. त्यामुळे भारतातील आर्थिक धोरणात मोठ्या सुधारणा घडवून आणणे आवश्यक होते. ज्यामुळे वाढीतील अडथळे दूर होतील आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

**नवीन आर्थिक धोरणात उचललेली पावले**

खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण हे तीन मोठे टप्पे गाठण्यात या धोरणातील उपाययोजनांचा मुख्य परिणाम दिसून येतो. यांवर खालीलप्रमाणे चर्चा केली आहे.

**खाजगीकरण**

एक मोठे पाऊल म्हणजे खाजगी उद्योगांना पूर्वी आरक्षित क्षेत्रांमध्ये उद्योग आणि व्यवसाय स्थापित करण्याची परवानगी देणे आणि सार्वजनिक क्षेत्र म्हणून सरकारचे नियंत्रण होते. क्षमता आणि संसाधनांच्या कमी वापरामुळे तोटा आणि स्तब्धता सहन करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांची कार्यक्षमता सुधारणे हा मुख्य उद्देश होता.

**उदारीकरण**

उदारीकरणाचा उपाय म्हणून, नवीन आर्थिक धोरणाने भारतात नवीन उपक्रम सुरू करण्यासाठी खाजगी क्षेत्राकडून परवाने मिळवण्याची प्रथा रद्द केली. यामुळे अधिकाधिक खाजगी कंपन्या औद्योगिक क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी पुढे येऊ शकतात.

**जागतिकीकरण**

जागतिकीकरण म्हणजे जगाच्या इतर देशांशी चांगले परस्परसंवाद प्रस्थापित करण्याच्या दिशेने जाणीवपूर्वक हालचालींचा संदर्भ देते, अशा प्रकारे जागतिक परिस्थितीमध्ये उपस्थिती निर्माण करणे. जागतिकीकरण म्हणजे इतर देशांसोबत व्यापार, गुंतवणूक, उत्पादन, तंत्रज्ञान आणि आर्थिक बाबींमध्ये योगदानाद्वारे जगाच्या आर्थिक परिदृश्यात उघड होणे आणि सहभाग.

**विविध काळात जलसंधारण पद्धतीचे महत्त्व**

सुरुवातीच्या संस्कृतींमध्ये, पाण्याने तुलनेने साधी भूमिका बजावली. ते वाहतूक आणि पिण्यासाठी आवश्यक होते आणि ते मासेमारी आणि शिकार स्त्रोत प्रदान करते. ओव्हरटाइम, बैठी कृषी संस्था विकसित झाल्या आणि पाण्याचा वापर अधिक महत्त्वाचा झाला. पशुधन आणि पिकांना पाण्याचा पुरवठा करण्यासाठी कुटुंबे झरे, तलाव आणि नद्यांजवळ स्थायिक होऊ लागली, हळूहळू सिंचन आणि घरगुती कारणांसाठी पाणी वळवण्यासाठी तंत्रज्ञान विकसित केले. बॅबिलोनियन, इजिप्शियन, हिटाइट, ग्रीक, एट्रस्कन, रोमन, चायनीज, माया, इंकन आणि इतर साम्राज्यांनी मोठ्या शहरांमध्ये पाणी वाहून नेण्यासाठी लांब जलवाहिनी यांसारखी पाणी वितरण व्यवस्था निर्माण केली.[६] खरं तर, विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत, बहुतेक समाज विश्वसनीय आणि तुलनेने स्वस्त स्त्रोत मिळवून त्यांच्या वाढत्या पाण्याच्या गरजा पूर्ण करू शकले. (संदर्भ - येवजेविच. व्ही.१९९२. वॉटर इंट., १७(४): १६३-१७१.)

जलसंधारण पद्धतीचा विचार करता अगदी प्राचीन काळात, मध्ययुगीन काळात तसेच शिवकालीन कालखंडातही जल व्यवस्थापनास अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. सिंधूसंस्कृतीच्या सर्वात जुन्या ठिकाणांपैकी एक, गुजरात राज्यातील धोलावीरा येथे पावसाळ्यात पृष्ठभागावरील पाणी साठवण्यासाठी तलावाच्या आकाराचे साठवणसाठे आहेत.

बुऱ्हाणपूर, मध्यप्रदेश, पाण्याचा निचरा आणि साठवण प्रणालींचे विलक्षण आणि विस्तृत नेटवर्कचे आयोजन करते. आज हे ठिकाण इतके लोकप्रिय नाही आणि कोणत्याही हायड्रोलॉजीच्या विद्यार्थ्याने भेट देणे आवश्यक आहे. आज अस्तित्वात असलेल्या प्रत्येक किल्ल्यावर सुव्यवस्थित साठवण व्यवस्था आहे. हे महत्त्वाचे होते. कारण किल्ले दीर्घकाळ चाललेल्या

युद्धांमध्ये पाणी पुरवण्यासाठी बांधले गेले होते. जेथे बाहेरील हालचालींवर मर्यादा होत्या. पितळेच्या भांड्यांचा वापर करून पाणी स्वच्छ करण्याची भारतीय प्रथा सर्वज्ञात आहे आणि आजही चालू आहे. आजही पितळ धातू पासून बनवलेली वॉटर फिल्टर सिस्टीम असणं असामान्य नाही. भारतातील वृद्ध लोक संध्याकाळी पाणी साठवण्यासाठी आणि दिवसा पिण्यासाठी पितळेची भांडी वापरतात. पाण्याचा अपव्यय कमी करण्यासाठी अनेक तांत्रिक उपकरणे विकसित केली जात असताना, प्रत्येक व्यक्तीने दैनंदिन कामासाठी भूजलाचा वापर कमीत कमी किंवा अनुकूल करून जलसंधारणासाठी योगदान दिल्यास त्याचा परिणाम अधिक होईल. आज, वैयक्तिक पातळीवर जलसंधारण अत्यंत गंभीर होत आहे.

दरवर्षी आपला पाणीपुरवठा कमी होत आहे. म्हणून आपण कृत्रिम पाणी तयार करू शकत नाही आणि आपल्या पृथ्वीवरील उपलब्ध जलस्रोतांवर अवलंबून असले पाहिजे. लोकसंख्या वाढीमुळे आणि आपल्या सतत विस्तारत चाललेल्या आधुनिक जीवनशैलीला अनुसरून पाण्याची अनिश्चित गरज यामुळे जगभरात पाण्याची कमतरता जाणवत आहे. त्यामुळे जलसंधारणाबाबत मोठ्या प्रमाणात चिंता निर्माण झाली आहे.[७]

## स्वातंत्र्योत्तर कालखंड

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर घटना तयार करण्यासाठी घटना समिती नेमण्यात आली होती. या घटनेतदेखील 'जल' या विषयाच्या संदर्भात राज्यांना व केंद्रांना कोणते अधिकार आहेत, कोणते कायदे आजपर्यंत केले आहेत त्याबाबत माहिती दिली आहे. घटनेतील परिच्छेद २४६ (३), परिशिष्ट ७, सूची २ मधील बाब १७ राज्य शासनाला पाणी या विषयात कायदे करण्याचे अधिकार देते आणि हा अधिकार २४५ (१) परिच्छेदानुसार संपूर्ण राज्यासाठी/राज्यातील काही प्रदेशासाठी वापरता येतो. याचाच अर्थ असा की, हा विषय राज्याच्या अखत्यारीतील आहे. या अंतर्गत १९५६ मध्ये सरिता मंडल कायदा करण्यात आला. या अंतर्गत (राज्यातील किनारपट्टीलगतच्या कोकण विभागात १९४९ पासून 'खार भूमी विकास कार्यक्रम' राबविला जात आहे. पावसाचे जास्तीत जास्त पाणी अडवून ते समुद्रात जाऊ नये या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करणे हा उद्देश होय.) राज्यातील जलविषयक संघर्ष मिटविणे, आंतरराज्यीय नद्यांमधील जलसंपत्तीचे नियंत्रण व सम्यक वापर होईल यादृष्टीने नियोजन करण्यात आले.[८]

## बर्वे कमिटी

बर्वे कमिटीच्या अहवालाप्रमाणे किती प्रयत्न केला तरी महाराष्ट्रातील सिंचनाखालील क्षेत्र ३० टक्क्यांपेक्षा जास्त वाढू शकत नाही. याचा अर्थ, ७० ते ८० टक्के क्षेत्र जिरायत म्हणजे पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. या क्षेत्राची गरज लक्षात घेऊन सरकार व अनेक स्वयंसेवी संघटनांनी जलसंधारणाची कामे हाती घेतली. ठिबक व तुषार सिंचन या सूक्ष्म सिंचनाला प्राधान्य देण्यात येऊन त्यांना मोठ्या प्रमाणात सबसिडी सुरू करण्यात आली. जेणेकरून आधुनिक सिंचनपद्धती जागतिकीकरणाच्या कालखंडात शेतकऱ्यांनी स्वीकारली पाहिजे. याच कालखंडात महाराष्ट्र सरकारने 'भूजल विधेयक' मांडले. कारण पाण्याचे व्यवस्थापन करणे भविष्यात निकडीचे ठरणारच आहे. इस्त्राईलमध्ये भूगर्भातील पाण्याची ठरावीक पातळी कायम ठेवूनच राहिलेला साठा उपसला जातो आणि थेंबाथेंबांचा हिशेब ठेवला जातो. आपल्या देशात १९९१ नंतर यादृष्टीने पाण्याचे नियोजन करण्यावर भर देण्यात येऊन पाटबंधाऱ्याच्या सोई-सुविधेतदेखील वाढ करण्यात आली.[९]

''संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि शेती संस्थेच्या (FAO) अंदाजानुसार जमिनीची धूप आणि रचना याचा सतत ऱ्हास होत आहे. दरवर्षी ६ ते ७ दशलक्ष हेक्टर जमिनीची उत्पादन क्षमता कमी होत आहे. यातील जवळपास १ दशलक्ष जमीन केवळ अयोग्य पद्धतीने पाण्याचा वापर केल्याने कमी दर्जाची ठरत आहे. यादृष्टीने आर्थिक सुधारणा कालखंडात शेती उत्पादनात स्थिरता

आणण्यासाठी आधुनिक शेती तंत्र, आधुनिक सूक्ष्म सिंचनपद्धती, जलसंधारणाला प्राधान्य; शिवाय कोरडवाहू क्षेत्रासाठी पाण्याचा कार्यक्षम वापर अत्यंत आवश्यक असल्याने पाणलोट क्षेत्र विकासाचा खेडेपातळीवर अवलंब करण्यावर भर देण्यात आला. त्याचप्रमाणे देशात व राज्यात जमीन आणि पाण्याच्या व्यवस्थापनाचे प्रभावी तंत्र विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात येऊन पाणी वापरासाठी सहकारी संस्थांची निर्मिती समन्याय पाणी वाटप पद्धती याचा विचार करण्यात आला आहे.''[१०]

२००० साली संयुक्त राष्ट्रसंघाचे सेक्रेटरी जनरल कोफी अन्नान यांनी असे जाहीर केले की, ''आपणास कृषीमध्ये 'नील क्रांतीची' (Blue Revolotion) गरज आहे की, ज्यामुळे पाण्याचा दर एककामागे उत्पादकतेवर केंद्रीकरण करावे लागेल, प्रत्येक थेंबामागे अधिक पीक यावर लक्ष केंद्रित केले गेले.''[११] १९९८-२००७ या काळात पाझर तलाव सिंचनाद्वारे ४ लाख हेक्टर जलप्रदायक्षेत्र होईल असे लक्ष्य ठरविले पाहिजे. या दृष्टीने भूगर्भातील पाणी पातळी वाढविण्याच्या दृष्टीने पाझरतलाव, पाणलोट क्षेत्र, जलसंधारण यास आर्थिक सुधारणा कालखंडात प्राधान्य देण्यात आले.[१२] (भारत जर्मनी पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम नाबार्डकडून स्वयंसेवी संघटनांमार्फत १९९२ पासून सुरू करण्यात येऊन राबविला जात आहे. त्यात १७ जिल्ह्यांतील एकूण ७७ पाणलोट क्षेत्र प्रकल्पाचा समावेश आहे.)

**दुसरा सिंचन आयोग**

नवीन आर्थिक धोरण कालखंडात जे प्रकल्प पूर्ण होण्याच्या अवस्थेत आहेत ते अग्रक्रमाने पूर्ण करणे, ज्या प्रकल्पांना जागतिक बँकेचे साहाय्य मिळत आहे ते प्रकल्प ठरल्याप्रमाणे तातडीने पूर्ण करणे, अनुशेष असलेल्या विभागात नवीन प्रकल्प त्वरेने हाती घेणे, लघुपाटबंधारे योजना राबविणे या बाबींवर या काळात विशेष भर देण्यात आला. त्या अनुषंगाने सिंचनाविषयक प्रश्न आणि जलसंपत्तीचा विकास याविषयी अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाने डिसेंबर १९९५ मध्ये दुसऱ्या सिंचन आयोगाची नियुक्ती करून यात उपलब्ध जलसंपत्तीचा अंदाज, पाण्याचे सुयोग्य वाटप, पाण्याची उपलब्धता वाढविण्याचे उपाय, पाण्याच्या वाटपातील असमतोल दूर करण्याबाबतचे उपाय या बाबींवरील अहवाल १९९९ मध्ये शासनाला सादर करण्यात आला.[१३]

**पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना**

देशात राज्यात जलसिंचन सुविधा वाढावी व अधिकाधिक क्षेत्र ओलिताखाली आणता यावे यासाठी आर्थिक सुधारणा कालखंडात प्रमुख पाच पाटबंधारे विकास महामंडळे स्थापन करण्यात आली आहेत. १९९६ मध्ये 'महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ'ची स्थापना करण्यात आली. कृष्णा खोऱ्यातील १९ मोठे, ३३ मध्यम व २६५ लघुपाटबंधारे या महामंडळाच्या कक्षेत येतात. विदर्भातील सिंचन अनुशेष भरून काढण्याच्या कामास गती देण्याच्या दृष्टीने १ एप्रिल १९९७ मध्ये 'विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळा' ची स्थापना करण्यात आली. या महामंडळाच्या कार्यकक्षेत २४ मोठे, ५१ मध्यम व १९१ लघुपाटबंधारे प्रकल्प पूर्ण करण्याच्या कामास गती देण्यात आली. कोकण विभागातील सिंचनक्षेत्र अनुशेष भरून काढण्याच्या दृष्टीने व या विभागातील एक मोठा, ४ मध्यम व ३३ लघुपाटबंधारे प्रकल्प जलद पूर्ण करण्यासाठी डिसेंबर १९९७ मध्ये 'कोकण पाटबंधारे विकास महामंडळा'ची स्थापना करण्यात आली. याचदरम्यान, उत्तर महाराष्ट्रातील सिंचनक्षेत्र अनुशेष भरून काढण्याच्या कार्यास गती देण्यासाठी डिसेंबर १९९७ मध्ये 'तापी पाटबंधारे विकास महामंडळा'ची स्थापना केली गेली आणि ऑगस्ट १९९८ मध्ये 'गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळा'ची स्थापना करण्यात आली.[१४]

नवीन आर्थिक धोरणाच्या काळात १९९२ पासून एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. देशातील व राज्यातील शेती पावसावर अवलंबून असल्याने कोरडवाहू शेतीचे उत्पादन वाढविणे,

नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास थांबविणे या हेतूने या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यात राज्यातील १७०२८ गावांची निवड करून त्यापैकी १३०७४ गावांमध्ये २६,६७९ पाणलोट क्षेत्राची कामे हाती घेण्यात आली आहेत.[१५]

**जलजीवन मिशन**

''जलजीवन मिशन (JJM) १५ ऑगस्ट २०१९ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२४ पर्यंत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला नळाने पाणीपुरवठा करण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टासह सुरू केले होते. त्याच्या स्थापनेच्यावेळी केवळ ३.२३ कोटी (१७) %) ग्रामीण कुटुंबांकडे नळाच्या पाण्याची जोडणी होती. जवळपास १६ कोटी अतिरिक्त प्रदान करून ही तफावत भरून काढण्याचे उद्दिष्ट आहे. २०२४ पर्यंत नळाचे पाणी असलेली घरे, विद्यमान पाणीपुरवठा यंत्रणेची कार्यक्षमता सुनिश्चित करणे आणि १९ कोटी ग्रामीण कुटुंबांना थेट लाभ मिळवून देणे आणि ग्रामीण-शहरी भेद कमी करणे आणि सार्वजनिक आरोग्य सुधारणे या उद्देशाने आहे.''[१६]

**वर्तमान परिस्थितीत संशोधनाची उपयुक्तता**

विविध काळात झालेले जलव्यवस्थापन त्या त्या काळी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरले. उदा. प्राचीनकालीन जलव्यवस्थापन, शिवकालीन जलव्यवस्थापन, मध्ययुगीन जलव्यवस्थापन, स्वांतत्र्योत्तरकालीन जलव्यवस्थापन त्याप्रमाणे आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापनाची भूमिका यांचा विचार करता या सर्व काळातील जलव्यवस्थापनाचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, पुढील जलव्यवस्थापन करताना त्याचे नियोजन करताना अगोदर कसे केले गेले? कोणते निर्णय घेण्यात आले? त्या परिस्थितीत घेतलेले निर्णय त्यावेळी कसे फायदेशीर ठरले याचा सांगोपांग विचार करणे आज स्थितीला मदत करणारे ठरेल. शिवाय त्यावेळी करण्यात येणारे  नियोजन अत्यंत काटकसरीने करण्यात आले होते. जलसंवर्धन करणे ही काळाची नितांत गरज आहे. या दृष्टीने आपणास पाणी व्यवस्थापन करण्यासाठी एक नवी दृष्टी यातून मिळते. शिवाय अनेक जलसिंचन आयोग यांची भूमिका पूर्वीही महत्त्वपूर्ण होती आणि आजही वाढत्या लोकसंख्येच्या जलव्यवस्थापनसंबंधी गरजा लक्षात घेता त्यांनी मागील अनुभवावरून नवीन बदल करून जलव्यवस्थापनासंबंधी नवनवीन विकल्प अथवा नवीन पर्याय शोधणे गरजेचे आहे. कारण देशापुढील अनेक आव्हानांमध्ये उदा. बेरोजगारी, दारिद्र्य, आर्थिक विषमता, प्रादेशिक विषमता, लोकसंख्येचा विस्फोट, नैसर्गिक साधनसंपत्तीचा अकार्यक्षम वापर, पर्यावरणाचा विध्वंस अशा अनेक आव्हानांमध्ये देशासमोर जलसंकट हेदेखील ज्वलंत आव्हान आहे. अन्न आणि पाणी हे परमेश्वराने मानवाला दिलेले दोन अनमोल रत्न आहे. त्याचे सुयोग्य संवर्धन करणे, जतन करणे आवश्यक आहे. जलसंकट संपूर्ण विश्वासमोर उभे ठाकले असताना अनेक शास्त्रज्ञांनी असे भाकीतदेखील केले आहे की, तिसरे महायुद्ध होईल तर ते पाण्यासाठी. त्या दृष्टीने आजच जलव्यवस्थापन सुयोग्य दिशेने होण्यासाठी अगोदर झालेल्या नियोजनाचा आढावा घेतल्यास वर्तमानात आणि भविष्यात त्याची योग्य दिशेने वाटचाल करणे, आखणी करणे नक्कीच सोपे होईल. शिवाय त्यावर नवनवीन पर्याय अथवा विकल्प शोधणे शक्य होईल शाश्वत कृषी की,ज्यामुळे मानवी गरजा पूर्ण होतील व त्याचवेळी पर्यावरणाचा दर्जा राखून त्यात वाढ करून नैसर्गिक साधन सामग्रीचेही जतन केले जाईल.'' हाच दृष्टिकोन आर्थिक सुधारणा काळात अनुसरण्यात आला आहे. असे असले तरी पाणी हा आर्थिक विकासाचा मूलाधार आहे त्याची उधळपट्टी रोखणे, व्यक्तिगत व सामाजिक पातळीवर पाण्याचा काळजीपूर्वक वापर करण्याची खरी गरज आहे. भविष्यातील पाणी नियोजन करण्याच्या दृष्टीने धोरणे आखण्यासाठी या व अनेक कालखंडात झालेल्या अभ्यासाची वर्तमानात खरी गरज आहे . कारण वर्तमानात आणि भविष्यात त्या अध्ययनामुळे एक नवी दिशा प्राप्त होण्यास निश्चितच मदत होईल, यात शंका नाही.

## गृहीतकृत्यांची पडताळणी

'आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापनाचा अभ्यास' या अभ्यास विषयाचे संशोधन करताना संशोधकाने गृहीतकृत्य मांडले आहेत. निश्चित केलेल्या संशोधन समस्येचे संभाव्य उत्तर किंवा परिकल्पना यांची अभ्यासांती चाचणी करावी लागते, तो एक अभ्यासाचा महत्त्वाचा भाग असतो. गृहीतकृत्ये स्वीकारले गेले की नाकारले गेले आहे, याचे स्पष्टीकरण संख्याशास्त्रातील उपलब्ध असलेल्या विविध चाचण्याद्वारे करावे लागते. अभ्यासकाने गृहीतकृत्य मांडलेल्या गृहीतकांची चाचणी दुय्यम साधने या माहितीच्याआधारे केली आहे.

१. आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापन आणि त्यासंबंधी सरकारने आखलेले धोरण यात सकारात्मक संबध आहे.

'भारत निर्माण योजने' अंतर्गत विहित कालावधीत १८ लाख ४५हजार हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट महाराष्ट्र शासनाला नेमून देण्यात आले आहे. वरील कार्यक्रम व धोरणाचा जलनियोजनाबाबत विचार करता १९७९ सालच्या जागतिक बँकेच्या अभ्यासानुसार मांडलेला सुधारित अंदाज सांगतो की, ७५ टक्के विश्वासार्हता धरून राज्याची वापरण्यायोग्य भूपृष्ठीय जलसंपत्ती २६०० टी.एम.सी.असून त्याची सिंचनक्षमता ६२ लाख हेक्टर्स इतकी आहे. भूपृष्ठाखालील पाणी वापरून एका अनुमानानुसार १५ टक्के क्षेत्र भिजू शकेल, असा हा अभ्यास सांगतो.''[१७] याचाच अर्थ, भूपृष्ठावरील व खालील सर्व जलसंपत्तीचा पुरेपूर कार्यक्षमतेने वापर केला तर राज्यातील ४५ टक्के क्षेत्र भिजविण्याची शक्यता आहे.

२९ नोव्हें.२०१२ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी 'जलसिंचनावरील श्वेतपत्रिका' मंत्रिमंडळापुढे सादर केली. ही श्वेतपत्रिका दोन खंडांची असून पहिल्या खंडात ९ प्रकरणे आहेत. त्यात सर्वसाधारण माहितीबरोबर सिंचन प्रकल्पाचा खर्च वाढण्याची कारणे, प्रकल्पांना झालेल्या विलंबाची कारणे आणि भविष्यातील प्रकल्पासाठी मार्गदर्शक तत्त्वे यांचा समावेश आहे. तर दुसऱ्या खंडात महामंडळानुसार सर्व मध्यम व मोठ्या प्रकल्पांची माहिती देण्यात आली आहे.[१८]

१२ जाने २००७ रोजी माजी पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग यांनी आपल्या निवासस्थानी औपचारिकपणे 'भारत जल पोर्टल'चे उद्‌घाटन केले हे एक संकेतस्थळ असून जल व ऊर्जा या दोन क्षेत्रांना समर्पित संकेतस्थळ होय. या माध्यमातून 'भारत जल पोर्टल' म्हणजे डजनभर भागिदारी संस्थांचं खऱ्या अर्थाने संयुक्त व्यासपीठ होय. पाण्याशी संबंधित विविध घटक, जलविषयक ज्ञानात भर घालणे, त्याची देवाणघेवाण आणि त्याचा अवलंब करण्याच्यादृष्टीने संवाद साधू शकतील, असे एक माध्यम होय. पाण्याबाबतचे दुर्भिक्ष कमी करण्यात हे महत्त्वाची भूमिका बजावू शकेल असे माध्यम होय.[१९]

'जलसंसाधन मंत्रालय' देशातील जलसंपत्तीचा विकास, नियमन करण्यासाठी योजना, नीती व कार्यक्रम निश्चित करते. यात क्षेत्रीय नियोजन, समन्वय, मार्गदर्शन, परियोजनांची तांत्रिक परीक्षा आणि तांत्रिक, आर्थिक मूल्यांकन, विशिष्ट योजना प्रकल्पांना केंद्राचे सहाय्य उपलब्ध करून देणे, विदेशी साहाय्य किंवा आंतरराज्यीय जलविवाद मिटविण्यासाठी सहायता सुविधा पुरविणे; तसेच मोठ्या, मध्यम व लघुसिंचन योजना, कमांड क्षेत्र विकास, पूरनियंत्रण आणि भूजल संसाधनाचा विकास याबाबत नियोजन मार्गदर्शन, धोरणे याचा समावेश करणे. वरील कार्य पार पाडण्यासाठी 'जलसंसाधन मंत्रालय' देशात स्थापन करण्यात आले आहे.[२०]

केंद्रसरकारने ग्रामीण भागात २००५-२००६ ते २००८-२००९ याकाळात विकास करण्यासाठी 'भारत निर्माण योजना' जाहीर केली असून या योजनेन्वये देशात एक कोटी हेक्टर अतिरिक्त सिंचनक्षमता निर्माण करण्याचा प्रस्ताव आहे.

महाराष्ट्रासाठी १८.५४ लाख हेक्टरचे लक्ष्य ठरवून

देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे राज्यात जास्तीत जास्त सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी भारतात अनेक मोठे, मध्यम व लघुपाटबंधारे प्रकल्प हाती घेतले आहेत.[२१]

दुय्यम माहितीच्याआधारे अध्ययन केल्यानंतर मिळालेले निष्कर्ष पुढील प्रमाणे सांगता येतील.

**निष्कर्ष**

१. वरील अभ्यासावरून असे दिसून येते की, सिंचन/पाणी हा शेतीक्षेत्राचा केंद्रबिंदू आहे. किंबहुना देशाचा केंद्रबिंदू आहे . त्या अनुषंगाने भारत सरकारने स्वातंत्र्योत्तर आणि आर्थिक सुधारणा काळात जलसिंचनविषयक आयोग, जलनीती, कार्यक्रम, धोरणे अभ्यासगट, समित्या अंतर्गत भक्कमपणे जलनियोजनाचा पाया दृढ केल्याचे दिसून येते. त्यावरून असे स्पष्ट होते की, आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापन आणि त्यासंबंधी सरकारने आखलेले धोरण यात सकारात्मक संबंध आहे. हे गृहीतक स्वीकाहार्य आहे.

२. सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने सरकारने ठोस पावले उचलली आहेतच; परंतु वाढत्या लोकसंख्येच्या धर्तीवर जलसंकटाचा ज्वलंत प्रश्न सोडविण्यासाठी आणि जलनियोजन आणि जलसंवर्धन संबंधी नवनवीन विकल्प निर्माण करण्याच्या दृष्टीने आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापनाच्या अभ्यासाची देशात वर्तमानकालीन परिस्थितीत संशोधन अभ्यासाची उपयुक्तता नितांत आहे, असे दिसून येते.

**शिफारसी**

१. भविष्यात सुयोग्य व काटकसरीने पाणी व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापनाचा चिकित्सक अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

२. जागतिकीकरणाच्या काळात सरकारने आधुनिक सिंचन पद्धतीचा सरकारने प्रचार व प्रसार याबाबत जलद निर्णय घेऊन जे प्रकल्प हाती घेतले होते त्याचा ग्रामपातळीवर विचार रुजविण्यासाठी व पाणी बचत करण्याच्या अनुषंगाने विविध माध्यमांनी वेळोवेळी सिंचनसंबधी योजनाविषयक माहिती पुरवून देशासमोरील पाणी वापराबाबतचा प्रश्न सोडविण्यास हातभार लावावा.

**सारांश**

नवीन आर्थिक धोरण १९९१ भारताची कल्पना भ्रष्टाचार, अकार्यक्षमता आणि वाढीतील स्थिरता नियंत्रित करण्याच्या दीर्घकालीन उद्दिष्टासह करण्यात आली होती. सरकारच्या अत्याधिक नियम आणि नियंत्रणे आणि सार्वजनिक क्षेत्रातील युनिट्सच्या अकार्यक्षम कार्यामुळे अर्थव्यवस्था गोंधळात होती. अशा परिस्थितीत, नवीन आर्थिक धोरणाने विविध सुधारणा आणल्या. ज्याने जागतिक मंचावर भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया मजबूत करण्यासाठी नवीन आणि नावीन्यपूर्ण कल्पना आणल्या. नवीन आर्थिक धोरणाचे उद्दिष्ट मोठ्या घडामोडींसह अर्थव्यवस्थेच्या वाढीला चालना देणे आणि भारताला जगातील आघाडीच्या आर्थिक शक्तींपैकी एक बनवणे आहे.

''शाश्वत कृषी म्हणजे शेतीच्या पारंपरिक पद्धती नाकारणे असा नसून आधुनिक तंत्रज्ञान, नवप्रवर्तन, व्यावहारिक अनुभव यांची सांगड घालणे असा होतो या कृषीमध्ये भूसंधारण, पाणलोट क्षेत्र विकास, जलव्यवस्थापन याचा विचार केला जात असून, कृषीसाठी वापरण्यात येणाऱ्या नैसर्गिक साधनसामग्रीचे यशस्वी पद्धतीने असे व्यवस्थापन करणे की ज्यामुळे मानवी गरजा पूर्ण होतील व त्याचवेळी पर्यावरणाचा दर्जा राखून त्यात वाढ करून नैसर्गिक साधनसामग्रीचेही जतन केले जाईल.'' हाच दृष्टिकोन आर्थिक सुधारणा काळात अनुसरण्यात आला आहे असे असले तरी पाणी हा आर्थिक विकासाचा मूलाधार आहे. त्याची उधळपट्टी रोखणे व्यक्तिगत व सामाजिक पातळीवर पाण्याचा काळजीपूर्वक वापर करण्याची खरी गरज आहे. भविष्यातील पाणी नियोजन करण्याच्या दृष्टीने धोरणे आखण्यासाठी आर्थिक सुधारणा काळातील जलनियोजनाचे त्या काळात घेतले गेलेल्या निर्णयांचे अध्ययन करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. जोशी ब्रजरत्न, जल और समाज - 'जलव्यवस्थापन', पृ. क्र.२
२. कोळंबे रंजन , (फेब्रु. २०१०), भारतीय अर्थव्यवस्था, भगीरथ प्रकाशन, पुणे, पृ.१५६
३. मुणगेकर भालचंद्र, (२०१२), आर्थिक सुधारणा आणि विकासाचा मानवी चेहरा, न्यू एज प्रिंटींग प्रेस, मुंबई.
४. शिल्पकार चरित्रकोष-इतिहास खंड १, पृ. ८४४.
५. Unacadamy.com नवीन आर्थिक धोरण, १९९१
६. येवजेविच. व्ही.१९९२. वॉटर इंट., १७(४): १६३-१७१.
७. https:// byjues.com -water-management
८. भालेराव श. म., (२००६), भारतीय सरिताकोश (EncyclopediaofIndian Rivers), खंड ३, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ.१७५८.
९. गायकवाड मुकुंद, (२००१), जागतिकीकरण शाप नव्हे वरदान, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
१०. योजना,(फेब्रु.२००१), पृ.१३.
११. सवदी ए. बी.,(जून २०१२), भूगोल व कृषी (महाराष्ट्राच्या विशेष संदर्भासह), निराली प्रकाशन, पुणे, पृ.१०, ३०.
१२. योजना, (फेब्रु.१९९९), पृ. ८
१३. सागर के., (२०१०), कृषिविषयक घटक, के सागर पब्लिकेशन, पुणे, पृ.१०६.
१४. कित्ता / उपरोक्त, पृ.१०८.
१५. शिल्पकार चरित्रकोष- इतिहास खंड १, पृ. ८४४
१६. Press information bureau- ministry of Jal shakti -jal Jeevan mission
१७. जाधव तुकाराम, (२०१३), महाराष्ट्र वार्षिकी २०१३, युनिक अकॅडमी, पुणे, पृ.१६.
१८. संदर्भ -१२३ कित्ता/उपरोक्त, पृ.३४.
१९. योजना, सप्टें. २००७, पृ.७
२०. गवेषणा संदर्भ और प्रशिक्षण प्रभाग द्वारा संकलित - (२०१३), भारत २०१३ वार्षिक संदर्भग्रंथ, प्रकाशन विभाग, सूचना और प्रसारण मंत्रालय भारत सरकार, पृ. ९१२
२१. शिल्पकार चरित्रकोष - इतिहास खंड १, पृ. ८४१.

◆

'' जगाची अर्थव्यवस्ता सुधारली तरी सोनं वाढेल आणि ती बिघडली तरीही सोनं वाढेल.

**- जिम रॉजर्स**

# नवीन आर्थिक सुधारणा आणि भारताच्या अभिनव अर्थव्यवस्थेचा उदय : रोमरच्या अंतर्जात वाढ यंत्रणेचा अभ्यास

**राजेश हरिचंद्र भोईटे** †

**प्रस्तावना :**

पॉल रोमर यांना २०१८ मध्ये अर्थशास्त्रातील नोबेल स्मारक पुरस्कार प्रदान करण्यात आला. रोमर यांना त्यांच्या एन्डोजेनस ग्रोथ थिअरी (अंतर्जात आर्थिक वाढीच्या सिद्धांतासाठी) सन्मानित करण्यात आले, ज्यामध्ये तंत्रज्ञानातील नावीन्य आणि कल्पना हे आर्थिक प्रगतीचे मुख्य घटक असल्याचे अधोरेखित केले आहे. रोमर यांच्या संशोधनाने असे दाखवून दिले की, आर्थिक धोरणे आणि बाजारातील परिस्थिती नावीन्यपूर्णतेवर कसा परिणाम करतात त्यांनी एक अशी चौकट तयार केली जी ज्ञानाला दीर्घकालीन आर्थिक विकासाचा मुख्य आधार म्हणून ओळखते आणि यामुळे नावीन्याला प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांच्या महत्त्वावर भर दिला जातो.

**पॉल रोमर यांचा सिद्धांत:**

पॉल रोमर यांच्या एन्डोजेनस ग्रोथ थिअरीने आर्थिक वाढीच्या समजाला मूळत: बदलून टाकले. कारण त्यांनी तंत्रज्ञान आणि नावीन्य यांना बाह्यघटक न मानता आर्थिक वाढीचे अंतर्गत घटक म्हणून अधोरेखित केले.

**१. ज्ञान आणि नावीन्य आर्थिक वाढीचे मुख्य चालक**

रोमर यांना विश्वास आहे की, ज्ञान आणि नावीन्य हे आर्थिक वाढीचे मुख्य घटक आहेत. नवीन तंत्रज्ञान आणि कल्पनांनी अर्थव्यवस्था जलद वाढवते.

**२. वाढत्या परताव्याचे तत्त्व** (Increasing Returns to Scale)

रोमर यांच्या सिद्धांतानुसार, जशी ज्ञानाची वाढ होते, तशी उत्पादनाची वाढ इनपुटपेक्षा जास्त होते. याचा अर्थ असा आहे की, अर्थव्यवस्था आणखी विकास करू शकते आणि ही वाढ टिकाऊ राहाते.

**३. कल्पनांची गैर-प्रतिस्पर्धा** (Non-rivalry of Ideas)

कल्पनागैर-प्रतिस्पर्धी असतात, म्हणजेच एका कंपनीने किंवा व्यक्तीने ज्या तंत्रज्ञानाची नवीनता केली, ती दुसऱ्या कंपन्यांनादेखील वापरता येते आणि यामुळे त्याच्या मूल्यात काही कमी होत नाही. यामुळे विविध उद्योगांमध्ये उत्पादकतेत सुधारणा होते.

**४. मानव संसाधन आणि शिक्षणाची भूमिका**

रोमर यांचा ठाम विश्वास आहे की, कौशल्ययुक्त कामगार आणि शिक्षण नावीन्य निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे आहे. योग्य कौशल्य असलेल्या व्यक्तींना नवीन ज्ञान तयार करण्याची क्षमता असते, जे आर्थिक वाढीस कारणीभूत ठरते.

---

† सहयोगी प्राध्यापक आणि विभाग प्रमुख, व्यवसाय अर्थशास्त्र विभाग, ए.आय. अकबर पीरभॉय कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, ग्रान्ट रोड, मुंबई - ०५
आजीव सभासद क्र. १९२५, भ्रमणध्वनी : ८९७६०३६०४६, ई-मेल : drrajeshbhoite77@gmail.com

**५. ज्ञानाचे पसरलेले फायदे** (Knowledge Spillovers)

जेव्हा एखादी कंपनी नवीन तंत्रज्ञान विकसित करते, तेव्हा इतर कंपन्याही त्याचा फायदा घेतात. हे ज्ञानाचे पसरलेले फायदे (Knowledge Spillovers) म्हणून ओळखले जाते, जे नावीन्याचा वेगाने प्रसार होण्यात मदत करते.

**६. बौद्धिक संपदा आणि धोरणांचा महत्त्व**

रोमर यांचे म्हणणे आहे की, संशोधन आणि नावीन्याला प्रोत्साहन देणारी धोरणे महत्त्वाची आहेत, जसे की बौद्धिक संपदा हक्क (Intellectual Property Rights) वाढवणे. यामुळे कंपन्यांना नवीन कल्पना आणि तंत्रज्ञान तयार करण्याचे प्रोत्साहन मिळते.

**७. दीर्घकालीन टिकाऊ वाढ**

जेव्हा कंपन्या आणि व्यक्ती सतत नावीन्य निर्माण करतात आणि त्याचं शेअरिंग करतात, तेव्हा अर्थव्यवस्थेला अखेरपर्यंत वाढ अनुभवता येते. कारण नेहमीच नवीन ज्ञान शोधण्याची आणि त्यावर काम करण्याची संधी असते.

**साहित्य की समीक्षा**

**१. बालकृष्णन (२०२०):** आर्थिक सुधारणा आणि आर्थिक विकासाच्या प्रभावाचा अभ्यास केला. या अध्ययनात आर्थिक सुधारणा आर्थिक विकासावर सकारात्मक प्रभाव टाकतात, असा निष्कर्ष काढण्यात आला. १०० देशांचा समावेश असलेल्या साध्या यादृच्छिक नमुना पद्धतीचा वापर करून हा अभ्यास करण्यात आला. वेगवेगळ्या आर्थिक विकाससंबंधीच्या घटकांमधील संबंध दर्शविण्यासाठी त्यांनी रिग्रेशन मॉडेलचा वापर केला आणि पॅनेल चर्चाही केली. हा अभ्यास मात्रात्मक होता आणि त्यांनी शोधले की आर्थिक सुधारणा काही प्रमाणात प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासाला चालना देतात.

**२. मिस्रा, एस. (२०२१):** सार्वजनिक गुंतवणुकीचा आर्थिक विकासावर प्रभाव मूल्यांकन केला. या अध्ययनात सार्वजनिक गुंतवणूक खाजगी क्षेत्राच्या विकासावरही प्रभाव टाकते, असा निष्कर्ष काढण्यात आला. या अभ्यासात २०० कंपन्यांचा समावेश होता आणि त्यासाठी उद्देशपूर्ण नमुना पद्धतीचा वापर करण्यात आला. हा अभ्यास मिश्र पद्धतींचा आधार घेत होता आणि या अध्ययनाची पद्धत केस स्टडी आणि तुलना विश्लेषणावर आधारित होती. त्यांनी वापरलेले सांख्यिकी साधने ANOVA आणि सहसंबंध विश्लेषण होते. त्यांनी निष्कर्ष काढला की सार्वजनिक गुंतवणूक देशाच्या एकूण आर्थिक विकासावर प्रभाव टाकते.

**३. अघियन, पी., ॲण्ड हॅविट, पी. (१९९८):** नवकल्पना आणि आर्थिक विकास यामध्ये असलेला संबंध अभ्यासला. या अध्ययनात नवकल्पना आर्थिक विकासाचा आणि प्रगतीचा मुख्य चालक आहे, असा सिद्धांत मांडण्यात आला. हा अभ्यास मात्रात्मक होता आणि ५० देशांमध्ये जातीय नमुना पद्धतीचा वापर करून आंतरदेशीय तुलना विश्लेषण म्हणून करण्यात आला. त्यांनी सांख्यिकी साधन म्हणून SEM मॉडेलचा वापर केला आणि निष्कर्ष काढला की, नवकल्पनांमुळे त्या देशाच्या आर्थिक विकासावर सकारात्मक परिणाम झाला.

**४. सिंह, ए., ॲण्ड कुमार, व्ही. (२०१८):** भारतातील कौशल्य भारत मिशन कार्यक्रमाचा आढावा घेतला. या अध्ययनात SIM (कौशल्य भारत मिशन) रोजगार पातळी वाढवतो, असा सिद्धांत मांडण्यात आला. हा अभ्यास पाच राज्यांतील ५०० प्रशिक्षणार्थ्यांवर आधारित होता. हा एक सर्वेक्षण आधारित अभ्यास होता ज्यामध्ये क्लस्टर नमुना पद्धतीचा वापर करण्यात आला. हा अभ्यास अनुभवात्मक आणि पुराव्याधारित होता. सिद्धांतास सिद्ध करण्यासाठी वापरलेले सांख्यिकी साधने वर्णनात्मक सांख्यिकी आणि रिग्रेशन विश्लेषण होती. त्यांनी निष्कर्ष काढला की, SIM कार्यक्रमांमुळे काही प्रमाणात रोजगाराची वाढ झाली आहे.

**५. भट्टाचार्य, एस., ॲण्ड मित्रा, ए. (२०२०):** व्यावसायिक प्रशिक्षणाचा रोजगाराच्या पातळीवर

प्रभावाचा अभ्यास केला. या अध्ययनात व्यावसायिक प्रशिक्षण नोकऱ्या वाढवण्यात मदत करते, असा सिद्धांत मांडण्यात आला. हा अभ्यास ३०० प्रशिक्षणार्थ्यांवर साधी यादृच्छिक नमुना पद्धती वापरून करण्यात आला. हा एक लांबट अभ्यास होता. त्यांनी गटाच्या बदलांच्या तुलनासाठी T-test चा वापर केला. त्यांनी निष्कर्ष काढला की, व्यावसायिक प्रशिक्षण रोजगाराच्या वाढीसाठी मदत करते.

**६. कुमार, आर., ॲण्ड तिवारी, एस. (२०२१):** SIM कार्यक्रमांतर्गत कौशल्य मिळवण्यासाठी महिलांना भेडसावणाऱ्या अडचणींचा अभ्यास केला. या अध्ययनात महिलांना प्रशिक्षण मिळवताना पुरुषांच्या तुलनेत अधिक अडचणींचा सामना करावा लागतो, असा सिद्धांत मांडण्यात आला. हा अभ्यास ४०० महिलांवर कोटा नमुना पद्धतीचा वापर करून अधिक गुणात्मक अध्ययन म्हणून करण्यात आला. वापरलेली पद्धत लक्ष केंद्रित अध्ययन आणि मुलाखतींवर आधारित होती. त्यांनी या अध्ययनासाठी निवडलेल्या वेगवेगळ्या आर्थिक बदलांच्या संबंध दर्शवण्यासाठी ची-स्क्वेअर चाचणीचा वापर केला. त्यांनी निष्कर्ष काढला की, महिलांच्या कौशल्य विकासात मुख्य अडथळा सामाजिक मान्यता आहे.

**७. राज, पी. आणि शर्मा, ए. (२०२०) :** यांनी शिक्षण आणि आर्थिक विकासातील संबंध दर्शवण्याचा प्रयत्न केला. या अभ्यासामध्ये उच्च शिक्षणाचा G DP वाढीशी संबंध असतो, अशी कल्पना होती. त्यांनी ५० राष्ट्रांवर आधारित एक क्रॉस-सेक्शनल अभ्यास केला ज्यामध्ये स्ट्रॅटिफाइड सॅम्पलिंगचा वापर केला. त्यांनी आढळले की, शिक्षण नक्कीच रोजगार आणि एकत्रित उत्पन्न वाढवते. त्यांनी या परिकल्पनांना सिद्ध करण्यासाठी रिग्रेशन विश्लेषण आणि SEM मॉडेल्सचा वापर केला.

**८. नेल्सन, आर. आर., आणि पेल्प्स, ई. एस. (१९६६) :** यांनी देशात मानव संसाधन विकासावर आरोग्याचा प्रभाव याचा आढावा घेतला. या अभ्यासाचा उद्देश म्हणजे आरोग्यातील गुंतवणूक उत्पादकतेवर सकारात्मक प्रभाव टाकते. त्यांनी १००० व्यक्तींवर यादृच्छिक नमुना वापरून अभ्यास केला. हा अभ्यास अधिक प्रमाणात्मक होता आणि आरोग्यातील गुंतवणूक आणि वाढलेल्या उत्पादकतेदरम्यान एक मजबूत संबंध दर्शविला.

**९. गुप्ता, एन. आणि अगरवाल, पी. (२०१९):** यांनी मानव संसाधनावर स्थलांतराचा प्रभाव अभ्यासला. त्यांनी डेटा मिळवण्यासाठी मिश्र पद्धतीचा वापर केला आणि ३०० ग्रामीण उत्तरदात्यांवर स्नोबॉल सॅम्पलिंगचा वापर करून सर्वेक्षणे आणि प्रकरण अध्ययन केले. या अभ्यासाची कल्पना अशी होती की स्थलांतरामुळे ब्रेन ड्रेन होतो. त्यांनी आढळले की ब्रेन ड्रेन आर्थिक वाढीला मर्यादा आणतो, कारण देशात विकसित झालेले मानव संसाधन आता देशाला योगदान देत नाही, तर इतर देशांना सेवा करते.

**१०. कुमार, आर. आणि तिवारी, एस. (२०२१) :** यांनी भारतातील MSME वर 'आत्मनिर्भर भारत' चा प्रभाव शोधला. त्यांनी चार क्षेत्रांमध्ये २५० MSME च्या प्रकरणांचा अभ्यास केला. डेटा मिळवण्यासाठी त्यांनी उद्देशपूर्ण सॅम्पलिंग पद्धतींचा वापर केला. या अभ्यासात 'आत्मनिर्भर भारत' MSME वर सकारात्मक प्रभाव आणतो, अशी कल्पना मांडली आणि त्यांनी गुणवत्तात्मक अध्ययनाचा भाग म्हणून सामग्री आणि थीमॅटिक विश्लेषणाचा वापर करून हे सिद्ध केले.

**११. भारत सरकार (२०२०) :** यांनी 'आत्मनिर्भर भारत' अंतर्गत आर्थिक प्रोत्साहनांचा शोध घेतला. या अभ्यासाची कल्पना अशी होती की, चांगले आर्थिक प्रोत्साहन चांगल्या कर्ज उपलब्धतेला चालना देतात. त्यांनी मिश्र पद्धतीचा वापर केला आणि १५० MSME चा अभ्यास केला. त्यांनी वर्णात्मक विश्लेषण वापरून कर्जात वाढ झाल्याचे आढळले, परंतु याबद्दलची जागरूकता कमी आहे.

**अभ्यासाची प्रासंगिकता**

भारताची मोठी लोकसंख्या आणि वाढती डिजिटल अर्थव्यवस्था लक्षणीय वाढीची क्षमता देत असताना, भारत एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर आहे. या अभ्यासाची प्रासंगिकता हे समजून घेण्यात आहे की रोमरचा सिद्धांत, जो ज्ञान आणि नावीन्य यासारख्या अंतर्गत चालकांच्या भूमिकेवर भर देतो, भारताच्या डिजिटल इंडिया, स्टार्टअप इंडिया आणि आत्मनिर्भर भारत यासारख्या आर्थिक सुधारणांवर प्रभावीपणे कसा लागू केला जाऊ शकतो. अनेक विकसनशील देशांनी नावीन्यपूर्ण विकासावर लक्ष केंद्रित केल्यामुळे, हे संशोधन हे राष्ट्र त्यांच्या मानवी भांडवलाचा लाभ घेऊन आणि नवकल्पना वाढवून शाश्वत आर्थिक विकास कसा साधू शकतात याबद्दल अंतर्दृष्टी प्रदान करू शकतात.

**अभ्यासाचे महत्त्व**

अभ्यास अनेक कारणांसाठी महत्त्वपूर्ण आहे:

१. हे दीर्घकालीन विकास धोरणांच्या संदर्भात भारताच्या नवीन आर्थिक सुधारणांचे विश्लेषण करण्यासाठी एक सैद्धांतिक रचना प्रदान करते.

२. हे आर्थिक विकासामध्ये शिक्षण, संशोधन आणि डिजिटल पायाभूत सुविधांच्या भूमिकेवर प्रकाश टाकते, जे विशेषतः उदयोन्मुख अर्थव्यवस्थांसाठी महत्त्वपूर्ण आहे.

३. हे धोरणात्मक उपक्रम आणि आर्थिक सिद्धांत यांच्यातील अंतर कमी करते, इतर विकसनशील राष्ट्रांसाठी एक मॉडेल प्रदान करते जे शाश्वत वाढ शोधत आहेत.

४. या अभ्यासात ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी धोरणात्मक शिफारशी देण्यात आल्या आहेत, जे बाह्य संसाधनांवर त्यांचे अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि स्वयं-शाश्वत विकास मॉडेल्स तयार करण्याचे उद्दिष्ट असलेल्या राष्ट्रांसाठी महत्त्वपूर्ण आहे.

**अभ्यासाची मुख्य उद्दिष्ट्ये**

१. भारतीय आर्थिक वाढ आणि विकासामध्ये रोमर सिद्धांताच्या वापराचे विश्लेषण करणे.

२. पॉल रोमरच्या एंडोजेनस ग्रोथ थिअरीच्या भारतीय अर्थव्यवस्थेसाठी, विशेषतः अलीकडील सुधारणांच्या प्रकाशात लागू होणारे अन्वेषण करणे.

**अभ्यासाची पद्धत**

- **डेटा संकलनः**

सरकारी अहवाल, शैक्षणिक कागदपत्रे आणि जागतिक बँक आणि IMF सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांकडील दुय्यम डेटा वापरला जाईल.

- **गुणात्मक विश्लेषण:**

हा अभ्यास रोमरच्या सिद्धांताच्या दृष्टिकोनातून भारताच्या अलीकडील आर्थिक सुधारणांचे तपशीलवार विश्लेषण करेल. भारतातील IT, बायोटेक्नॉलॉजी आणि मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील केस स्टडीज अनुभवजन्य अंतर्दृष्टी प्रदान करतील.

- **धोरण मूल्यमापनः**

दीर्घकालीन शाश्वततेवर लक्ष केंद्रित करून, अंतर्जात वाढीच्या तत्त्वांशी त्यांचे संरेखन निश्चित करण्यासाठी विविध सरकारी उपक्रमांचे मूल्यांकन केले जाईल.

**विश्लेषण**

अभ्यासाचे निष्कर्ष थेट भारतासारख्या आर्थिक परिस्थिती सामायिक करणाऱ्या विकसनशील देशांना लागू होतात. जसे की मोठी लोकसंख्या, वाढती डिजिटल क्षेत्रे आणि उदयोन्मुख मध्यमवर्ग. ब्राझील, दक्षिण आफ्रिका आणि इंडोनेशिया सारखे देश मानवी भांडवलात गुंतवणूक करून, नवोपक्रमाच्या परिसंस्थांना चालना देऊन आणि उद्योजकतेला चालना देऊन रोमरच्या सिद्धांताचा फायदा घेऊ शकतात. मोठ्या अनौपचारिक क्षेत्रे असलेल्या राष्ट्रांसाठी, हे संशोधन कौशल्य विकास आणि डिजिटल समावेशाचे महत्त्व अधोरेखित करते. सार्वजनिक धोरणे ज्ञानाच्या प्रसारासाठी अनुकूल वातावरण कसे निर्माण करू शकतात, ज्यामुळे व्यापक आर्थिक लाभ मिळू शकतात याविषयीही अभ्यासात अंतर्दृष्टी आहे.

पॉल रोमर यांचा अंतर्जात विकास सिद्धांत (Endogenous Growth Theory) असा सांगतो की, दीर्घकालीन आर्थिक वाढीसाठी मानवी भांडवल, नवकल्पना (Innovation) आणि ज्ञान निर्मिती ह्या महत्त्वाच्या गोष्टी आहेत. बाह्यघटकांवर अवलंबून राहाण्याऐवजी, आर्थिक विकास देशाच्या आतूनच घडतो. हा सिद्धांत तंत्रज्ञान, संशोधन आणि विकास (R&D), शिक्षण आणि ज्ञान प्रसारावर आधारित आहे आणि भारतातील नवीन आर्थिक सुधारणाऱ्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करतात. या संदर्भात, रोमर यांचा सिद्धांत भारताच्या ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेला चालना देण्यास उपयुक्त ठरतो.

पॉल रोमर यांच्या अंतर्जात विकास सिद्धांताचे प्रमुख घटक आणि भारताशी संबंध :

**१. मानवी भांडवलाचे महत्त्व:**

● **रोमर यांचे मत :** मानवी भांडवल, म्हणजेच कौशल्ये, शिक्षण आणि ज्ञान, हा आर्थिक विकासाचा मुख्य घटक आहे. शिक्षण आणि प्रशिक्षणात केलेल्या गुंतवणुकीमुळे कुशल कामगार तयार होतात, ज्यामुळे नवकल्पना विकसीत होतात आणि उत्पादकता वाढते.

**भारतासाठी महत्त्व :**

● भारताच्या राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) अंतर्गत शिक्षणप्रणाली सुधारून गुणवत्ता, प्रवेशक्षमता आणि कौशल्य विकासावर भर दिला जात आहे. एक नवप्रवर्तक आणि कुशल कार्यबल तयार करून, भारत ज्ञानाधारित जागतिक अर्थव्यवस्थेत स्पर्धा करण्यास सक्षम होईल.

● स्किल इंडिया मिशनसारख्या कार्यक्रमांतर्गत, लाखो तरुणांना बाजारपेठेतील गरजेनुसार प्रशिक्षण दिले जात आहे, ज्यामुळे मानवी भांडवल मजबूत होईल आणि तंत्रज्ञानावर आधारित विकास शक्य होईल.

**२. नवकल्पना आणि तंत्रज्ञान:**

● **रोमर यांचे मत :** अंतर्जात विकास सिद्धांतात नवकल्पना हा विकासाचा मुख्य घटक मानला जातो. जेव्हा कंपन्या आणि व्यक्ती नवकल्पना करतात, तेव्हा त्याचा संपूर्ण अर्थव्यवस्थेला फायदा होतो आणि उत्पादकता वाढते.

**भारतासाठी महत्त्व:**

● भारताने स्टार्टअप इंडिया आणि मेक इन इंडिया या कार्यक्रमांद्वारे नवकल्पना, उद्योजकता आणि तंत्रज्ञानाच्या विकासावर लक्ष केंद्रित केले आहे.

● संशोधन आणि विकासात (R&D) वाढती गुंतवणूक, विशेषतः माहिती तंत्रज्ञान (IT), जैवतंत्रज्ञान (Biotechnology) आणि औषधनिर्मिती क्षेत्रात केली जात आहे. डिजिटल इंडिया उपक्रमामुळे डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करून नवकल्पनेला चालना दिली जात आहे.

● भारतातील फिनटेक, ई-कॉमर्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) सारख्या क्षेत्रांतील स्टार्टअप्सच्या वाढीमुळे नवकल्पनेचे महत्त्व वाढले आहे.

**३. ज्ञानाचा प्रसार (Knowledge Spillovers):**

● **रोमर यांचे मत :** नवकल्पनेमुळे तयार झालेले ज्ञान अर्थव्यवस्थेत पसरते, ज्यामुळे इतर कंपन्यांची उत्पादकता वाढते आणि नवकल्पना चालू राहाते.

**भारतासाठी महत्त्व:**

● भारतातील IT क्षेत्र हे ज्ञान प्रसाराचे उत्कृष्ट उदाहरण आहे. मोठ्या IT कंपन्यांच्या यशामुळे लहान कंपन्या आणि स्टार्टअप्सला भरपूर संधी मिळाल्या आहेत.

● स्मार्ट सिटी प्रकल्प आणि डिजिटल पायाभूत सुविधा तयार केल्यामुळे नवकल्पना आणि ज्ञानाचा प्रसार सोपा होत आहे.

● अटल इनोव्हेशन मिशनसारख्या उपक्रमांद्वारे शैक्षणिक संस्था, उद्योग आणि सरकार यांच्यातील सहकार्यामुळे नवकल्पना आणि ज्ञान आधारित विकासास चालना मिळत आहे.

**४. नवकल्पनांना सरकारचा पाठिंबा:**

● **रोमर यांचे मत:** सरकारने नवकल्पनांना पाठिंबा देण्यासाठी धोरणे तयार करणे, पायाभूत सुविधा निर्माण

करणे आणि स्पर्धेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. संशोधन, शिक्षण आणि पायाभूत सुविधांमध्ये सार्वजनिक गुंतवणूक नवकल्पनांचे वातावरण तयार करते.

**भारतासाठी महत्त्व:**

● मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारत उपक्रमांद्वारे नवकल्पना आणि स्थानिक उत्पादनाला चालना देण्यावर भर दिला जात आहे.

● स्टार्टअप इंडिया अंतर्गत स्टार्टअप्ससाठी कर सवलती, नियम सुलभता आणि गुंतवणुकीसाठी प्रोत्साहने दिली जात आहेत, ज्यामुळे नवउद्योजकता वाढते.

● भारतनेट प्रकल्पसारख्या उपक्रमांतर्गत ग्रामीण भारताला ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटी दिली जात आहे, ज्यामुळे तंत्रज्ञानाचा प्रसार होऊन दूरदूरच्या भागातही नवकल्पना शक्य होईल.

**५. ज्ञानावर आधारित उद्योगांचे महत्त्व:**

● **रोमर यांचे मत :** तंत्रज्ञान, औषधनिर्मिती, आणि शिक्षणसेवा यांसारख्या ज्ञानावर आधारित उद्योगांमध्ये उच्च वाढीच्या संधी असतात.

**भारतासाठी महत्त्व:**

● IT सेवा, औषधनिर्मिती आणि जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील भारताची आघाडी हे रोमर यांच्या सिद्धांताचे उत्तम उदाहरण आहे.

● डिजिटल इंडिया उपक्रमाने भारताला डिजिटल अर्थव्यवस्था आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था बनवण्याचा हेतू ठेवला आहे.

● तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांना प्रोत्साहन देणे हे भारताच्या जागतिक मूल्यसाखळीतील स्थान उंचावण्यास आणि दीर्घकालीन आर्थिक विकासास हातभार लावेल.

**६. दीर्घकालीन वाढीची क्षमता:**

● **रोमर यांचे मत:** जोपर्यंत देश मानवी भांडवल, नवकल्पना आणि तंत्रज्ञानात गुंतवणूक करतो, तोपर्यंत देशाला दीर्घकालीन वाढ साध्य करता येते.

**भारतासाठी महत्त्व:**

● भारताची तरुण लोकसंख्या, जर शिक्षण आणि नवकल्पनांमध्ये योग्य गुंतवणूक झाली, तर देशाला दीर्घकालीन आर्थिक वाढ मिळू शकते.

● व्यवसाय सुलभता, कामगार कायदे आणि पायाभूत सुविधा विकास क्षेत्रात सुधारणा केल्यामुळे उच्च वाढीचे दर टिकवून ठेवता येतील.

● भारतातील स्वच्छ ऊर्जा आणि हरित तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणूक दीर्घकालीन आणि शाश्वत वाढीला चालना देईल.

**आव्हाने आणि संधी:**

● **आव्हाने :** जरी रोमर यांचा सिद्धांत उपयुक्त असला तरी भारताला संशोधन आणि विकासात कमी सार्वजनिक गुंतवणूक, शिक्षण आणि आरोग्य सेवा सुधारण्यासाठी आव्हाने आहेत.

● **संधी :** शिक्षण, डिजिटल पायाभूत सुविधा आणि नवकल्पनांमध्ये गुंतवणूक केल्यास, भारत दीर्घकालीन विकास साध्य करू शकतो. भारताची तरुण लोकसंख्या मानवी भांडवलाच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते.

**निष्कर्ष :**

पॉल रोमर यांचा अंतर्जात विकास सिद्धांत भारतासाठी दीर्घकालीन आर्थिक विकास साधण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. कारण तो मानवी भांडवल, नवकल्पना आणि तंत्रज्ञानावर भर देतो. भारतातील डिजिटल परिवर्तन, उद्योजकता आणि कौशल्य विकास या सुधारणा या सिद्धांताशी सुसंगत आहेत आणि भारताच्या अर्थव्यवस्थेला नवकल्पनांवर आधारित विकासाकडे नेण्याची क्षमता ठेवतात.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. अघिओन, पी. आणि होविट, पी., (१९९८), अंतर्जात वाढ सिद्धांत, एमआयटी प्रेस.

२. कत्तुमन, पी. आणि राज आर., (२००१), भारतातील आर्थिक सुधारणा आणि उत्पादन दार: लहान नमुना सर्व्हेच्या साक्षेपासून, वर्ल्ड

**सारणी क्र. १ : भारतातील अंतर्जात विकास सिद्धांताशी सुसंगत धोरणात्मक उपक्रम**

| अ. क्र. | उपक्रम | उद्दिष्टे | निष्पत्ती |
|---|---|---|---|
| १ | स्टार्टअप इंडिया | उद्योजकता, नवकल्पना आणि रोजगार निर्मितीसाठी स्टार्टअप्सना कर सवलती, सुलभ नियम आणि निधी उपलब्ध करून देणे. | १,१७,००० नोंदणीकृत |
| २ | मेक इन इंडिया | देशांतर्गत उत्पादन आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देणे, विशेषतः इलेक्ट्रॉनिक्स, औषधनिर्मिती आणि संरक्षण क्षेत्रात. | उत्पादन क्षेत्रातील वाढ १८ टक्क्यांवर (०२२२-२०२३) |
| ३ | डिजिटल इंडिया | डिजिटल पायाभूत सुविधा निर्माण करणे, डिजिटल साक्षरतेस प्रोत्साहन देणे आणि सरकारी सेवा डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून देणे. | ६० कोटींहून अधिक ग्रामीणांना लाभ मिळाला |
| ४ | स्किल इंडिया | कार्यबलाला उद्योगांसाठी आवश्यक कौशल्यांचे प्रशिक्षण देणे, मानवी भांडवल विकासावर भर देणे. | आतापर्यंत ८८ लाख उमेदवारांनी नोंदणी केली आहे |
| ५ | आत्मनिर्भर भारत | देशाच्या नवकल्पना आणि उत्पादन क्षमता वाढवून आत्मनिर्भरता साध्य करणे. | |

स्रोत : PIB (Press Information Bureau.)


डेव्हलपमेंट, २९(९), १५६३-१५७६.

३. कुमार, आर. आणि तिवारी एस., (२०२१), आत्मनिर्भर भारत अंतर्गत MSMEs वर आर्थिक प्रोत्साहनांचा परिणाम, स्मॉल बिझनेस जर्नल ऑफ इंडिया, २८(१), ३७-४९.

४. गुप्ता, एन. आणि अग्रवाल पी., (२०१९), आत्मनिर्भर भारत आणि MSME वाढः उत्पादन क्षेत्रातील एक प्रकरण अध्ययन, इंडियन जर्नल ऑफ बिझनेस अँड इकॉनॉमिक पॉलिसी, ३१(३), २५-४०.

५. चौधरी, आर. आणि मोहंती पी., (२०१९), डिजिटल इंडिया आणि ग्रामीण सक्षमीकरणः डिजिटल विभागाचा पूल, ग्रामीण विकास आणि धोरण जर्नल, ३७ (२), ११२-१२८.

६. नेल्सन, आर. आर., आणि फेल्प्स, ई. एस. (१९६६), मानव संसाधनात गुंतवणूक, तंत्रज्ञानाचा प्रसार आणि आर्थिक वाढ, अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यू, ५६(१), ६९-७५.

७. बालकृष्णन, पी., (२०१०), भारतातील आर्थिक सुधारणा आणि वाढ, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

८. भट्टाचार्य, एस. आणि मित्रा, ए., (२०२०), स्किल इंडियाः भारतातील व्यावासिक प्रशिक्षणाचा रोजगारावर परिणाम, आंतरराष्ट्रीय व्यावासिक शिक्षण आणि प्रशिक्षण जर्नल, २२(४), ४५-६०.

९. भारत सरकार, (२०२०), डिजिटल इंडियाः सक्षम

करण्याचे सामर्थ्य, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय.

१०. भारत सरकार, (२०२०), डिजिटल इंडियाः भारताला रूपांतरित करण्यासाठी कार्यक्रम.

११. भारत सरकार, (२०२०), आर्थिक सर्वेक्षण २०१९-२०२०, वित्तमंत्रालय.

१२. राज, पी. आणि शर्मा ए., (२०२०), आर्थिक विकासात मानव संसाधनाची भूमिकाः एक अनुभवात्मक अध्ययन, इकॉनॉमिक्स आणि ह्युमन डेव्हलपमेंट जर्नल, ५६(१), ७३-८५.

१३. रोमर, पी. एम., (१९९०), आंतर्जात तंत्रज्ञान बदल, जर्नल ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी, ९८(५), S71-S102. https://doi.org/10.1086/261725

१४. वर्ल्ड बँक, (२०२०), वर्ल्ड डेव्हलपमेंट रिपोर्ट २०२०: ग्लोबल व्हॅल्यू चेनच्या युगात विकासासाठी व्यापार, वर्ल्ड बँक ग्रुप.

१५. वित्तमंत्रालय, भारत सरकार, (२०२१), आर्थिक सर्वेक्षण २०२०-२०२१, वित्तमंत्रालय, मिसरा, एस., (२०२१), आर्थिक उदारीकरण आणि GDP वाढः विकासशील देशांचा तुलनात्मक अभ्यास, जर्नल ऑफ डेव्हलपमेंट इकॉनॉमिक्स, ४५(३), १४-२९.

१६. शूंपेटर, जे. ए. (१९३४), आर्थिक विकासाचा सिद्धांतः नफा, भांडवल, क्रेडिट, व्याज, आणि व्यापार चक्रांची चौकशी, हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस,

१७. सिंग, ए. आणि कुमार व्ही., (२०१८), भारतातील स्किल इंडिया उपक्रमाचा रोजगार निर्मितीवर प्रभाव, इंडियन जर्नल ऑफ लेबर इकॉनॉमिक्स, ६१(४),

१८. सुब्रह्मण्यम, ए., (२०१८), ऑफ काउन्सलः मोदी-जेटली अर्थव्यवस्थेची आव्हाने, पेंग्विन इंडिया.

◆

''सोने हिच खरी संपत्ती आहे. बाकी सर्व केवळ उधारी आहे.''

- जे. पी. मॉर्गन

## निवेदन - अर्थसंवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना आवाहन करण्यात येते की, अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेल्या लेखांवर आपण ५० ते १०० शब्दांची आपली प्रतिक्रिया संपादकांकडे पाठवावी. याबरोबरच आपण अर्थशास्त्रीय विनोदी चुटकुले तसेच अर्थशास्त्रीय प्रबोधनात्मक लहान गोष्टी देखील पाठवू शकता. निवडक योग्य प्रतिक्रिया, अर्थशास्त्रीय विनोदांना व प्रबोधनात्मक अर्थशास्त्रीय गोष्टींना अर्थसंवाद मधून प्रसिद्धी देण्यात येईल.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# वर्धा जिल्ह्यातील निम्न आणि मध्यम वर्गातील कुटुंबाची बचत आणि गुंतवणुकीचा राहणीमानावर होणारा परिणाम

**योगेश पतिंगे** †
**अमोल पाटील** ††

**प्रस्तावना**

समाजातील व्यक्तीचे जीवनमान हे त्या व्यक्तीच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. बचत आणि गुंतवणूक हे आर्थिक स्थैर्य मिळवण्यासाठी आवश्यक घटक आहे. जे व्यक्ती अधिक प्रमाणात बचत करतात आणि त्यांची गुंतवणूक योग्य ठिकाणी करतात. त्यामुळे त्याचा जीवनमान सुधारते, तर कमी बचत आणि अस्थिर गुंतवणुकीमुळे जीवनमानावर प्रतिकूल परिणाम होतो. या संशोधनाचा उद्देश वर्धा जिल्ह्यातील नागरिकांच्या बचतीचे प्रमाण, त्यांच्या गुंतवणुकीचे स्वरूप आणि या घटकांचा त्यांच्या जीवनमानावर होणारा परिणाम अभ्यासणे आहे.

वर्धा जिल्हा हा मुख्यतः ग्रामीण भागाने व्यापलेला आहे, जिथे आर्थिक विकासाचा स्तर आणि लोकांचा जीवनमान सरासरीपेक्षा कमी आहे. अशा परिस्थितीत, बचत आणि गुंतवणुकीत योग्य संतुलन साधून स्थानिकांचे आर्थिक स्थैर्य सुधारता येईल. या संशोधनामध्ये वर्धा जिल्ह्यातील कुटुंबांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा सखोल अभ्यास करून बचत आणि गुंतवणुकीचा जीवनमानाशी असलेला संबंध तपासला जाणार आहे.

वर्धा जिल्हा हा ग्रामीण व अर्धशहरी स्वरूपाचा असल्यामुळे येथील कुटुंबांच्या अर्थकारणात विविध घटकांचा प्रभाव असतो. निम्न आणि मध्यम वर्गीय कुटुंबे त्यांच्या मर्यादित उत्पन्नातून बचत आणि गुंतवणुकीच्या पद्धतींचा अवलंब करतात, जे त्यांच्या राहणीमानावर थेट परिणाम करतात. अशा कुटुंबांमध्ये बचत ही प्रामुख्याने घरगुती गरजा, शैक्षणिक खर्च, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती आणि सामाजिक समारंभांसाठी केली जाते. गुंतवणुकीचे पर्याय सुरक्षित आणि पारंपरिक स्वरूपाचे असतात. जसे की, बँकेतील ठेवी, पोस्ट ऑफिस योजना व सोने खरेदी, महागाई, उत्पन्नाचे मर्यादित साधन आणि आर्थिक साक्षरतेचा अभाव यामुळे कुटुंबांच्या आर्थिक स्थितीत मर्यादा येतात. आर्थिक स्थैर्य आणि गुंतवणूक धोरणांचा अभाव राहणीमान सुधारण्यास अडथळा ठरतो. या अभ्यासाचा उद्देश कुटुंबांच्या बचती व गुंतवणुकीच्या पद्धतींचा व त्याचा राहणीमानावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे आहे. जेणेकरून आर्थिक धोरणे तयार करताना योग्य मार्गदर्शन मिळू शकेल.

† सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग, गो. से. वाणिज्य महाविद्यालय, वर्धा,जि. वर्धा.
आजीव सभासद क्र. २१३० भ्रमणध्वनी: ९८९०६०५५७८ ई-मेल: yogeshpatinge81@gmail.com
†† संशोधक विद्यार्थी, वाणिज्य विभाग, गो. से. वाणिज्य महाविद्यालय, वर्धा, जि. वर्धा.
आजीव सभासद क्र. २१२९ भ्रमणध्वनी: ७३५०९५५३८२ ई-मेल: amolpatil040995@gmail.com

**बचत आणि गुंतवणूक :**

एखाद्या व्यक्तीच्या खर्चापेक्षा अधिक असलेले उत्पन्न म्हणजे बचत असा सर्वसाधारण अर्थ आहे. उत्पन्नातून खर्च वजा जाता उर्वरित रक्कम (शिल्लक) म्हणजे बचत असे समजले जाते. व्यक्तिगत बचतीमधील बराचसा भाग गुंतवणूक म्हणून वापरला जाऊ शकतो. बचत का करावी? बचत म्हणजे आजच्या उपभोगाचा त्याग करून भविष्यासाठी केलेली तरतूद होय असाही अर्थ होतो.

बचत ही एक सवय म्हणूनही वित्तीय नियोजनासाठी उपयुक्त ठरते. याच बचतीतून गुंतवणूक निर्माण होते. भविष्यातील गरजांचे नियोजन करता येते, काही अत्यावश्यक/आकस्मिक खर्चासाठी तरतूद करता येते आणि संपत्तीमध्ये वृद्धी होण्यासाठीही बचतीचा उपयोग होतो. बचतीचे गुंतवणुकीत रूपांतर झाल्यास आर्थिक उद्दिष्ट्ये साध्य करणे सोपे जाते. भाववाढीचा परिणाम वाढत्या किंमतीमुळे गुंतवणुकीचे मूल्य घसरू शकते. म्हणजे जरी व्याज/लाभांश या माध्यमातून परतावा मिळाला तरी तो महागाईच्या तुलनेत कमी असेल, तर गुंतवणुकीच्या मूल्यात घसरण झाल्याचेच लक्षात येते. उदा. बँकेमध्ये एका व्यक्तीचे दहा लाख रुपये डिपॉझिट आहे, त्या व्यक्तीला प्रचलित दराप्रमाणे दरवर्षी रुपये नौव्वद हजार व्याज अपेक्षित आहे. परंतु भाववाढीचा दर जर दहा टक्के असेल, तर मिळणारे व्याज हे वाढत्या खर्चामुळे ते अपुरे वाटेल, शिवाय भाववाढीमुळे दहा लाख रुपये या मूल्याचे गेल्यावर्षीपेक्षा एक वर्षानंतर मूल्य घसरेल, ती गोष्ट वेगळीच आहे. गुंतवणुकीच्या पारंपरिक पर्यायांमध्ये दुर्दैवाने भाववाढीचा फटका सहन करण्याची क्षमता कमी असल्याचे दिसते. त्यामुळेच अलीकडच्या काळात रिअल इस्टेट, बॉँड्सय, शेअर्स, यासारख्या हस्तांतरणीय पर्यायांचा विचार गुंतवणूकदारांकडून केला जात आहे. गुंतवणूक प्रत्येकाच्या लेखी गुंतवणुकीचा अर्थ वेगवेगळा असू शकतो. उदा. सोन्यामध्ये केलेली गुंतवणूक एखाद्या गुंतवणूकदारासाठी मुलीच्या लग्नाची तरतूद असू शकेल, तर दुसऱ्यासाठी सोन्याचे भाव वाढल्यानंतर त्यातून नफा कमविण्याची संधीसुद्धा असू शकेल. गुंतवणूक केली जाते, तेव्हा गुंतवणूकदार भांडवलवृद्धी, सुरक्षितता, भाववाढीवर मात, कर बचत या उद्दिष्टांचा प्रामुख्याने विचार करतो. याबरोबरच काही अल्पकालीन व काही दीर्घकालीन उद्दिष्टांचा विचारही गुंतवणूक करताना केला जातो. बचतीच्या माध्यमातून गुंतवणूक केली जाते, तेव्हा व्यावहारिक, काळजीपूर्वक तसेच कालसुसंगत अशा गुंतवणुकीच्या पर्यायांचा विचार करणे अपरिहार्य असते.

**राहणीमान :** राहणीमान म्हणजे एखाद्या व्यक्ती किंवा कुटुंबाची आर्थिक स्थिती आणि जीवनमानाचे प्रतिनिधित्व करणारे एक मोजमाप होय. हे एका व्यक्ती किंवा कुटुंबाच्या उत्पन्न, खर्च, मालमत्ता आणि सेवांवर आधारित असते.

राहणीमानाचे अनेक घटक आहेत, ज्यात पुढीलप्रमाणे समाविष्ट आहे :

**उत्पन्न :** व्यक्ती किंवा कुटुंबाचे उत्पन्न त्यांच्या राहणीमानाचे एक महत्त्वाचे सूचक आहे. उच्च उत्पन्न असलेले लोक सहसा चांगले राहणीमान जगू शकतात.

**खर्च :** व्यक्ती किंवा कुटुंबाचे खर्च त्यांच्या राहणीमानावरदेखील परिणाम करतात. उच्च खर्च असलेले लोक कमी बचत किंवा गुंतवणूक करू शकतात.

**मालमत्ता :** व्यक्ती किंवा कुटुंबाची मालमत्ता, जसे की घर, कार किंवा इतर संपत्ती, त्यांच्या राहणीमानाचे प्रतिनिधित्व करते.

**सेवा :** व्यक्ती किंवा कुटुंबाला उपलब्ध असलेल्या सेवा, जसे की शिक्षण, आरोग्यसेवा आणि वाहतूकदेखील त्यांच्या राहणीमानावर परिणाम करतात.

राहणीमानाचे मोजमाप करण्यासाठी अनेक पद्धती आहेत. एक सामान्य पद्धत म्हणजे व्यक्ती किंवा कुटुंबाच्या खर्चाच्या पातळीचे मूल्यांकन करणे. दुसरी पद्धत म्हणजे व्यक्ती किंवा कुटुंबाच्या मालमत्तेचे मूल्यांकन करणे. तिसरी पद्धत म्हणजे व्यक्ती किंवा

कुटुंबाला उपलब्ध असलेल्या सेवांचे मूल्यांकन करणे. भारतात राहणीमानाचे मोजमाप करण्यासाठी अनेक सरकारी आणि खाजगी संस्था कार्यरत आहेत. या संस्था विविध पद्धतींचा वापर करून भारतातील राहणीमानाचे मूल्यांकन करतात. राहणीमान हे एक महत्त्वाचे आर्थिक सूचक आहे. हे व्यक्ती किंवा कुटुंबाच्या आर्थिक स्थितीचे प्रतिनिधित्व करते आणि त्यांचे जीवनमान ठरवते.

**संशोधनाचे पुनरावलोकन**

S. C. Das & V. Kumar, (2016). Discretionary Savings and Investment Behaviour of Middle-Class Households in India: Empirical Evidence मध्यवर्गीय कुटुंबांच्या बचत आणि गुंतवणूक वर्तनावरील या संशोधनात असे आढळले की, 'रोजगाराचा प्रकार' आणि 'मासिक उत्पन्न' यांचा 'बचत वर्तन' वर महत्त्वपूर्ण प्रभाव नाही. तथापि, 'गुंतवणूक वर्तन' फक्त 'मासिक उत्पन्न' या घटकाने प्रभावित होते. पूर्वीच्या अभ्यासांमध्ये, वैयक्तिक गुणधर्म आणि लोकसंख्याशास्त्रीय घटक गुंतवणूक निर्णयांवर प्रभाव टाकतात असे दिसून आले आहे. उदाहरणार्थ, रझा (२०१४) यांच्या केस स्टडीमध्ये गुंतवणूकदारांच्या धारणा त्यांच्या आर्थिक निर्णयांवर महत्त्वपूर्ण प्रभाव टाकतात असे सूचित केले आहे आणि लक्ष्मी (२०१३) यांच्या अभ्यासानुसार, लिंग, वय आणि मित्रांचा गुंतवणूक निर्णयांवर अधिक प्रभाव आहे. (२०११) यांच्या संशोधनानुसार, वय आणि मालमत्तेचा बचतीवर मोठा प्रभाव नाही, तर उत्पन्न, व्यवसाय आणि खर्चाचा महत्त्वपूर्ण प्रभाव आहे. या निष्कर्षांवरून असे दिसते की, मध्यवर्गीय कुटुंबांच्या बचत आणि गुंतवणूक वर्तनावर विविध घटकांचा प्रभाव असतो, ज्यामुळे त्यांच्या आर्थिक कल्याणावर परिणाम होतो.

Miss. Minakshi Pandurang Kharkar (2004). "A Study on Saving and Investment Pattern of Salaried Peoples with Reference to Wardha City" संशोधनातून असे दिसून येते की, बचत आणि गुंतवणुकीच्या सवयी कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्यावर आणि राहणीमानावर थेट परिणाम करतात. सुरक्षित भविष्यासाठी बचतीचा महत्त्वाचा वाटा असून, योग्य गुंतवणुकीमुळे आर्थिक वृद्धी होऊ शकते. परंतु, अनेक कुटुंबे अल्प उत्पन्नामुळे आणि गुंतवणूक संकल्पनांवरील मर्यादित माहितीमुळे पारंपरिक किंवा अल्पजोखमीच्या पर्यायांकडे वळतात. यामुळे गुंतवणुकीच्या संधींबाबत जागरूकता वाढवणे, वित्तीय साक्षरता सुधारणे आणि विविध गुंतवणूक साधनांविषयी माहिती देणे आवश्यक आहे. या अभ्यासाचा उद्देश वित्तीय नियोजनाच्या माध्यमातून कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षेला चालना देणे आणि त्याचा राहणीमानावर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेणे हा आहे.

D. Dhawan, & Mehta, S. K. Mehta, (2019). Saving and Investment Pattern: Assessment and Prospects. आर्थिक साक्षरतेचा अभाव आणि सुरक्षित गुंतवणुकीची मानसिकता यामुळे बहुतांश कुटुंबे अल्पजोखमीच्या पर्यायांकडे वळतात. गुंतवणुकीच्या दीर्घकालीन वित्तीय नियोजनासाठी लोकांना संधीबाबत जागरूक करणे आवश्यक आहे. संधीबाबत योग्य वित्तीय निर्णय आणि संतुलित गुंतवणूक धोरणामुळे आर्थिक समृद्धी साधता येऊ शकते.

**संशोधन पद्धती** (Research Methodology)

**संशोधनाचे उद्देश**

- वर्धा जिल्ह्यातील निम्न आणि मध्यम वर्गातील कुटुंबांचा बचत दर आणि गुंतवणुकीच्या पद्धतींचा अभ्यास करणे.
- बचत आणि गुंतवणुकीच्या विविध स्वरूपांचा कुटुंबांच्या राहणीमानावर होणारा परिणाम विश्लेषित करणे.
- बचत आणि गुंतवणुकीच्या पद्धतींमध्ये असलेल्या फरकांचा कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्यावर कसा प्रभाव पडतो, हे समजून घेणे.

**संशोधनाचे परिकल्पना**

H0 वर्धा जिल्ह्यातील निम्न आणि मध्यम वर्गातील कुटुंबांमध्ये बचत दर कमी असल्यास, त्यांच्या राहणीमानावर नकारात्मक परिणाम होतो.

H1 वर्धा जिल्ह्यातील निम्न आणि मध्यम वर्गातील कुटुंबांमध्ये बचत दर कमी असल्यास, त्यांच्या राहणीमानावर सकारात्मक परिणाम होतो.

H0 नियमित आणि योग्य गुंतवणुकीमुळे कुटुंबांचे आर्थिक स्थैर्य वाढू शकते, ज्यामुळे त्यांच्या राहणीमानात सुधारणा होऊ शकते.

H1 नियमित आणि योग्य गुंतवणुकीमुळे कुटुंबांचे आर्थिक स्थैर्य वाढू शकते, ज्यामुळे त्यांच्या राहणीमानात सुधारणा होऊ शकत नाही.

H0 बचत आणि गुंतवणुकीच्या पद्धतींबद्दल जागरूकता आणि शिक्षणाच्या अभावामुळे कुटुंबांचे आर्थिक नियोजन प्रभावीपणे होत नाही, ज्याचा त्यांच्या जीवनशैलीवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

H1 बचत आणि गुंतवणुकीच्या पद्धतींबद्दल जागरूकता आणि शिक्षणाच्या अभावामुळे कुटुंबांचे आर्थिक नियोजन प्रभावीपणे होत असते, ज्याचा त्यांच्या जीवनशैलीवर अनुकूल परिणाम होऊ शकतो.

**संशोधनाच्या मर्यादा**

• संशोधनाचा विषय वर्धा जिल्ह्यातील मध्यमवर्गीय मध्यमवर्गीय कुटुंबाच्या उत्पन्न गटातील बचत दर व गुंतवणुकीच्या सवयीच्या पद्धतीचा मूल्यमापनात्मक अभ्यास व त्याचा राहणीमानावर होणारा परिणाम हा असला तरी वर्धा जिल्ह्यात एकूण आठ तालुके संशोधनाच्या व्याप्तीक्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहे.

• या अभ्यास क्षेत्रात निम्न व मध्यमवर्गीय कुटुंबाचाच विचार केला जाणार आहे व त्यांच्या उत्पन्न, गुंतवणूक आणि बचत व त्यांचा राहणीमानावर काय परिणाम होईल हे यामध्ये दर्शविण्यात येणार आहे.

• या विषयामध्ये फक्त १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीचा विचार केला जाईल.

**नमुना आणि नमुना आकार**

या अभ्यासामध्ये, निवडलेल्या चलांवर आधारित माहिती गोळा करण्यासाठी वर्धा जिल्ह्यातील निम्न व मध्यम वर्गातील कुटुंबाचे एक सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये वर्धा जिल्ह्यातील आठही तालुक्यांचा विचार करून एकूण ९६ कुटुंबांची माहिती ही सर्वेक्षणाने गोळा करण्यात आली. ही सर्व माहिती १ एप्रिल २०२३ पासून ३१ मार्च २०१४ या कालावधीशी संबंधित असून एका गुगल फार्मच्या माध्यमाने गोळा केली. नमुन्याचा आकार निश्चित करताना, या अभ्यासाशी संबंधित आधीच्या अभ्यासांमध्ये नमूद केलेल्या नमुना आकारांचा आढावा घेण्यात आला.

हा संशोधन अभ्यास मुख्यतः प्राथमिक माहितीवर (Primary Data) आधारित आहे. प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी व्यवस्थित संरचित प्रश्नावली (well-structured questionnaire) तयार करण्यात आली. संशोधकांनी सर्व निर्दिष्ट चलांचा समावेश करून प्रश्नावली डिझाइन केली. उत्तरदात्यांना प्रत्येक मुद्दयासाठी आपले सहमतीचे स्तर पाच-बिंदूंच्या श्रेणीवर दर्शविण्यास सांगितले, जिथे१-पूर्णपणे असहमत (Strongly Disagree) आणि ५ -पूर्णपणे सहमत (Strongly Agree) होते. पाच-बिंदूंच्या Likert Scale चा वापर वर्धा जिल्हातील निम्न आणि मध्यम वर्गातील कुटुंबाचा बचत दर आणि गुंतवणुकीचा याचे मोजमाप करण्यात आले. राहणीमानावर होणारा परिणाम होणार मोजमापासाठी, पाच-बिंदूच्या Likert Scale चा वापर 'पूर्णपणे असमाधानी (Strongly Dissatisfied)' ते 'पूर्णपणे समाधानी (Strongly Satisfied)' या पाच-बिंदूच्या स्केलचा वापर करण्यात आला.

**माहितीचे संकलन** (Data Collection)

**तक्ता क्र. १ : प्रतिसादकर्त्यांचे लोकसंख्याशास्त्रीय माहिती**

| प्रकार | निवड | प्रतिसाद देणाऱ्याची संख्या | टक्केवारी % |
|---|---|---|---|
| लिंग / Gender | पुरुष | ५६ | ५८.३३ |
| | स्त्री | ४० | ४१.६७ |
| वय / Age | १८-२५ | ३० | ३१.२५ |
| | २६-३२ | १४ | १४.५८ |
| | ३३- ४० | १० | १०.४१ |
| | ४०-४८ | २६ | २७.०९ |
| | ४८ पेक्षा जास्त | १६ | १६.६७ |
| शिक्षण/ Education | अशिक्षित | ३ | ३.१३ |
| | प्राथमिक | ११ | ११.४५ |
| | माध्यमिक | २१ | २१.८७ |
| | उच्च माध्यमिक | १९ | १९.८० |
| | पदवी | १८ | १८.७५ |
| | पदव्युत्तर | १८ | १८.७५ |
| | व्यावसायिक शिक्षण | ६ | ६.२५ |
| व्यवसाय | शेती | ३६ | ३७.५ |
| | नोकरी | २० | २०.८३ |
| | व्यवसाय | ११ | ११.४५ |
| | पेशा | २ | २.०९ |
| | इतर | २७ | २८.१३ |
| तालुका/ Taluka | वर्धा | १९ | १९.७९ |
| | सेलू | १२ | १२.५ |
| | आर्वी | १० | १०.४२ |
| | कारंजा | ८ | ८.३३ |
| | आष्टी | १४ | १४.५८ |
| | हिंगणघाट | १० | १०.४२ |
| | समुद्रपूर | ११ | ११.४६ |
| | देवळी | १२ | १२.५ |
| तुमच्या मते तुमचे कुटुंब कोणत्या सामाजिक-आर्थिक वर्गातील आहे. | निम्न वर्ग | १३ | १३.५४ |
| | मध्यम वर्ग | ६७ | ६९.७९ |
| | उच्च मध्यमवर्ग | १६ | १६.६७ |
| तुमच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अंदाजे किती आहे | ०-५०००० | ४८ | ५० |
| | ५००००-२५०००० | २४ | २५ |
| | २५००००-५००००० | १२ | १२.५ |
| | ५०००००-१०,००.००० | १२ | १२.५ |

तक्ता क्र. १ वरून असे दिसून येते की, उत्तरदात्यांमध्ये पुरुषांचे प्रमाण जास्त आहे. सर्वेक्षणामध्ये पुरुषांचा सहभाग ५८.३३% तर स्त्रियांचे प्रमाण ४१.६७% इतके आहे. यावरून असे दिसते की, सर्वाधिक उत्तरदाते १८-२५ वर्षे ३१.२५% वयोगटातील आहेत, त्यानंतर २६-३२ या वयोगटात १४.५८%, ३३-४० या वयोगटात १०.४१%, ४१-४८ वयोगट २७.०९% आणि ४८ पेक्षा जास्त या वयोगटात १६.६७% इतकी उत्तरदात्यांची संख्या आहे. शिक्षणाच्या पातळीवरून असे दिसून येते की, सर्वाधिक उत्तरदाते माध्यमिक शिक्षण घेतलेले २१.८७% इतके आहे त्यानंतर उच्च माध्यमिक, पदवी व पदव्युत्तर शिक्षण अनुकमे १९.८०%,१८.७५%,१८.७५% याप्रमाणे आहे. प्राथमिक शिक्षण घेणाऱ्यांची संख्या ११.४५% इतकी आहे, तर व्यावसायिक शिक्षण ६.२५% आणि अशिक्षित वर्गाची संख्या ३.१३% इतकी आहे. उत्तरदात्यांमध्ये सर्वाधिक लोक शेती व्यवसायाशी संबंधित आहेत, ते ३७.५% इतके आहे. नोकरी करणारे उत्तरदाते २०.८३%, इतर व्यवसाय करणारे २८.१३%, तर फक्त २.०९% लोक व्यावसायिक पेशाशी संबंधित आहेत. प्रतिसाद देणाऱ्यांमध्ये वर्धा जिल्ह्यातील सर्वात जास्त १९.७९% लोक आहे, तर त्या खालोखाल आष्टी तालुक्यातून १४.५८% लोक आहे. त्यानंतर सेलू आणि देवळी तालुक्यातील १२.५ प्रतिसादकर्ता आहे. समुद्रपूर तालुक्यातील ११.४६% प्रतिसाद मिळाला आहे, तर आर्वी आणि हिंगणघाट या दोन्ही तालुक्यांमधून १०.४२% इतका प्रतिसाद मिळाला आहे. सर्वात कमी प्रतिसाद हा कारंजा तालुक्यातून मिळाला आहे जो की ८.३३% इतका आहे. प्रतिसाद देणाऱ्यांपैकी जवळपास ७०% लोक हे मध्यम वर्गात मोडतात. त्यानंतर १६.६७% टक्के लोक हे उच्च-मध्यमवर्गात तर १३.५४% लोक हे निम्न वर्गात येतात. वार्षिक उत्पन्नाच्याबाबतीत बोलायचे झाले, तर वार्षिक उत्पन्नगटामध्ये, ०-५०,००० उत्पन्न असलेल्या उत्तरदात्यांची संख्या सर्वाधिक ५०% आहे. ५०,०००-२,५०,००० या गटातील २५%, तर २,५०,०००-५,००,००० या गटातील फक्त १२.५% आहेत. तर ५,००,०००-१०,००,००० या गटात १२.५% आहेत.

तक्ता क्र. २ वरून असे दिसून येते की, वर्धा जिल्ह्यातील सर्व आठही तालुक्यांतून मिळालेल्या सर्व उत्तरदात्याने दिलेल्या प्रतिसादावरून बचत व गुंतवणूक आणि त्याचा राहणीमानावर होणारा परिणाम सरासरीमध्ये दर्शविला आहे. त्यात एकूण १३६ व्यक्तींनी प्रतिसाद दिलेला आहे. उत्तरदात्याकडून माहिती गोळा करण्यासाठी व्यवस्थित संरचित प्रश्नावली (well-structured questionnaire) तयार करण्यात आली. संशोधकांनी सर्व निर्दिष्ट चलांचा समावेश करून प्रश्नावली डिझाइन केली. उत्तरदात्यांना प्रत्येक मुद्दयासाठी आपले सहमतीचे स्तर पाच-बिंदूंच्या श्रेणीवर दर्शविण्यास सांगितले, जिथे १-पूर्णपणे असहमत (Strongly Disagree) आणि ५ -पूर्णपणे सहमत (Strongly Agree) होते. पाच-बिंदूंच्या Likert Scale चा वापर वर्धा जिल्हातील निम्न आणि मध्यम वर्गातील कुटुंबाचा बचत दर आणि गुंतवणुकीचा याचे मोजमाप करण्यात आले. राहणीमानावर होणारा परिणाम होणार मोजमापासाठी, पाच-बिंदूंच्या Likert Scale चा वापर १- 'पूर्णपणे असमाधानी (Strongly Dissatisfied)' ते ५-'पूर्णपणे समाधानी (Strongly Satisfied)' या पाच-बिंदूंच्या स्केलचा वापर करण्यात आला. त्यानंतर त्या सर्व अंकाची सरासरी काढण्यात आली व ती सरासरी वरील तक्तामध्ये दर्शविली आहे आणि त्याचा उपयोग निष्कर्ष काठण्यासाठी केला गेला तो निष्कर्ष पुढे दिला आहे.

तक्ता क्र. २: बचत व गुंतवणूक आणि राहणीमानांवर होणारा परिणाम (सरासरीमध्ये )

| बचत आणि गुंतवणूक | राहणीमानावर होणारा परिणाम (सरासरी) | बचत आणि गुंतवणूक (सरासरी) | राहणीमानावर होणारा परिणाम (सरासरी) |
|---|---|---|---|
| १.८० | ३.०० | २.०० | ४.०० |
| १.८० | २.०० | २.०० | २.०० |
| ३.०० | २.६७ | १.८० | २.६७ |
| १.२० | २.३३ | २.८० | ३.०० |
| २.४० | २.०० | २.४० | २.६७ |
| ३.०० | २.३३ | ३.२० | २.६७ |
| २.०० | १.६७ | २.२० | ३.३३ |
| २.२० | ३.३३ | २.२० | २.०० |
| २.२० | १.६७ | २.०० | २.०० |
| १.८० | २.०० | २.०० | २.०० |
| १.०० | १.०० | ३.०० | २.०० |
| २.६० | २.०० | २.८० | १.०० |
| २.४० | २.०० | २.८० | ३.०० |
| २.०० | २.६७ | २.८० | २.०० |
| २.४० | २.०० | २.२० | २.०० |
| २.२० | २.३३ | २.४० | २.०० |
| २.०० | २.६७ | १.८० | १.६७ |
| १.६० | २.६७ | २.४० | २.०० |
| २.४० | १.६७ | २.०० | २.०० |
| २.६० | २.०० | २.६० | २.३३ |
| २.०० | २.६७ | २.८० | २.६७ |
| २.०० | २.६७ | २.४० | २.६७ |
| २.०० | २.०० | २.४० | २.०० |
| २.२० | २.६७ | १.६० | १.६७ |
| २.२० | २.६७ | २.४० | २.०० |
| १.८० | २.०० | २.६० | २.०० |
| २.२० | २.६७ | २.०० | २.०० |
| २.६० | ३.३३ | ३.६० | २.०० |
| २.६० | २.३३ | २.६० | १.६७ |
| ३.०० | २.०० | २.८० | ३.३३ |
| २.४० | २.६७ | २.२० | ३.३३ |
| २.६० | २.३३ | २.४० | ३.०० |
| २.०० | २.०० | २.०० | २.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| २.४० | ३.३३ | २.४० | २.६७ |
| २.६० | ३.०० | २.०० | २.६७ |
| ३.०० | २.६७ | २.६० | २.६७ |
| २.४० | २.६७ | २.६० | ३.३३ |
| २.४० | २.३३ | १.६० | २.६७ |
| २.६० | २.०० | २.०० | २.६७ |
| २.४० | २.०० | १.६० | २.०० |
| २.२० | २.६७ | ३.२० | ३.३३ |
| २.०० | ३.०० | १.४० | १.३३ |
| ३.०० | २.६७ | २.८० | २.६७ |
| १.६० | १.६७ | २.६० | २.३३ |
| २.०० | २.०० | २.६० | २.३३ |
| १.८० | २.६७ | ३.४० | ४.०० |
| २.८० | २.६७ | २.६० | ३.३३ |
| २.४० | २.६७ | १.६० | १.६७ |
| २.०० | २.३३ | २.६० | २.०० |
| २.०० | २.६७ | ३.४० | १.०० |

N= 96 N= 96

| Regression Statistics | |
|---|---|
| Multpile R | 0.071691 |
| R Square | 0.00514 |
| Adjusted R Square | -0.00228 |
| Standard Error | 0.580068 |
| Observations | 96 |

Regression विश्लेषणाचे स्पष्टीकरण:

Regression आकडेवारी:

Multpile R (०.२७३५):

Multpile R हा स्वतंत्र व अवलंबून असलेल्या चलांमधील सहसंबंध Correlation दर्शवतो.०.२७३५ हा मूल्यसामान्य सकारात्मक सहसंबंध दर्शवतो, 'बचत' आणि गुंतवणूक वाढल्यावर त्याचा 'राहणीमानवर होणारा परिणाम' थोड्याशा प्रमाणात सुधारतो.

R Square (0.0748):

R Square हे अवलंबून असलेल्या चलामध्ये 'बचत आणि गुंतवणूकने स्पष्ट केलेल्या बदलाचे प्रमाण दर्शवते.

येथे केवळ ०.०७४८ बदल 'बचत व गुंतवणूक' राहणीमानावर परिणाम करतात. म्हणजेच इतर अनेक

| ANOVA | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | df | SS | MS | F | Significance F |
| Regression | 1 | 2.255185 | 2.255185 | 7.602869 | 0.007002 |
| Residual | 94 | 27.88255 | 0.296623 | | |
| Total | 95 | 30.13773 | | | |

| | **Coeffici-ents** | **Standard Error** | **t Stat** | **P-value** | **Lower 95%** | **Upper 95%** | **Lower 95.0%** | **Upper 95.0%** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Intercept | 1.636883 | 0.282039 | 5.803739 | 8.72E-08 | 1.076887 | 2.196879 | 1.076887 | 2.196879 |
| बचत आणि गुंतवणूक | 0.329993 | 0.119679 | 2.75733 | 0.007002 | 0.092369 | 0.567618 | 0.092369 | 0.567618 |

घटकामुळे स्पष्ट होते.

Adjusted R Square (-0.002):

Adjusted R Square हे एकाच वेळी अनेक स्वतंत्र चलांचा विचार करून R Square ची अचूकता सुधारते. येथे

-०.००२ हे कमी मूल्य सूचित करते की, नवीन चलांचा समावेश केल्याने मॉडेल फारसा सुधारत नाही.

Standard Error (0.5446):

हा मॉडेलच्या अचूकतेचा मोजमाप आहे. येथे मानक त्रुटी (standard Error) मोठी आहे, म्हणजे मॉडेलचा अंदाज थोडासा चुकीचा ठरू शकतो.

Observations (96):

एकूण ९६ लोकांची माहिती वापरण्यात आले आहेत.

ANOVA टेबल:

Regression (SS = 2.2552):

'बचत आणि गुंतवणूकमुळे स्पष्ट होणारा माहिती

Residual (SS = 27.8825):

मॉडेलने स्पष्ट न केलेला डेटा बदल.

F-statistic (7.6029, p-value = 0.0070):

F-Test हे तपासते की संपूर्ण मॉडेल सांख्यिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे का?

Significance F (p-value = 0.0070):ही किंमत ०.०५ पेक्षा कमी असल्याने, मॉडेल ९५% विश्वासार्हतेने सांख्यिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे.

Coefficients टेबल:

Intercet (1.6369):

जेव्हा 'बचत आणि गुंतवणूक' शून्य असेल, तेव्हा 'राहणीमानाचा परिणाम' सरासरी १.६३६९असेल.

हा आधाररेषेचा (Baseline) मान आहे.

बचत आणि गुंतवणूक Coefficient (०.३३००):

'बचत आणि गुंतवणूक' मध्ये प्रत्येक एकक वाढ झाल्यास, राहणीमानाचा परिणाम सरासरी ०.३३ ने सुधारतो. हा सकारात्मक संबंध दर्शवतो.

Standard Error (0.1197):

Coefficient च्या अचूकतेचे मोजमाप. इथे त्रुटी लहान असल्याने Coefficient चा अंदाज अधिक अचूक आहे.

T-Statistic (2.7573) आणि p-value (0.0070):

T-Test तपासते की Coefficient शून्याहून वेगळा आहे.

P-value 0.05 पेक्षा कमी असल्याने, 'बचत आणि गुंतवणूक' आणि 'राहणीमानावर होणारा परिणाम'

याच्यातील संबंध सांख्यिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे.

Confidence Interval (Lower 95%,

Upper 95%):

Coefficient ची खरी किंमत ९५% विश्वासार्हतेने ०.०९२४ ते ०.५६७६ यामध्ये आहे.

**मुख्य विश्लेषण व निष्कर्ष:**

**संबंध व महत्त्व:**

'बचत आणि गुंतवणूक' आणि 'राहणीमानावर होणारा परिणाम' यांच्यात सकारात्मक आणि सांख्यिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण संबंध आहे. मात्र प्रभाव लहान (Coefficient = 0.33) आहे.

मॉडेलचे सुसंगतता (Fit):

हे मॉडेल फक्त ७.४८% बदल स्पष्ट करते, म्हणजे राहणीमानावर परिणाम करणारे इतरही महत्त्वाचे घटक असू शकतात.

**व्यवहार्य उपयोग:**

'बचत आणि गुंतवणूक' वाढविल्याने राहणीमान सुधारू शकते, परंतु याचा परिणाम मर्यादित आहे. इतर घटकांचा विचार करणे गरजेचे आहे

**निष्कर्ष :**

संशोधनातून असे दिसून आले की, वर्धा जिल्ह्यातील निम्न आणि मध्यम वर्गातील कुटुंबांचा बचत दर अपेक्षित पातळीवर नाही. अनेक कुटुंबे आपल्या उत्पन्नाचा मोठा भाग दैनंदिन गरजा पूर्ण करण्यात खर्च करतात, ज्यामुळे त्यांच्याकडे बचत करण्यासाठी फारसे पैसे शिल्लक राहात नाहीत. निम्न व मध्यम कुटुंबांमध्ये गुंतवणुकीच्या पद्धती मर्यादित आहेत. बहुतेक कुटुंबे सोनं, जमीन, इमारती इत्यादी भौतिक संपत्तीत गुंतवणूक करण्यास प्राधान्य देतात. शेअर बाजार, म्युच्युअल फंड्स इत्यादी आधुनिक गुंतवणुकीच्या साधनांबद्दल या कुटुंबांची जागरूकता कमी आहे.

**राहणीमानावर परिणाम :** कमी बचत आणि अपुऱ्या गुंतवणुकीमुळे या कुटुंबांच्या राहणीमानावर नकारात्मक परिणाम होत आहे. अनपेक्षित खर्चासाठी त्यांच्याकडे पुरेसा निधी नसतो, ज्यामुळे त्यांना कर्ज घ्यावे लागते. परिणामी, त्यांच्यावर कर्जाचे ओझे वाढते. नियमित आणि योग्य प्रकारे गुंतवणूक करून कुटुंबे आपले आर्थिक स्थैर्य वाढवू शकतात. परंतु, बचत आणि गुंतवणुकीच्या पद्धतींबद्दल पुरेशी माहिती नसल्यामुळे अनेक कुटुंबे योग्य प्रकारे गुंतवणूक करू शकत नाहीत. या कुटुंबांमध्ये बचत आणि गुंतवणुकीच्या पद्धतींबद्दल जागरूकता आणि शिक्षणाचा अभाव दिसून येतो. त्यामुळे ते आर्थिक नियोजन प्रभावीपणे करू शकत नाहीत.

वरील निष्कर्षांवरून असे स्पष्ट होते की, वर्धा जिल्ह्यातील निम्न आणि मध्यम वर्गातील कुटुंबांना बचत आणि गुंतवणुकीचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. त्यांना विविध गुंतवणुकीच्या पर्यायांबद्दल माहिती देऊन त्यांना योग्य निर्णय घेण्यास मदत करणे आवश्यक आहे. शासन आणि बँकांनी या कुटुंबांसाठी बचत आणि गुंतवणुकीच्या योजना राबवाव्यात. याशिवाय, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये आर्थिक साक्षरतेचे शिक्षण देणे गरजेचे आहे.


आकृती क्र. १ वरून बचत व गुंतवणूक आणि त्याचा राहणीमानावर होणारा परिणाम आणखी स्पष्ट करण्यात येतो.

आकृतीमध्ये बचत आणि गुंतवणूक व त्याचा राहणीमानावर होणारा परिणाम यांच्यातील संबंध दर्शवला आहे. यात खालील घटक दिसत आहेत.

१. X-अक्ष (Independent Variable) बचत आणि गुंतवणूक आहे. X-अक्षावर कुटुंबांनी केलेल्या बचतीचे व गुंतवणुकीचे मूल्य दर्शवले आहे.

२. Y-अक्ष (Dependent Variable) राहणीमानावर होणारा परिणाम दर्शविला आहे. Y-अक्षावर राहणीमानात होणाऱ्या बदलांचे परिणाम दाखवले आहे. उदा. चांगले शिक्षण, आरोग्य सुविधा, जीवनशैली सुधारणा इ.

आकृती क्रमांक १




३. माहितीपाईड्स (Blue Diamonds)

निळे हिरे प्रत्येक निरीक्षणाचे मूल्य दर्शवितात, जिथे बचत गुंतवणूकीचे मूल्य व त्याचा राहणीमानावर झालेला परिणाम दाखविला आहे.

४. अंदाजे रेखा Prediction Line (Orange Line)

केशरी रंगाची रेषा ही अंदाज रेखा "Predicted" म्हणजे भविष्यवाणी केलेल्या परिणामांची रेषा आहे. ती बचत आणि गुंतवणुकीच्या आधारावर राहणीमानावर होणाऱ्या सरासरी परिणामाचे गणितीय मॉडेल दर्शवते.

५. संबंध (Trend) प्लॉटवरून असे दिसते की, बचत आणि गुंतवणूक वाढल्यास राहणीमानावर सकारात्मक परिणाम होतो. रेषा सरळ असल्याने हा संबंधरेखीय संबध (Linear Relationship) असल्याचे दिसते.

यावरून असा निकर्ष निघतो की, बचत व गुंतवणूक वाढल्यास राहणीमानावर सकारात्मक परिणाम होतो.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. Alessie, R., Lusardi, A., & Aldershof, T. (1997). Income and wealthover the life cycle: Evidence from panel data.
2. Aparna Samudra, Dr. M. A. Burghate. (2012). Determinants and Motivation for Savings & investment of Middle-Class income Households in Nagpur
3. D. Dhawan, & Mehta, S. K. Mehta, (2019). Saving and Investment Pattern: Assessment and Prospects.
4. Miss. Minakshi Pandurang Kharkar (2004). "A Study on Saving and Investment Pattern of Salaried Peoples with Reference to Wardha City"
5. R. Sree Priya, R. S., & P. Gurusamy, P. G. (2012). Investment Pattern of Salaried People -A Study in Coimbatore District.
6. S. C. Das, & V. Kumar, (2016). Discretionary Savings and Investment Behaviour of Middle-Class Households in India: Empirical Evidence


◆

# मराठी अर्थशास्त्र परिषद ४७ वे वार्षिक अधिवेशन : २०२४-२५ कार्यवाहांचा अहवाल

**मारोती वि. तेगमपुरे** †

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४७ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन दि. ३०,३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२५ यातीन दिवसांच्या कालावधीत दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे अतिशय आनंदमय वातावरणात यशस्वीररीत्या संपन्न झाले. प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे हे अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी होते.

**अधिवेशन उद्घाटन सोहळा :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन गुरुवार, दिनांक ३० जानेवारी २०२५ रोजी दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे महामानवांच्या प्रतिमेला वंदन करून व दीपप्रज्वलनाने झाले. उद्घाटक म्हणून माजी मंत्री आ.मा.अमित देशमुख हे होते. यावेळी मंचावर पद्मविभूषण लॉर्ड मेघनाद देसाई यांची उपस्थिती (ऑनलाईन) होती. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी (अध्यक्ष - दयानंद शिक्षण संस्था,लातूर.), रमेश बियाणी (सचिव - दयानंद शिक्षण संस्था, लातूर.), मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे, कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम, कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे, अर्थसंवादचे संपादक डॉ. राहुल म्होपरे, ४७ व्या वार्षिक अधिवेशनाचे स्थानिक कार्याध्यक्ष डॉ. शिवाजी गायकवाड (प्राचार्य- दयानंद कला महाविद्यालय, लातूर), स्थानिक कार्यवाह डॉ. बालाजी घुटे, परिषदेचे मावळते अध्यक्ष प्रा.डॉ. दिलीप अर्जुने यांची यावेळी मंचावर उपस्थिती होती. उद्घाटनप्रसंगी स्वागतपर मनोगत अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी यांनी व्यक्त केले. स्थानिक कार्यवाह डॉ. बालाजी घुटे यांनी अधिवेशन आयोजनामागील भूमिका व महाविद्यालय तथा अर्थशास्त्र विभागासंदर्भातील माहिती आपल्या प्रास्ताविकातून दिली. उपस्थित मान्यवरांचे स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शोधनिबंधाच्या स्मरणिकेचे विमोचन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कार्यवाह-खजिनदार डॉ.मारोती तेगमपुरे यांनी परिषदेचा गौरवशाली इतिहास, परिषदेची उद्दिष्ट्ये, विस्तार आणि ध्येय याविषयी संक्षिप्तपणे आढावा घेत असताना परिषदेच्या विविध उपक्रमांची आणि कार्याची माहिती दिली. मा.खा.रामशेठ ठाकूर यांनी परिषदेस केलेल्या अर्थसाहाय्याबद्दल विशेष आभार मानले. परिषदेचे मावळते अध्यक्ष प्रा.डॉ. दिलीप अर्जुने यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

† कार्यवाह - खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

परिषदेच्या४७ व्या अधिवेशनाचे उद्‌घाटक माजी मंत्री आ. अमित देशमुख यांचे संक्षिप्त पण मुद्देसूद भाषण झाले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, ''भारतीय अर्थव्यवस्था आज एका कठीण वळणावरून जात आहे. देशाचे अर्थशास्त्र योग्य पद्धतीने संक्रमण करीत असेल तरच सर्वसामान्य माणूस सुखी होईल. परंतु आज देशात वेगळेच काहीतरी सुरू असून सरकारने शिक्षणावर वस्तू आणि सेवाकर आकारण्याचा अतिशय दुर्दैवी निर्णय घेतला आहे. एकीकडे शिक्षण मोफत आहे, असे म्हणायचे. दुसऱ्या बाजूस शैक्षणिक साहित्यावर कर आकारायचा हे कितपत योग्य आहे?'' असा प्रश्न उपस्थित करून ते म्हणाले की, अशा कठीण काळात मराठी अर्थशास्त्र परिषदेने अभ्यासपूर्ण सहकार्य करावे व अर्थशास्त्रीय ज्ञान जनमानसापर्यंत घेऊन जाण्याचे काम करण्याची गरज असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

अधिवेशनाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना पद्मविभूषण लॉर्ड मेघनाद देसाई यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्याचे कौतुक करून ते पुढे म्हणाले की, ''महाराष्ट्राची जडणघडण योग्य दिशेने होण्यात गो.नि.दांडेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. धनंजयराव गाडगीळ यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. अर्थशास्त्राची समृद्धी वाढवण्यात महाराष्ट्रातील अर्थतज्ज्ञ संशोधकांनी केलेल्या लेखनाचा आणि संशोधनांचा मोलाचा वाटा आहे. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्र विकसित होण्यात ते महत्त्वपूर्ण ठरले'', असे प्रतिपादन 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'चे प्राध्यापक, पद्मविभूषणप्राप्त अर्थतज्ज्ञ लॉर्ड मेघनाद देसाई यांनी केले. शेती, रोजगार, दारिद्र्य, आरोग्य या मूलभूत प्रश्नांकडे महाराष्ट्राने आणखी लक्ष देणे गरजेचे असून, या प्रश्नाच्या अभ्यासाकडे मराठी अर्थशास्त्र परिषदेने लक्ष देणे आवश्यक असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. परिषदेच्या ४७व्या वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा.डॉ. अनिलकुमार वावरे यांनी आपले अध्यक्षीय भाषण 'शाश्वत विकसित भारत : समकालीन संदर्भ आणि भावी दिशा' या विषयावर दिले. आपल्या भाषणात देशाच्या आर्थिक व सर्वांगीण विकासाचा मार्ग सर्वसमावेशक व शाश्वत असणे गरजेचे आहे. आपल्या ओघवत्या शैलीत विविध आंतरराष्ट्रीय अहवालाचे दाखले देत संयुक्त राष्ट्राने निर्धारित केलेले १७ जागतिक उद्दिष्ट्ये किती महत्त्वाची आहेत याकडे सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांनी कमी वेळेत अतिशय मुद्देसूद व अभ्यासपूर्ण मांडणी केली. यावेळी सभागृहात परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. सुर्यकांत जगदाळे, डॉ. जे.एस. पाटील, डॉ. आर. बी. भांडवलकर यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नितीन डोके, डॉ. दिनेश जोशी यांनी केले, तर आभार प्रा. सुरेश क्षीरसागर यांनी मानले.

**चर्चासत्रे :**

४७ व्या अधिवेशन कालावधीत दरवर्षीप्रमाणे एकूण चार चर्चासत्रं संपन्न झाली. गुरुवार, दिनांक ३० जानेवारी २०२५ रोजी दुपारी '२०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ज्ञांचे आर्थिक विचार' या विषयावरील पहिल्या चर्चासत्राचे सत्राध्यक्ष म्हणून डॉ. संतोष मुळे (उदगीर) यांनी कामकाज पार पाडले. या सत्रात सूत्रसंचालक डॉ. दीपक भुसारे (पैठण) तर वृत्तसंकलक म्हणून डॉ. विश्वजित कदम (नाशिक) यांनी काम केले. शुक्रवार, दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी दुसरे चर्चासत्र 'भारताच्या वित्तीय क्षेत्रातील बदलत्या आकृतिबंधाचा अभ्यास' या विषयावरील सत्राचे सत्राध्यक्ष म्हणून डॉ. सुभाष पाटील (पुणे), सूत्रसंचालक डॉ. गजानन खामकर (सातारा), वृत्तसंकलक डॉ. शिवाजी काकडे (बीड) यांनी जबाबदारी पार पाडली. त्याच दिवशी तिसरे सत्र 'महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्यविषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास.' या विषयावरील सत्राचे सत्राध्यक्ष डॉ. दिपक भारती (अंबाजोगाई), सूत्रसंचालक डॉ. गौरव पवार (राजापूर), वृत्तसंकलक डॉ. लक्ष्मण सिताफुले (दापोली) यांनी कामकाज यशस्वीपणे पार पाडले. अधिवेशन काळात संपन्न झालेल्या तिन्ही

चर्चासत्रात परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. अनिलकुमार वावरे, कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम, कार्यवाह - खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी हे सर्व सत्र व्यवस्थित पार पाडण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले.

**आयत्या वेळचा विषय**

अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी (दिनांक ०१ फेब्रुवारी २०२५) सकाळी ९.०० वाजता आयत्या वेळच्या विषयावरील चौथे सत्र संपन्न झाले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून ४७ व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे यांनी जबाबदारी पार पाडली. या सत्रात प्रा. सुभाष दगडे व डॉ. किशोर सुतार यांनी 'माजी पंतप्रधान - डॉ. मनमोहन सिंग' या विषयावर अनेक दाखले देत अतिशय अभ्यासपूर्ण मांडणी केली. यावेळी डॉ. किशोर सुतार यांनी 'भारतीय नवीन आर्थिक सुधारणांचे पितामह डॉ. मनमोहन सिंग' या विषयावर आपली मांडणी करताना स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासामध्ये या देशाच्या केंद्रीय सत्तेमध्ये अर्थमंत्रीपदी व पंतप्रधानपदी कार्य केलेले अनेक राजकीय नेते होऊन गेले. मात्र अराजकीय पार्श्वभूमी असलेल्या आणि आपला बराच मोठा काळ नोकरशाहीत व्यतीत केलेल्या डॉ. मनमोहन सिंग यांनी ज्या पद्धतीने ९० च्या दशकामध्ये अतिशय अडचणीच्या काळामध्ये देशाच्या अर्थव्यवस्थेचे केंद्रीय अर्थमंत्री पदावरून सारथ्य केले. ते लाख मोलाचे असल्याची भावना सुतार यांनी व्यक्त केली. एवढेच नव्हे, तर तब्बल दहा वर्षे मनमोहन सिंग यांनी देशाच्या पंतप्रधान पदावरून देशाला अन्नसुरक्षितता कायदा, माहितीचा अधिकार, आधारसारखी योजना, संपूर्ण शेतकरी कर्जमाफी, शिक्षण हक्क कायदा अशा कितीतरी मूलगामी गोष्टींची मुहूर्तमेढ रोवून दिली. भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, वाणिज्य विभागाचे सचिव, वित्तविभागाचे सचिव, पंतप्रधानांचे मुख्य आर्थिक सल्लागार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष, देशाचे वित्तमंत्री आणि पंतप्रधान अशा पदांवरून या देशाला धोरणात्मक दृष्टी देण्याचे कार्य केल्याबद्दल देश त्यांच्याविषयी सदैव ऋणी असेल, अशी भावना डॉ.सुतार यांनी व्यक्त केली.

या सत्रातील दुसरे मान्यवर वक्ते प्रा. सुभाष दगडे यांनी 'जागतिक कीर्तीचे अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग.' या विषयावर आपले विचार ठेवले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात प्रा. दगडे म्हणाले की, ''डॉ. मनमोहन सिंग यांनी भारताला अत्यंत कठीण काळामध्ये आर्थिक सुधारणांची देणगी दिली. त्यांच्याच दूरदृष्टीतून या देशांमध्ये चलनविषयक धोरण, राजकोषीय धोरण, नवी व्यापार नीती, नवे औद्योगिक धोरण, सेबी सारख्या संस्थेची स्थापना करून भांडवल बाजाराचे नियमन, भारतीय बँकिंग रचनेतील सुधारणा अशा अगणित गोष्टी बहाल केल्या. भारतातील चलनवाढ, रुपयाची घसरण आणि प्रतिकूल व्यापारतोल या सर्व गोष्टींवर त्यांनी ज्या पद्धतीने उपाय योजले त्याचे सकारात्मक परिणाम आजही दिसून येत आहेत. २००८ ची आर्थिक घसरण आणि कोरोनाची महामारी अशा संकटांमध्येसुद्धा भारतीय अर्थव्यवस्था समर्थपणे उभी राहिली त्यामागे डॉ. सिंग यांनी तयार करून ठेवलेली सुदृढ आर्थिक रचनेची पार्श्वभूमी होती, हे कधीही विसरता येणार नाही'', अशी भावना प्रा. दगडे यांनी यावेळी व्यक्त केली. अध्यक्षीय भाषणाने या सत्राचा समारोप प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे यांनी केला. या यावेळी मंचावर परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम, कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे उपस्थित होती.

**डॉ. रविंद्र सबनीस यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विशेष व्याख्यान :**

दरवर्षी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या एका माजी अध्यक्षांच्या स्मृतिप्रित्यर्थ अधिवेशन काळात विशेष व्याख्यानाचे आयोजन आपण करीत असतो. यावेळी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या दहाव्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र सबनीस यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ३० जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता हे विशेष व्याख्यान दयानंद महाविद्यालयाच्या भव्य सभागृहात संपन्न झाले. यावेळी या स्मृतिप्रित्यर्थ

व्याख्यानासाठी प्राचार्य डॉ. उल्हास माळकर (मिरज) यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ. माळकर यांनी 'छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती शंभूराजांची अर्थनीती' या विषयावरील आपली विस्तारित मांडणी केली. यावेळी आपल्या अभ्यासपूर्ण विवेचनात ते म्हणाले की, ''शिवरायांच्या कारकिर्दीत एकूण तीनशे वेळा शेतजमिनीची मोजणी करून शेतजमिनीच्या प्रतवारीनुसार शेतसारा आकारणीचे दर ठरवून दिले. परिणामी, शेतकऱ्यांचे जमिनीच्या हद्दीवरून होणारे भांडण-तंटे कमी झाले. यामुळे शेतकरी सुखी झाले. छत्रपती शंभू राजांनीसुद्धा हेच धोरण पुढे सुरू ठेवले. याबरोबरच नवीन शेतजमीन लागवडीखाली आणणाऱ्या शेतकऱ्यांना पुढील पाच वर्षे शेतसारा माफ करण्यात आला.'' अशा स्वरूपाचे विविध दाखले देत डॉ. माळकर यांनी आपली मांडणी केली. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप डॉ. अनिलकुमार वावरे (४७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष) यांनी केला. प्रास्ताविक, कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी केले. यावेळी कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम यांनी डॉ. रविंद्र सबनीस यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकला. डॉ. उल्हास माळकर यांचा परिचय डॉ. जितेंद्र तलवारे यांनी करून दिला.

**अधिवेशनाचे विशेष आकर्षण :**

अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी दुपारी लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनी मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या वार्षिक अधिवेशनाला भेट दिली. यावेळी त्यांच्यासमवेत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंढे यांचीही उपस्थिती होती. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेश बियाणी, ४७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा.डॉ. अनिलकुमार वावरे, कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम, कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे, अर्थसंवादचे संपादक डॉ. राहुल म्होपरे, स्थानिक कार्याध्यक्ष डॉ. शिवाजी गायकवाड (प्राचार्य-दयानंद कला महाविद्यालय, लातूर), स्थानिक कार्यवाह डॉ. बालाजी घुटे यांची यावेळी मंचावर उपस्थिती होती.

यावेळी बोलताना छत्रपती शिवेंद्रराजे भोसले म्हणाले की, ''महाराष्ट्र हे छत्रपती शिवरायांचे राज्य आहे. महाराष्ट्रीयन मराठी भाषकांनी अन्य भाषेचे स्वागत करून आपली मराठी भाषेचा अधिकाधिक विकास केला पाहिजे. छत्रपती शिवरायांची अर्थनीती आजही महत्त्वपूर्ण असून त्यावेळी शेतकरी, शेतमजूर, कामगार हे सर्व कष्टकरी घटक सुखी होते. कारण शिवरायांची अर्थनीती सक्षम व समाजाला जोडणारी, आधार देणारी होती. भारताच्या वित्तीय क्षेत्राच्या बदलत्या आकृतिबंधाचा अभ्यास, महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्यविषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास यावरील अधिवेशन काळात होणारे चिंतन / मंथन महाराष्ट्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अर्थतज्ज्ञांनी अर्थशास्त्राचा प्रचार व प्रसार मराठी भाषेतून अधिकाधिक प्रमाणात करावा. महाराष्ट्राच्या विकासाचे कार्य मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या माध्यमातून होईल'', याची मला खात्री असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्रा.डॉ. अनिलकुमार वावरे (४७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष) यांच्या भाषणाने झाला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, ''१९७७ मध्ये स्थापन झालेली मराठी अर्थशास्त्र परिषद अर्थशास्त्रीय ज्ञान मराठी भाषेतून विकसित करण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आली असून, आपल्या आगमनाने परिषदेच्या लौकिकात भर पडली आहे. आम्ही आपले शतशः आभारी आहोत.'' यावेळी परिषदेच्या वतीने छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांचा सत्कार अध्यक्ष प्रा.डॉ. अनिलकुमार वावरे, कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम, कार्यवाह - खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे व अर्थसंवादचे संपादक डॉ. राहुल म्होपरे यांनी शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन केला.

**प्रा. नी. वि.सोवनी स्मृती व्याख्यान :**

दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.नी.वि.सोवनी स्मृतिव्याख्यान या नावीन्यपूर्ण उपक्रमामध्ये चौदावे पुष्प माध्यम क्षेत्राचे अभ्यासक तथा ज्येष्ठ विचारवंत प्रा.जयदेव डोळे यांनी गुंफले. 'अर्थशास्त्राचे अध्यापन व अध्यापक' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. या विषयावर मांडणी करताना अनेक मान्यवर विचारकांच्या पुस्तकांचा, त्यांच्या आत्मचरित्राचा संदर्भ देत आपल्या विषयाची मांडणी त्यांनी यावेळी केली. प्रथम त्यांनी नी. वि. सोवनी यांच्या स्मृतींना उजाळा दिला. विशेष म्हणजे परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. दि.व्यं. जहागीरदार या कार्यक्रमात सहभागी (ऑनलाईन) होऊन डॉ. सोवनी आणि मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या संदर्भात आपले विचार ठेवले. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. अनिलकुमार वावरे यांनी अध्यक्षीय समारोप करताना अध्ययन, अध्यापन आणि संशोधन या तीनही बाबी अर्थशास्त्राच्या शिक्षकांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असून प्रा. जयदेव डोळे यांचे व्याख्यान ही दृष्टी अधिक व्यापक होण्यास साहाय्यभूत ठरणारी असल्याची भावना यावेळी व्यक्त केली. यावेळी कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी प्रा. नी. वि. सोवनी स्मृती व्याख्यानाचा उद्देश आणि त्यांचे परिषदेच्या उभारणीतील योगदान याविषयीची माहिती आपल्या प्रास्ताविकात दिली. गणेश टेकळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

**समारोप सोहळा :**

दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता तीन दिवसीय अधिवेशनाच्या समारोप सोहळ्यास सुरुवात झाली. समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष परिषदेच्या ४७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा.डॉ. अनिलकुमार वावरे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ.मनोहर चासकर (कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), यावेळी दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री. रमेश बियाणी, डॉ. पी.ए.खडके (अधिष्ठाता - मानव्यविद्या शाखा, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), प्रा.डॉ.लक्ष्मण पाटील (अध्यक्ष- अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), प्राचार्य डॉ. के.के. पाटील यांची विशेष उपस्थिती होती. कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम, कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे, अर्थसंवादचे संपादक डॉ. राहुल म्होपरे, स्थानिक कार्याध्यक्ष डॉ.शिवाजी गायकवाड (प्राचार्य- दयानंद कला महाविद्यालय, लातूर), मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विश्वस्त डॉ. विकास सुकाळे, डॉ. विठ्ठल घीनमीने, डॉ. धोंडीराम पवार, कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. विजय भोपाळे, डॉ.जयवंत इंगळे, डॉ. बाळासाहेब पाटील, डॉ. सुभाष सावंत, डॉ. राजाराम पाटील, डॉ. जितेंद्र तलवारे, डॉ. अजय दरेकर, डॉ. संजय धोंडे, डॉ. ठावरी विठ्ठल, डॉ. हनुमंत भोसले, स्थानिक कार्यवाह डॉ. बालाजी घुटे यांची मंचावर विशेष उपस्थित होती. अधिवेशनाच्या उत्तम आयोजनाबाबत सर्वांनीच यावेळी समाधान व्यक्त केले.

**परिषदेच्यावतीने विविध पारितोषिकांचे वितरण :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्यावतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण समारोपाच्या सोहळ्यातील प्रमुख पाहुणे व मान्यवर पदाधिकाऱ्यांचे हस्ते करण्यात आले.

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (रु.१०००/- व सन्मानपत्र) प्रा.डॉ.ज.फा. पाटील यांच्या 'अर्थवास्तव' या ग्रंथास देण्यात आला.

२. प्रा.मो.स.भावे पारितोषिक (रु.५००/- व सन्मानपत्र) अर्थसंवादमधील सर्वोत्कृष्ट लेखाबद्दल वनिता केरुजी बनकर यांच्या 'केंद्र पुरस्कृत विकास योजना आणि भारतीय शेती.' (जुलै-सप्टेंबर २०२३, खंड ४७, अंक २,) आणि गणेश आदिनाथ टेकळे यांच्या 'जागतिक आनंद

निर्देशांकाचा सैद्धांतिक अभ्यास आणि भारताची दशा व दिशा.' (जानेवारी - मार्च २०२४, खंड ४७, अंक ४) या लेखकांना विभागून देण्यात आला.

३. मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथपारितोषिक (रु.११,०००/- व सन्मानपत्र) डॉ. अस्मिता मिलिंद प्रधान यांच्या 'कोरोना आणि भारतीय अर्थव्यवस्था' या ग्रंथास देण्यात आला.

४. प्रा. सौ. अरूणा रारावीकर, वृत्तपत्रातील आर्थिक विषयक लेखाला प्रथम पारितोषिक (रु.१०००/ -व सन्मानपत्र) डॉ. दीपक भारतीयांच्या 'द्विदल' अर्थव्यवस्थेतील 'आनंदाची' दिवाळी तर द्वितीय पारितोषिक (रु.५००/- व सन्मानपत्र) डॉ. माधव शिंदे, यांच्या 'डॉलरला वळसा घालणारी वाट' या लेखाला देण्यात आला.

५. डॉ. रविंद्र सबनीस आर्थिक लेख पारितोषिक (इंग्रजी माध्यमातून रु. ४०००/- व सन्मानपत्र), डॉ. आशुतोष रारावीकर यांच्या Perspectives on the History of the Reserve Bank of India. या लेखास देण्यात आला.

६. स्व. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथून पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात विद्यापीठातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रु. २०००/- व सन्मानपत्र) दिले जाणारे पारितोषिक वैभव प्रितम झरे यांना देण्यात आले.

**अधिवेशन काळात सादरीकरण झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास पारितोषके :**

१. कै. ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (रु.१०००/-व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाते. डॉ.गजानन खामकर यांच्या'जागतिक दारिद्र्य निर्मूलनासाठीच्या प्रायोगिक संशोधनाच्या विकासाचे आधुनिक प्रवर्तक - डॉ. अभिजित बनर्जी' व अमृत मनोहर चव्हाण यांच्या 'महाराष्ट्रातील शिक्षणक्षेत्रातील सुधारणा : धोरणात्मक दृष्टिकोनातून' या विषयावरील शोधनिबंधास विभागून देण्यात आले.

२. प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (रु.५००/- व सन्मानपत्र) सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाणारे पारितोषिक गांजवे प्रशांत तुकारामयांच्या 'क्लाउडिया गोल्डीन यांची यू-आकार वक्र संकल्पना : महिला कामगार सहभाग आणि आर्थिक विकास' व निलेशकुमार गुरव यांच्या 'भारतीय रिझर्व्ह बँकेची स्वायत्तता आणि कलम ७ एक चिंतन' या विषयावरील शोधनिबंधास विभागून देण्यात आले.

३. डॉ.ज.फा.पाटील पारितोषिक (रु.२०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (विद्यार्थ्यांकरिता) रोहिदास शेकू जाधव यांच्या'महाराष्ट्रातील शिक्षण व आरोग्यविषयक धोरणांचा आर्थिक आभ्यास' व गौरव गौतम पवार यांच्या 'डॉ. अभिजित बनर्जी यांचे दारिद्र्यविषयक संशोधन व समकालीन संदर्भातील योगदान' या शोधनिबंधास विभागून देण्यात आला.

४. पद्मजा गंधे पारितोषिक (रु.१०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (महिलांकरिता) डॉ. तृप्ती कवळे यांच्या 'मानवी भांडवल आणि आरोग्य यातील सहसंबंध' व डॉ. सविता विष्णू भंडारे यांच्या 'भारतीय वित्तीय क्षेत्र : सद्यस्थितीचा अभ्यास' या शोधनिबंधास विभागून देण्यात आला.

**ऋणनिर्देश :**

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४७ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन यशस्वी करण्यात अनेक दृश्य आणि अदृश्य हातांचे सहकार्य लाभले असून, यामध्ये मा. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी (अध्यक्ष - दयानंद शिक्षण संस्था, लातूर), रमेश बियाणी (सचिव - दयानंद शिक्षण संस्था, लातूर ), मा. ललितभाई शहा (उपाध्यक्ष - दयानंद शिक्षण संस्था, लातूर), स्थानिक कार्याध्यक्ष

डॉ. शिवाजी गायकवाड (प्राचार्य - दयानंद कला महाविद्यालय, लातूर), स्थानिक कार्यवाह डॉ. बालाजी घुटे यांच्या प्रत्यक्ष सहकार्याशिवाय हे अधिवेशन यशस्वी होऊ शकले नसते. याप्रसंगी मी त्यांचे आभार प्रकट करतो. दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील शिक्षक व शिक्षकेतर बांधवांचे आभार व्यक्त करणे कार्यवाह-खजिनदार म्हणून माझे कर्तव्य आहे.

**वार्षिक सर्वसाधारण सभा :**

४७व्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने शनिवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ.अनिलकुमार वावरे यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा (आमसभा) अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीलाच परिषदेच्या दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सर्वसाधारण सभेतील काही महत्त्वाचे निर्णय पुढीलप्रमाणे आहेत.

ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या परिषदेच्या ४८व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे, श्रीमती विमलाबेन खिमजी तेजुकाया कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, देवळाली कॅम्प, नाशिक यांना देण्यात आले. ४८ व्या वार्षिक अधिवेशनासाठी चर्चेकरिता पुढील तीन विषय निश्चित करण्यात आले.

१. धोके आणि परताव्यांचे सिद्धांतन.

२. डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान.

३. महाराष्ट्रातील व्यसनाधिनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू.

**निवडणूक :**

४७ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी प्रा. डॉ. विलास खंदारे, (देवगाव रंगारी, देवगाव रंगारी छत्रपती संभाजीनगर) यांची अविरोध निवड झाली. कार्याध्यक्ष डॉ. अविनाश निकम यांची मुदत दि. ३१ मार्च २०२५ रोजी पूर्ण होत असल्यामुळे दि.१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२८ या तीन वर्षांसाठी कार्याध्यक्ष म्हणून अविरोध डॉ. विकास सुकाळे यांची निवड करण्यात आली. विश्वस्त डॉ. विकास सुकाळे यांची मुदत दि. ३१ मार्च २०२५ रोजी पूर्ण होत असल्यामुळे दि.१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२८ या तीन वर्षासाठी विश्वस्त म्हणून डॉ.गणेश गावंडे याची अविरोध निवड करण्यात आली. दि.१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२८ या तीन वर्षांसाठी कार्यकारी मंडळावर डॉ. विजय भोपाळे-स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, डॉ. दिपक भुसारे-डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर, डॉ. धीरज कदम - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांची अविरोध निवड झाली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रा.डॉ.संतोष कदम, डॉ. राजाराम पाटील आणि डॉ. एम. टी. पावरा यांनी काम पाहिले. सर्वांचे मनपूर्वक आभार.

धन्यवाद!

◆

उच्च शिक्षण ही सामाजिक आणि आर्थिक हालचालीचा वेग
वाढविण्यासाठीची सर्वात मजबूत आणि सर्वात कठीण शिडी आहे.

**- ड्यू फॉस्ट**

# अर्थसंवाद
## (खंड ४८, २०२४-२५)

### अ) लेख सूची


| क्र. | स्वतंत्र लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | संस्थात्मक वित्तपुरवठ्याचे सांगली जिल्ह्याच्या शेतीविकासातील योगदान | ३ |
| २. | भारतातील बेरोजगारीचे सिंहावलोकन व चिकित्सा | ११ |
| ३. | भरडधान्याचे आर्थिक अध्ययन : भारताच्या संदर्भात | २० |
| ४. | पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील लोकांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा अभ्यास | ३१ |
| ५. | कृषी कायदे २०२० रद्द करण्याचा निर्णय आणि त्याचा भारतीय कृषी विपणन सुधारणांवर होणारा परिणाम | ४४ |
| ६. | अर्थक्षेत्रातील महिलांचे योगदान | ५६ |
| ७. | बिमारू राज्यांचा बहुआयामी गरिबी निर्देशांकाच्या अनुषंगाने सामाजिक, आर्थिक प्रगतीचा तुलनात्मक आढावा | ६४ |
| ८. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार धोरणाबाबतचे विचार | ७५ |
| ९. | भारत : माहिती तंत्रज्ञान आणि ग्रामीण विकास | ८५ |
| १०. | २०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ज्ञांचे आर्थिक विचार | ९२ |
| ११. | शोधनिबंध विषयक रूपरेषा : महाराष्ट्रातील शैक्षणिक व आरोग्यविषयक धोरणांचा आर्थिक अभ्यास | ९६ |
| १२. | शोधनिबंध विषयक रूपरेषा : भारतातील वित्तीय क्षेत्राच्या बदलत्या आकृतीबंधाचा अभ्यास | ९९ |
| १३. | आर्थिक पाहणी अहवाल २०२३-२४ : चिकित्सक अभ्यास | १०७ |
| १४. | भारताचा २०२४-२५ चा अर्थसंकल्प : जोमदार तरतुदीसह अनुत्तरित प्रश्न | ११५ |
| १५. | डॅनियल काहेनमान (१९३४ - २०२४) | १२६ |
| १६. | आर्थिक वृद्धी आणि उत्पन्न वितरणातील संबंधांचे सिद्धांतन : कुज़नेट्सच्या परिकल्पनेचे पुनर्परीक्षण | १३० |
| १७. | सोलापूर जिल्ह्यातील कृषी जमिनीचा वाढता वापर आणि नगदी पिकांचा आर्थिक अभ्यास | १४४ |
| १८. | भारतीय बँकिंग क्षेत्रातील रोबोटिक्स व आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वाढता वापर एक चिंतन | १५७ |
| १९. | भारतीय शेअर बाजारामधील गुंतवणूकदारांचा कल- एक विश्लेषणात्मक अभ्यास | १७० |

| | | |
|---|---|---|
| २०. | जालना जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांची वस्तुस्थिती | १७८ |
| २१. | पुस्तक परिचय : अर्थसंकल्पाविषयी सर्वकाही | १८७ |
| २२. | प्रतिक्रिया : प्रतिक्रिया | १९१ |
| २३. | संपादकीय | १९५ |
| २४. | सात्विक संपत्ती निर्मितीचा आदर्श: रतन टाटा | १९७ |
| २५. | अर्थशास्त्राचे २०२४ चे नोबेल पारितोषिक : काही राष्ट्रे इतरांपेक्षा मागे का आहेत? | २०५ |
| २६. | डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान | २१४ |
| २७. | किमान आधारभूत किमती व शेतमजुरांच्या मजुरी दरातील वाढीचा तुलनात्मक अभ्यास | २२४ |
| २८. | विकसनशील देशांच्या कृषिक्षेत्रावर होणारा<br>हवामान बदलाचा आर्थिक प्रभाव आणि अनुकूलन धोरणे | २३२ |
| २९. | सामाजिक संरचनांतर्गत आरोग्य व शिक्षणक्षेत्राची वास्तवता आणि आव्हाने | २४१ |
| ३०. | प्रधानमंत्री जनधन योजनेचे समीक्षात्मक मूल्यमापन | २५० |
| ३१. | झोपडपट्टीतील स्त्रियांची अवस्था : विशेष संदर्भ मराठवाडा | २६० |
| ३२. | सामाजिक संरचना आरोग्य आणि शिक्षण | २६७ |
| ३३. | महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नांवरील उच्चस्तरीय<br>समितीच्या अहवालाचे मूल्यमापनः एक टिपण | २७४ |
| ३४. | शाश्वत विकसित भारत : समकालीन संदर्भ आणि भावी दिशा...!! | २८१ |
| ३५. | आर्थिक पाहणी अहवाल २०२४-२५: एक चिकित्सा | २९१ |
| ३६. | भारतातील लिंग अंदाजपत्रकाचा विश्लेषणात्मक अभ्यास | ३०१ |
| ३७. | छत्रपती शिवाजी महाराजांची करप्रणाली : न्याय, विकास आणि संरक्षणाची परंपरा | ३११ |
| ३८. | धाराशिव जिल्ह्यातील जमीन वापराच्या पद्धतींचा<br>भूत, वर्तमान, आणि भविष्यकालीन तुलनात्मक अभ्यास | ३२० |
| ३९. | आर्थिक सुधारणा काळातील जलव्यवस्थापन | ३३४ |
| ४०. | नवीन आर्थिक सुधारणा आणि भारताच्या अभिनव अर्थव्यवस्थेचा<br>उदय : रोमरच्या अंतर्जात वाढ यंत्रणेचा अभ्यास | ३४४ |
| ४१. | वर्धा जिल्ह्यातील निम्न आणि मध्यम वर्गातील कुटुंबाची<br>बचत आणि गुंतवणुकीचा राहणीमानावर होणारा परिणाम | ३५२ |
| ४२. | मराठी अर्थशास्त्र परिषद ४७ वे वार्षिक अधिवेशन : २०२४-२५ कार्यवाहांचा अहवाल | ३६३ |
| ● | संदर्भ सूची | |
| | अ) लेख सूची | ३६८ |
| | ब) लेखक सूची | ३७० |
| | क) नवीन आजीव सभासदांची यादी | ३७२ |
| | ड) तज्ञ परीक्षक सूची | ३७६ |

# अर्थसंवाद
# (खंड ४८, २०२४-२०२५)

**ब) लेखक सूची**


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | देशमुख एम. एस., पाटील व्ही. डी. | ३ |
| २. | भिमराव पांडुरंग उगले, आबासाहेब श्रीरंग हांगे | ११ |
| ३. | सुभाष पाटील | २० |
| ४. | अजय दरेकर | ३१ |
| ५. | सुनिता जाधव | ४४ |
| ६. | संतोष दास्ताने | ५६ |
| ७. | कारभारी भालचंद्र काशिनाथ | ६४ |
| ८. | शेडगे दत्तात्रय भगवानराव | ७५ |
| ९. | राहुल शं. म्होपरे | ८५ |
| १०. | प्रशांत हरमकर : शोधनिबंध विषयक रूपरेषा | ९२ |
| ११. | सुभाष सावंत : शोधनिबंध विषयक रूपरेषा | ९६ |
| १२. | माधव एच. शिंदे : शोधनिबंध विषयक रूपरेषा | ९९ |
| १३. | राहुल शं. म्होपरे, गणेश आ. टेकळे | १०७ |
| १४. | प्रशांत हरमकर | ११५ |
| १५. | संतोष दास्ताने | १२६ |
| १६. | धीरज कदम | १३० |
| १७. | अमृत मनोहर चव्हाण, अतुल जीवन राजगुरू | १४४ |
| १८. | विजय मारुती कुंभार | १५७ |
| १९. | मच्छिंद्र दामाजी वेदपाठक | १७० |
| २०. | पी. व्ही. देशमुख, पांडुरंग सुदामराव दाभाडे | १७८ |
| २१. | राजाराम केरबा पाटील : पुस्तक परिचय | १८७ |
| २२. | शि. ना. माने : प्रतिक्रिया | १९१ |
| २३. | राहुल शं. म्होपरे | १९५ |
| २४. | किशोर गजाजन सुतार, गणेश आदिनाथ टेकळे | १९७ |
| २५. | किशोर बी. मेंढे, निलोफर एस. शेख | २०५ |
| २६. | सुरज रामचंद्र चिगरे, रोहिदास अर्जुन अभंगे | २१४ |
| २७. | रेवप्पा सिद्धप्पा कोळी, युवराज रेवणसिद्ध सोलापूरे | २२४ |
| २८. | रोहन रविराज बावडेकर, नम्रता नरेश पाटील | २३२ |

| | | |
|---|---|---|
| २९. | प्राची मिलिंद साळुंखे, निकिता व्यंकटेश धवन | २४१ |
| ३०. | शीतल मोहन कदम, प्रज्ञा शरद लाड | २५० |
| ३१. | वनिता केरुजी बनकर, रोहिदास शेकू जाधव | २६० |
| ३२. | हरिभाऊ सामा खरात, स्नेहल नितेश जाधव | २६७ |
| ३३. | केशव नागोराव देशमुख, राणी नवनाथराव पावडे | २७४ |
| ३४. | अनिलकुमार कृष्णराव वावरे | २८१ |
| ३५. | राहुल शं. म्होपरे, गणेश आ. टेकळे | २९१ |
| ३६. | शालिनी उत्तमराव कदम | ३०१ |
| ३७. | अतुल कृष्णा घाडगे, अजय कमलाकर दिक्षित | ३११ |
| ३८. | अतुल जी. राजगुरू, दादा रा. ननवरे | ३२० |
| ३९. | सुनिता विजय रणाते | ३३४ |
| ४०. | राजेश हरिचंद्र भोईटे | ३४४ |
| ४१. | योगेश पतिंगे, अमोल पाटील | ३५२ |
| ४२. | **मारोती वि. तेगमपुरे** | ३६३ |
| ● | संदर्भ सूची | |
| | अ) लेख सूची | ३६८ |
| | ब) लेखक सूची | ३७० |
| | क) नवीन आजीव सभासदांची यादी | ३७२ |
| | ड) तज्ञ परीक्षक सूची | ३७६ |


# अर्थसंवाद


| क्र. | स्वतंत्र लेखक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **पुस्तक परिचय व प्रतिक्रिया** | |
| २१. | पुस्तक परिचय : अर्थसंकल्पाविषयी सर्वकाही | १८७ |
| २२. | प्रतिक्रिया : प्रतिक्रिया | १९१ |
| | **पुस्तक परिचय व प्रतिक्रिया** | |
| २१. | राजाराम केरबा पाटील : पुस्तक परिचय | १८७ |
| २२. | शि. ना. माने : प्रतिक्रिया | १९१ |

# नवीन आजीव सभासदांची यादी

## (१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५)

| अ.क्र. | आजीव सभासदांचे नाव | आजीव सभासद क्र. | पावती क्र. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. जाधव सुनिता संजय | २०१६ | ४९३ | ५१००/- |
| २. | सौ. स्फुर्ती विशाल बेलुरे | २०१७ | ४९४ | ३१००/- |
| ३. | खैरनार  मनोहर बबन | २०१८ | २१३ | ३१००/- |
| ४. | खटके सायबू शंकर | २०१९ | ४९५ | ३१००/- |
| ५. | डॉ. बोगुलवार अशोक हाणमनलु | २०२० | ४९६ | ५१००/- |
| ६. | डॉ. वागतकर विनायक मारोती | २०२१ | ४९७ | ५१००- |
| ७. | डॉ. शिंदे आर.डी. | २०२२ | ४९८ | ५१००/- |
| ८. | डॉ. कुंचेलवाड दत्ता माधवराव | २०२३ | ४९९ | ५१००/- |
| ९. | मुद्दलवार संजय माधवराव | २०२४ | ५०० | ३१००/- |
| १०. | वजीर प्रकाश कामाजी | २०२५ | २०१ | ३१००/- |
| ११. | तासगावे चारुशिला भुपाल | २०२६ | २०२ | ३१००/- |
| १२. | बोडके संतोष रामराव | २०२७ | २०३ | ३१००/- |
| १३. | सोलापुरे युवराज रेवणसिद्ध | २०२८ | २०४ | ३१००/- |
| १४. | किरण लालासाहेब शिंदे | २०२९ | २०५ | ५१००/- |
| १५. | कांबळे मयुर सुभाष | २०३० | २०६ | ५१००/- |
| १६. | खाडे अमोल बाबासाहेब | २०३१ | २०७ | ३१००/- |
| १७. | लांडगे कृष्णा दगडू | २०३२ | २०८ | ३१००/- |
| १८. | महाजन निलेश भगवान | २०३३ | २०९ | ३१००/- |
| १९. | साळुंखे प्राची मिलिंदराव | २०३४ | २१० | ३१००/- |
| २०. | बाविस्कर प्रियंका सुभाष | २०३५ | २११ | ३१००/- |
| २१. | डॉ. जम्मा अविनाश पंचप्पा | २०३६ | २१२ | ३१००/- |
| २२. | कोळी रेवप्पा सिध्द्प्पा | २०३७ | २१४ | ३१००/- |
| २३. | बोटकोंडले ज्योती दीपक | २०३८ | २१५ | ३१००/- |
| २४. | डॉ. पोटभरे सुंदर सुखदेव | २०३९ | २१६ | ५१००/- |
| २५. | डॉ. बुटे शामराव नेमाजी | २०४० | २१७ | ५१००/- |
| २६. | चीघळीकर ज्ञानराजा गोरोबा | २०४१ | २१८ | ५१००/- |
| २७. | डॉ. सोनकांबळे संध्या पुंडलीकराव | २०४२ | २१९ | ५१००/- |
| २८. | प्रसन्नजीत सूर्यभान भावे | २०४३ | २२० | ५१००/- |
| २९. | डॉ. गोसावी सुनील वाल्मिक | २०४४ | २२१ | ५१००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०. | डॉ. मुंढे बाळासाहेब मुरलीधर | २०४५ | २२२ | ५१००/- |
| ३१. | राजगुरू अतुल जीवन | २०४६ | २२३ | ३१००/- |
| ३२. | डॉ. वेदपाठक मच्छिंद्र दामाजी | २०४७ | २२४ | ५१००/- |
| ३३. | निमसे मीनाक्षी भिवाजी | २०४८ | २२५ | ३१००/- |
| ३४. | मथुरे युवराज्ञी मेवालाल | २०४९ | २२६ | ३१००/- |
| ३५. | शेवाळे वर्षा राजेंद्र | २०५० | २२७ | ३१००/- |
| ३६. | डॉ. पाटील नयना भिमराव | २०५१ | २२८ | ३१००/- |
| ३७. | भंडारे सविता विष्णू | २०५२ | २२९ | ३१००/- |
| ३८. | डॉ. पिंगळे गोरक्षनाथ रामदास | २०५३ | २३० | ३१००/- |
| ३९. | तुंगार धर्मराज युवराज | २०५४ | २३१ | ५१००/- |
| ४०. | चव्हाण संदीप धर्मसिंग | २०५५ | २३२ | ५१००/- |
| ४१. | पचलिंग प्रियंका विश्वनाथ | २०५६ | २३३ | ३१००/- |
| ४२. | चन्नाळे धनंजय शिवराज | २०५७ | २३४ | ५१००/- |
| ४३. | चौधरी रमेश रघुनाथ | २०५८ | २३५ | ३१००/- |
| ४४. | वडगावे व्यंकट जनार्धन | २०५९ | २३६ | ३१००/- |
| ४५. | ठाकरे अक्षयकुमार शामराव | २०६० | २३७ | ३१००/- |
| ४६. | धवन निकिता व्यंकटेश | २०६१ | २३८ | ३१००/- |
| ४७. | डगवार सोनल सुभाषराव | २०६२ | २३९ | ३१००/- |
| ४८. | शेख निलोफर समीर | २०६३ | २४० | ३१००/- |
| ४९. | शेळके गणपत सुभाष | २०६४ | २४१ | ३१००/- |
| ५०. | पांचाळ शिवकुमार केशवराव | २०६५ | २४२ | ३१००/- |
| ५१. | खराबे नारायण तुकाराम | २०६६ | २४३ | ३१००/- |
| ५२. | डॉ. वावरे सविता अनिलकुमार | २०६७ | २४४ | ३१००/- |
| ५३. | राठोड मारोती बाबुराव | २०६८ | २४५ | ३१००/- |
| ५४. | गुरव निलेशकुमार नंदकुमार | २०६९ | २४६ | ३१००/- |
| ५५. | कदम शितल मोहन | २०७० | २४७ | ३१००/- |
| ५६. | गंगावणे श्रद्धा मानसिंग | २०७१ | २४८ | ३१००/- |
| ५७. | सांवंत सत्वशिला रमेश | २०७२ | २४९ | ३१००/- |
| ५८. | लाड प्रज्ञा शरद | २०७३ | २५० | ३१००/- |
| ५९. | इप्पर नवनाथ नाथराव | २०७४ | २५१ | ५१००/- |
| ६०. | डॉ.तनंगे काशिनाथ रामचंद्र | २०७५ | २५२ | ५१००/- |
| ६१. | पाटील विशाल चंद्रकांत | २०७६ | २५३ | ३१००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६२. | इंद्रे बालाजी रामराव | २०७७ | २५४ | ३१००/- |
| ६३. | बावडेकर रोहन रविराज | २०७८ | २५५ | ५१००/- |
| ६४. | डॉ. खोपडे स्मिता जयेंद्र | २०७९ | २५६ | ५१००/- |
| ६५. | ननवरे दादा रामदास | २०८० | २५७ | ३१००/- |
| ६६. | पाटील नम्रता नरेश | २०८१ | २५८ | ३१००/- |
| ६७. | उत्तेकर गोरखनाथ तानाजी | २०८२ | २५९ | ५१००/- |
| ६८. | डॉ. कदम जयश्री लक्ष्मण | २०८३ | २६० | ३१००/- |
| ६९. | गोडबोले योगेश गोपाल | २०८४ | २६२ | ५१००/- |
| ७०. | देशमुख केशव नागोराव | २०८५ | २६३ | ५१००/- |
| ७१. | मोरे तुकाराम पी. | २०८६ | २६४ | ५१००/- |
| ७२. | जवराळ वैशाली विजयकुमार | २०८७ | २६५ | ३१००/- |
| ७३. | रवंदळे गायत्री अविनाश | २०८८ | २६६ | ३१००/- |
| ७४. | डॉ. सूर्यवंशी उत्तमराव दगडू | २०८९ | २६७ | ५१००/- |
| ७५. | चौधरी निलेश नारायण | २०९० | २६८ | ३१००/- |
| ७६. | डॉ. मनुरे नागनाथ जयवंत | २०९१ | २६९ | ३१००/- |
| ७७. | चिगरे सुरज रामचंद्र | २०९२ | २७० | ३१००/- |
| ७८. | अभंगे रोहिदास अर्जुन | २०९३ | २७१ | ३१००/- |
| ७९. | जाधव स्नेहल नितेश | २०९४ | २७२ | ३१००/- |
| ८०. | डॉ. जगताप चेतना दत्तात्रय | २०९५ | २७३ | ३१००/- |
| ८१. | गायधनी सविता केशव | २०९६ | २७४ | ३१००/- |
| ८२. | केळे अश्विनी कृष्णा | २०९७ | २७५ | ३१००/- |
| ८३. | औताडे प्रतिभा येडूराव | २०९८ | २७६ | ३१००/- |
| ८४. | खामकर गजानन चंद्रकांत | २०९९ | २७७ | ३१००/- |
| ८५. | गिरमकर जनार्धन महादेव | २१०० | २७८ | ३१००/- |
| ८६. | डॉ. काळे सुप्रिया हेमंत | २१०१ | २७९ | ५१००/- |
| ८७. | मेहत्रे निर्मला रामदास | २१०२ | २८० | ३१००/- |
| ८८. | आंबेकर शुभम नामदेव | २१०३ | २८१ | ३१००/- |
| ८९. | खिराळे निता सखाराम | २१०४ | २८२ | ३१००/- |
| ९०. | डॉ. वासनिकर श्यामराव लक्ष्मण | २१०५ | २८३ | ५१००/- |
| ९१. | देशमुख चंद्रशेखर जरासंघ | २१०६ | २८४ | ५१००/- |
| ९२. | डॉ. सारंग शंकर भोला | २१०७ | २८५ | ५१००/- |
| ९३. | डॉ. लक्ष्मने प्रशांत काशिनाथ | २१०८ | २८६ | ५१००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९४. | डॉ. शिंदे प्रतिक हरिभजन | २१०९ | २८७ | ३१००/- |
| ९५. | डॉ. सिमा विश्वनाथ भोसले | २११० | २८८ | ५१००/- |
| ९६. | सातपुते सुमित शिवाजी | २१११ | २८९ | ३१००/- |
| ९७. | डॉ. आडे नितीन धनुसिंग | २११२ | २९० | ५१००/- |
| ९८. | प्रा. कावळे सिमा तुकाराम | २११३ | २९१ | ५१००/- |
| ९९. | भालेराव गौतम विक्रम | २११४ | २९२ | ३१००/- |
| १००. | कुवर जगदीश अमृतराव | २११५ | २९३ | ३१००/- |
| १०१. | नेरपगार नरेंद्र शिवाजी | २११६ | २९४ | ३१००/- |
| १०२. | होदलूरकर निलेश विठ्ठलराव | २११७ | २९५ | ५१००/- |
| १०३. | पावरा गुलाबसिंग जहागीर | २११८ | २९६ | ३१००/- |
| १०४. | भागानगरे शिवाजी दौलतराव | २११९ | २९७ | ५१००/- |
| १०५. | ठाकूर विलास तुळशीराम | २१२० | २९८ | ५१००/- |
| १०६. | सुतार अनिल दयानंद | २१२१ | २९९ | ३१००/- |
| १०७. | नरवडे अनंत बाळू | २१२२ | ३०० | ५१००/- |
| १०८. | प्रा. गोरे ज्ञानेश्वर प्रभाकर | २१२३ | ३०१ | ३१००/- |
| १०९. | तिगोटे राहुल शिवाजी | २१२४ | ३०२ | ३१००/- |
| ११०. | सुरवसे निकिता भुजंग | २१२५ | ३०३ | ३१००/- |
| १११. | डॉ. गिरे सुधाकर शामराव | २१२६ | ३०४ | ५१००/- |
| ११२. | आहेर प्रवीण बबनराव | २१२७ | ३०५ | ३१००/- |
| ११३. | लाड बाळासाहेब सदाशिव | २१२८ | ३०६ | ५१००/- |
| ११४. | पाटील अमोल देविदासजी | २१२९ | ३०७ | ३१००/- |
| ११५. | डॉ. पतींगे योगेश लक्ष्मणराव | २१३० | ३०८ | ५१००/- |
| ११६. | सूर्यवंशी स्वाती यशवंतराव | २१३१ | ३०९ | ३१००/- |
| ११७. | घुगे प्रतिभा राधाकिशन | २१३२ | ३१० | ३१००/- |
| ११८. | नांदे शरदचंद्र प्रभाकर | २१३३ | ३११ | ३१००/- |
| ११९. | डुकरे गजानन निवृत्ती | २१३४ | ३१२ | ३१००/- |
| १२०. | प्रा. दिसागज पंढरीनाथ राजाराम | २१३५ | ३१३ | ५१००/- |
| १२१. | देशमुख गुरुनाथ सुधाकर | २१३६ | २६१ | ५१००/- |

**सूचना :** रुपये ३१००/- आजीव सभासद वर्गणी देणारे सभासद विध्यार्थी किंवा विना अनुदानित संस्थेमध्ये कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांचेकडून इमारत निधी घेण्यात आला नाही.

# अर्थसंवाद - तज्ञ परीक्षक सूची

अर्थसंवादच्या खंड ४८ मधील अंक १ ते अंक ४ मधील लेखांचे परीक्षण खालील तज्ञांनी केलेले आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. श्रीनिवास खांदेवाले | - | नागपूर |
| २. | डॉ. दि. व्य. जहागीरदार | - | अमरावती |
| ३. | डॉ. सौ. मुक्ता जहागीरदार | - | अमरावती |
| ४. | डॉ. संतोष दास्ताने | - | पुणे |
| ५. | डॉ. सुरेश ढाके | - | भुसावळ |
| ६. | डॉ. विकास सुकाळे | - | नांदेड |
| ७. | डॉ. एस. एम. भोसले | - | आटपाडी |
| ८. | डॉ. सुभाष पाटील | - | पुणे |
| ९. | डॉ. मारोती तेगमपुरे | - | अंबड |
| १०. | डॉ. के. के. पाटील | - | अर्धापूर |
| ११. | डॉ. आर. जी. रसाळ | - | लोणी |
| १२. | डॉ. राहुल शं. म्होपरे | - | अर्जूननगर |
| १३. | डॉ. दिलीप अर्जुने | - | जालना |
| १४. | डॉ. अनिल वावरे | - | सातारा |
| १५. | डॉ. अजय दरेकर | - | बारामती |
| १६. | डॉ. राजकुमार वाईंगडे | - | अर्जुननगर |
| १७. | राजेंद्र भांडवलकर | - | यवतमाळ |
| १८. | अनिल वावरे | - | सातारा |
| १९. | धीरज कदम | - | नागपूर |
| २०. | समीत माहोरे | - | नागपूर |
| २१. | राजू पाटील | - | सोलापूर |
| २२. | बाळासाहेब पाटील | - | पनवेल |
| २३. | माधव शिंदे | - | अ.नगर |
| २४. | विजय कुंभार | - | सातारा |

**महाराष्ट्र शासन**

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)

**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**

दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in

संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व - डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश - संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला-के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज - श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३११०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# अर्थसंवादसाठी मनःपूर्वक शुभेच्छा



**प्रा.(डॉ.) सौ.अस्मिता प्रधान** – गारगोटी

**श्री गणेश टेकळे** – कोल्हापूर

**डॉ. गजानन खामकर** – सातारा

**श्री निलेश गुरव** – सातारा

**प्रा. प्रशांत गांजवे** – विटा

**श्री अमृत चव्हाण** – कोल्हापूर

**श्री गौरव पवार** – सातारा

**डॉ. आशुतोष राराविकर** – मुंबई

**श्रीमती वनिता बनकर** – छ. संभाजीनगर

मूल्य : रु. १०/– (सभासदांकरिता विनामूल्य)

भारती मुद्रणालय, कोल्हापूर